प्रकाशनाचे सर्वाधिकार
'चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे'

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग पांचवा

# मनाचे श्लोक

## (सटीप)

सूत गुंतले तें उकलावें । तैसें मन उगवावें ।
मानत मानत घालावें । मुळाकडें ।।

आवृत्ती (अठरावी)

प्रकाशक : चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे

मुद्रक : विजयश्री एंटरप्राइजेस, गुरुवार पेठ, सातारा. फोन : २२६९०१

अक्षरांकन : श्री कॉम्प्युटर्स, गुरुवार पेठ, सातारा. फोन : २२८१६६

किंमत : ३० रु.

।। श्रीरामसमर्थ ।।

# श्री मनाचे श्लोक (सटीप)

## प्रकाशकाचे निवेदन

श्री समर्थांच्या मनाच्या श्लोकांचा प्रभाव लोकांवर आहेच. निराहंकार, विवेक, वैराग्य, शुद्धाचरण, संतसंगती व नामस्मरण यांचे महत्त्व मनाच्या श्लोकाद्वारे विषद करून मनास शिस्त कशी लावावी, हे समर्थांनी सोदाहरण सांगितले आहे. मनास शांतता मिळाल्यास परमेश्वर प्राप्तीचा आनंद लाभतो व मुक्तीचा मार्ग सहज साध्य होतो; हे मनाच्या श्लोकात स्पष्ट केले आहे. त्यामुळे अबालवृद्धांचे हे श्लोक पाठ आहेत व त्यांचे मननही चालू असते. माननीय नानासाहेब देवांनी 'श्री मनाचे श्लोक' या पुस्तकात श्लोकांचा अर्थ दिला आहेच; परंतु शब्दांच्या सविस्तर टिपाही दिल्या आहेत. तसेच त्यासाठी गीता, पुराणे व अन्य ग्रंथातील संदर्भ दिले आहेत. त्यामुळे हे पुस्तक लोकांना विशेष भावते. त्यास मोठी मागणी असते म्हणूनच या पुस्तकाची आठरावी आवृत्ती प्रसिद्ध करतांना आम्हांस आनंद होत आहे.

| | |
|---|---|
| मकर संक्रमण | **श.धों.नगरदेवळेकर** |
| पौष पौर्णिमा शके १९२७ | चिटणीस, |
| १४ जाने.२००६ | सत्कार्योत्तेजक सभा, धुळे |

**रा) १२ व्या आवृत्तीत पूर्वीच्या आवृत्तीतील मनाच्या श्लोकाची संस्कृत समश्लोकी छापलेली होती आता मूळ समश्लोकीची हस्तलिखित प्रत उपलब्ध झाली आहे. यथावकाश ती प्रकाशित करण्याचा सभेचा मानस आहे. यास्तव या आवृत्तीत ही संस्कृत समश्लोकी समाविष्ट केलेली नाही.**

**म) १२ व्या आवृत्तीत प्रत्येक श्लोकाच्या प्रथम चरणाची सूची छापलेली होती सभेने डॉ.वि.आ.चितळे यांनी संपादित केलेली श्लोकांच्या सर्व चरणांची आद्याक्षरानुसार सूची स्वतंत्रपणे प्रकाशित केलेली असल्याने या आवृत्तीतून प्रथमचरणांची सूची वगळली आहे.**

।।श्रीराम।।

# प्रस्तावना

## मनाच्या श्लोकांचे स्वरूप

**आधीं तें करावें कर्म । कर्ममार्गे उपासना ।**
**उपासकां सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्ष चि पावणें ।।** मा.पं.३-१

**श्रीसमर्थां**नी मनाला च बोध कां केला, त्या बोधाचे स्वरूप कसें आहे, त्याचें प्रयोजन कोणतें, त्याची फलश्रुति काय, इत्यादि प्रश्नांचा विचार या ठिकाणी यथामति करावा, असा हेतु आहे.

स्वत:चे वर्णन आपल्या बोलण्याप्रमाणें नसतां जो दुसऱ्यास उपदेश करतो, त्याला श्रीसमर्थांनी करंटा ह्मटले आहे. स्वत: कांही न करितां लोकांना च बोध करण्याचा क्रम चालविला तर मौज अशी होते कीं, जो तो स्वत: कोरडा च राहून समाजांत सारे च सांगणारे होतात, ऐकणारा कोणी च नसतो. सर्वच शहाणे एके ठिकाणी जमतात. प्रत्येक सांगणारा स्वत:ला शहाणा समजून इतरांना वेड्यांत काढीत असतो. ही मौज कशी होते हें समजण्याला आजच्या महाराष्ट्रांत फारसे आयास पडूं नयेत असें वाटतें. पण श्रीसमर्थ ह्मणतात :-

**करंटे मिळाले सर्वै । जो तो बुद्धि च सांगतो ।**
**सांगावे तें आपणाला । आपणु करितां बरें ।।**

आपण करावें आणि मग लोकांकरवी करवावें. आधीं स्वत: सरळ चालावें आणि मग पडतोय ह्मणून दुसऱ्यास बोलावें ! दुसऱ्याला उपदेश करण्याच्या भरांत मनुष्य स्वत:चा अधिकार विसरण्याचा संभव फार असतो, ह्मणून

**मनास बुद्धि सांगणे । जनास काय सांगणे ।।**

असा बोध लोकांना व्हावा ह्मणून श्रीसमर्थांनी मनाला उद्देशून हे श्लोक केले आहेत. बाकी त्यांना विचारल्यास ते याचें निराळें च उत्तर देतील. एकदां एकानें

त्यांना असा प्रश्न केला च कीं, महाराज, आपण या श्लोकांत मनाला च उपदेश कां केला आहे, आपला अधिकार फार मोठा असून आपण लोकांना उद्देशून या श्लोकांची रचना कां केली नाही ? त्यावर अनंतकोटीब्रह्मांडनायक श्रीसमर्थ रामाच्या दासांनी जें उत्तर दिलें तें, हे मना,तुझ्यासारख्या ज्ञानलवदुर्विदग्धाने मनन करण्यासारखें आहे.

**ह्मणे दास लोकांस मी काय सांगो ।**
**तराया जनीं मी चि कासेसि लागो ।।**
**बरीं साक्षपें औषधें वाढवावीं ।**
**जया लागला रोग तेणें चि घ्यावीं ।।**

श्रीसदुरुसमर्थचरण केव्हां दिसतील असा ज्यांना हृद्रोग लागला आहे, कृपामूर्ति श्रीसदुरु केव्हां भेटतील या चिंतेने मन उद्विग्न होऊन ज्यांना प्रत्येक क्षण युगासम भासत आहे, श्रीसदुरुदर्शनावांचून वय व्यर्थ चाललें आहे अशी ज्यांच्या जीवाला सारखी तळमळ लागली आहे, त्यांनी हें औषध घ्यावें, त्यांनी हे श्लोक वाचावेत, त्यांचे मनन करावें, ह्मणजे त्यांच्या रोगाचा परिहार होईल, त्यांचे मन सुप्रसन्न होऊन काळाचें भान त्यांना राहणार नाहीं व जीवाशिवाची भेट होऊन त्यांच्या जन्माचें सार्थक होईल !

मनाला च उपदेश करण्याचें आणखी एक कारण आहे.

**मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।।**

बंधन किंवा मोक्ष याला कारण मन च होय.

**मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ।।**

अशी भावना मनानें केल्यास मनुष्य आपला आपण च शत्रु होऊन जीवपणें बद्ध होतो, परंतु त्या च मनानें

**आपण वस्तु मुळीं येक । ऐसा ज्ञानाचा विवेक ।।**

केला ह्मणजे मनुष्य जन्ममरणापासून सुटून मुक्त होतो. हें जर खरें आहे, जीवाला पाताळांत नेऊन टाकण्याचा किंवा स्वर्गाला घेऊन जाण्याचा अधिकार जर मनाचा आहे, तर त्या मनाला केव्हां नाना गोड शब्दांनी आळवून तर केव्हां अनेक कष्टप्रद



साधनांनी मारून त्याला स्वाधीन करून घेऊन जीवानें आपला उद्धार करावा हें च योग्य होय. श्रीसमर्थ शिकवितात :-

**जनीं मनावाचुनि सूख नाहीं । मनें चि लाभे गुज सर्व कांही ।**
**परंतु ते स्वाधीन हो करावें । निरूपणें मानस आवरावें ।।**
**बरीं साक्षपें औषधें वाढवावीं ।**
**जया लागला रोग तेणें चि घ्यावीं ।।**

अया श्लोकाचा अर्थ करणें कदाचित् सोपें असेल; पण अचपळ मनाला आवरणें अत्यंत कठीण आहे.

**ब्रह्मादिकां मानस आवरेना । नाना उपायीं मरतां मरेना ।**
**तें निर्गुणीं पांगुळतां मरावें । निरूपणें मानस आवरावें ।।**

कांहीं हि करून मनाला आवरले पाहिजे ! मन जोंवर ताब्यांत आलें नाहीं तोंवर ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी फोल होत ! ह्मणून मनाच्या श्लोकांची प्रवृत्ति होय.

आपले शिष्य साऱ्या राष्ट्रभर भिक्षेला निघाले ह्मणजे लोकांची प्रवृत्ति परमार्थमार्गाकडे वळविण्याचे कामीं त्यांना उपयोगीं पडावेत ह्मणून श्रीसमर्थांनी हे श्लोक केले. सर्व राष्ट्रभर संचार करून प्रत्येक घरापुढें खड्या आवाजांत एक एक मनाचा श्लोक ह्मणून श्रीरघुवीरसमर्थांचा जयजयकार करावयाचा व जरूर तेवढी च भिक्षा संतुष्टपणें घेऊन श्रीस्थळीं उत्सवाची सांगता करावयाची, असा श्रीसमर्थशिष्यांचा क्रम होता ! अवघ्या राष्ट्राचे अंतःकरण श्रीरामोपासनेकडे वेधून घेण्याचें कार्य या श्लोकांनी कसें केले असलें पाहिजे. आपल्या थोर पूर्वजांनी आक्रमिलेल्या परमार्थमार्गांची ओळख, या श्लोकांच्या द्वारें, श्रीसमर्थांनी साऱ्या राष्ट्रास करून दिली. सर्व साधुसंत या च मार्गानें गेलेले आहेत. महा जनांनी घालून दिलेला असा हा पथ सोडून देऊन निराळी च वाट शोधून काढण्याच्या भरीस वेडा जीव लागेल तर तो खड्यांत पडेल यांत शंका नाहीं.

पूर्वजांनी स्वीकारलेला असा हा राघवाचा पंथ तरी कोणता, तो हे मनाचे श्लोक वाचल्यानें समजेल; ह्मणून या श्लोकांत मनाला जो बोध केला आहे, तो सारांशरूपाने

आपण येथें देऊं. गणेश व शारदा यांना नमन करून व राघवाचा अनंत पंथ आपणांस कळो अशी पहिल्या श्लोकांत प्रार्थना करून श्रीसद्गुरुसमर्थ मनाला बोध करितात :

हे मना, (२) तूं साधुसंतांनीं चोखाळलेल्या भक्तिमार्गानें जा; त्यासाठी तुझें आचरण आधीं शुद्ध पाहिजे, सत्पुरुषांनी निंदिलेले आचरण वर्ज कर, त्यांनी वंदिलेले आचरण कर; (३) प्रात:काळी उठत जा, रामाचे चिंतन कर, भजन कर, (४) पापवासना धरूं नकोस, विचार आणि नीति सोडूं नकोस, (५) विषयांची कल्पना करीत जाऊं नकोस, (६) कामक्रोधादि रिपूंना जिंक, (७) धैर्य धर, लोकांची बोलणीं सोस, स्वत: गोड बोलत जा, (८) सज्जनाकरिता चंदनाप्रमाणें देह झिजीव, मागें कीर्ति ठेवून जा, (९) स्वार्थबुद्धि सोड, (१०) किती हि संकटे आलीं तरी सुख मान; (११) नाहीं तरी, मना, निर्भेळ सुखी असा कोण आहे ? स्वपूर्वार्जित कर्माप्रमाणें जो तो सुखदु:खे भोगीत असतो; (१२) देह तो च मी या बुद्धीनें सुख कसे होईल ? (१३) हे मना, वैभवाला भूलूं नकोस, दुष्ट वासना धरूं नकोस, हें सर्व वैभव नश्वर आहे; चौदा चौकड्यांचा राजा रावण आज कोठें आहे ? (१४-१७) जन्मास आला तो मेला, हा मुळीं मृत्युलोक च आहे; पण पहा, तरी देखील, जो तो कसा गर्वांत चूर आहे ! सर्व च मरणार तेथें कोणीं कोणासाठी रडावें ? तात्पर्य (१८) मना, फक्त श्रीरामाचे ठिकाणीं लक्ष ठेव, (१९) सत्य बोल, असत्य सोड, (२०-२१) श्रीरामाची कास धर, सामान्य जनाप्रमाणें वायफळ भाषणांत कालक्षेप न करितां सर्वकाळ श्रीरामनामस्मरण कर; (२६) देहाला कष्ट होतात ह्मणून मागें सरूं नकोस; आज नाही उद्यां देह पडणार च; (२७-२८) कोदंडधारी राम तुझें रक्षण करण्यास समर्थ असतां, वेड्या, प्रपंचाची काय भीति बाळगतोस ? (२९) भक्ताचें रक्षण करणें हा तर श्रीरामाचा बाणा आहे; भक्तकैवारी रामानें दासाची कधीं हि उपेक्षा केली नाही; (३०) त्या रामाचा अंकित हो, ह्मणजे मग तुझ्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? (३१) रामाने देवांना बंधमुक्त केले, (३२) अहल्येचा उद्धार केला, (३३) मारुतीबिभीषणांना आकल्प चिरंजीव केले, तो तुझी उपेक्षा करील काय ? मना, कर निश्चय (३४) आणि हो रामाचा अनन्य भक्त; (३५-३७) राम कोठें आहे अशी शंका घेऊं नकोस, तो सर्वत्र आहे; अरे, तो नेहमीं तुझ्या जवळ आहे; तूं एकदांचा मनाचा धडा कर कीं, तो धांवून आलाच



समज; (३८-४१) मना, नको आतां अनुमान करूंस, चंचलता सोड, श्रीरामचरणीं चित्त ठेव, नको वणवण करूंस (४२) मना, तुला किती सांगूं रे ? काय पाहिजे तें कर, जीवाचा अत्यंत अट्टाहास कर, पण राम आपलासा करून घे; (४३-४५) इतर नाद सोड, रामांवाचून कांही बोलूं नकोस, राम घरीं नसेल तर वनांत जां; अरे,या प्रपंची जनांच्या संगतीपासून कधीं कोणाचे कल्याण झालें आहे काय ? (४६) एक क्षण रामावांचून दवडू नकोस, ह्मणजे मग प्रपंच करण्याला तुला अवसर च मिळणार नाहीं; (४७-४८) जिकडे तिकडे राम भरला आहे, त्याच्या कारणीं सर्व देह झिजीव; (४९) बापा, बोलण्याप्रमाणें चाल, (५०) ब्रह्मचर्य पाळ, (५१) मद, मत्सर, स्वार्थबुद्धि व प्रपंच सोड, (५२) तत्त्वचिंतनांत काळ घालीव, (५३) कोणाला दुखवूं नकोस, कालत्रयी असत्य बोलूं नकोस; (५४-५६) बापा, तारुण्य निघून गेल्यावर यांतलें कांही व्हावयाचे नाही बरें ? तारुण्य आहे तों च लागवेग कर, अरण्यांत जा, भक्तीनें देवाला आळीव; तो फार दयाळू आहे रे; (५७) नित्य नियमानें कर्मे करीत जा, उपासनेला चालीव, (५८-६५) विषयांची वासना करूं नकोस, उदासीन रहा, निष्काम भजन कर; कामनेनें देव जोडणार नाही, उलट दु:ख मात्र होईल; रामावांचून कसली कामना करतोस ? राम आपलासा झाल्यावर तुला काय कमी आहे ? वेड्यासारखें करूं नकोस, घरादाराच्या नादीं लागून फुकट रडशील; (६६) या संसारापासून कोणाला सुख लागलें आहे ? तेव्हां सोड त्याची आशा आणि करी रे मना ध्यान या राघवाचे; (६७-७०) प्रतापी रामाचा छंद घे, त्याच्यापुढे कोणाचें कांही चालत नाहीं; त्याचें अहर्निशी चिंतन कर, त्यांत तुझें कल्याण आहे; गर्वाचा त्याग कर, आळस सोड, (७१) नामस्मरण कर, (७२) नामस्मरणासारखें सोपें साधन नाहीं, (७३) त्यांत देहाला कष्ट नाहींत, (७४) त्यास द्रव्याची जरुरी नाहीं; (७५) सर्व साधनांत नामस्मरण हें श्रेष्ठ साधन आहे; संशय सोड; (७६) विश्वास धर; (७७) राघवाची इच्छा कर, राघवाचें ध्यान कर, राघवाचा छंद घे, ह्मणजे तूं रामरूप होशील; (७८) रामावर ज्याचा विश्वास नाहीं त्याला सुख नाही; (७९) मना, तूं रामाचें चिंतन कर, प्रपंचाची चिंता सोड, प्रपंच नुसता भ्रम आहे; (८०) वाटल्यास प्रपंच कर, पण त्याचे ठिकाणी आसक्त होऊं नकोस; (८१) सर्व सत्पुरुषांनी नामस्मरण हें च साधन प्रतिष्ठिलें आहे, त्यांचा मत्सर करूं

नकोस, या साधनासारखें दुसरें साधन नाही; (८२) रामासारखें दुसरे नाम नाही, (८३)प्रत्यक्ष मदनारि श्रीरामाची उपासना करितात; (८४) विठ्ठलाचें मस्तक महादेव, व त्या महादेवाला ध्यास रामाचा; (८५-८६) असा राम ज्यानें मुखी धारण केला, त्याला विश्राम आहे; एरव्ही दुःख आहे; (८७) रामापुढे कामाचें कांही चालत नाही; (८८) रामनामस्मरण हा च आमचा मोक्ष; (८९) अतएव, अखंड नामस्मरण करावे; (९०) वेद, शास्त्रें, पुराणें हें च सांगतात. (९१) याहून सोपें साधन कोठून आणावें ? (९२) नामस्मरण करणारा सर्व दोषांपासून मुक्त होतो; (९३) असें, हे मना, हें साधन सोपे असून, तुला ते करण्याला इतकें संकट काय पडलें आहे रे ? (९४) रामनामस्मरणाचा छंद प्रत्यक्ष शंकर पार्वती यांना लागलेला आहे; (९५) चुकून नामस्मरण घडलें तर अजामिळ व कुंटणी हीं तरली; (९६) प्रल्हादाची कथा तुला ठाऊक आहे च; (९७) तेव्हां, आतां अभिमान सोडून श्रीरामनामाचा जप कर; (९८) फार काय सांगू रे, रामनामेंकरून धादांत पाषाण तरले तर मग काय, मना, तूं पाषाणाहून हि पाषाण आहेस काय ? (९९) शंकराची गोष्ट तुला कितीदा सांगू ? काशीस राहून श्रीरामनामाचा च मंत्रानुग्रह शंकर करीत असतात; (१००) मना, तुझ्याकडून धड कर्म होईना, धर्म होईना आणि मुखी नाम हि येईना; तेव्हां आतां तुला ह्मणावें ? (१०१-१०२) तुला आता इतकें च सांगतों की, जो नामस्मरण न करीत त्यास यमयातना भोगाव्या लागतील; ह्मणून तरी, मना ऐक रे; आणि श्रीगुरुचरणीं लीन होऊन, घे रामनामस्मरणाचा छंद.

(१०३) हे मना, हरिकथानिरूपण चालूं असतां चित्त एकाग्र कर, देहभाव विसरून जा; परद्रव्य आणि परकांता यांचा अभिलाष करूं नकोस; (१०४-१०५) बोला ऐसे वर्तावयाचे नसेल तर बोलूं नकोस, बोलशील तर बोलण्याप्रमाणे स्वत: चाल; (१०६) स्नानसंध्यादि कर्मे जेथल्या तेथे कर; (१०७) कोप सोड, सत्संग धर, दुर्जनांचा संग त्याग, (१०८-११५) व्यर्थ वादांत पडूं नकोस, अहंकार सोड; ऐक मी काय ह्मणतो तें; आजपर्यंत पुष्कळ सांगत आणि ऐकत आले आहेत, परंतु जों तो आपआपल्या घमेंडीत च चूर असतो; तूं असे करूं नकोस, गर्व सोड, बोलतोस तसें चाल.



(११६-१२५) हे मना, श्रीरामाची कास धर, अंबरीष, उपमन्यु, ध्रुव, गजेंद्र, आजामिल यांची उपेक्षा भगवंताने केली नाही; भगवंताचे दहा हि अवतार तरी भक्तांसाठी च होत; विधीसाठी मत्स्य, देवांसाठी कच्छ, भूदेवीसाठी वराह, प्रल्हादाकरितां नृसिंह, इंद्राकरितां वामन, ब्राह्मणांकरिता परशुराम, अहल्या व कारागृहांत पडलेले देव यांच्या करितां राम, द्रौपदीसाठी कृष्ण, मनुष्याकरितां बौद्ध, असे अनाथांच्या रक्षणाकरितां अवतार होऊन गेले आहेत व पुढें कलंकी अवतार होणार आहे; (१२६) अशा प्रकारें अनाथ जनांकारणे लीलेने अवतार घेणारा जो भक्तवत्सल प्रभु त्याला जे ओळखत नाहीत ते पापी होत.

(१२७) दासाभिमानी श्रीरामाचा ज्याला ध्यास लागला आहे, तो धन्य होय ! (१२८) यासाठी, मना, सत्संग धर, (१२९) सत्संगाचा महिमा अगाध आहे; सत्संगामुळे कामबाधा होणार नाही; (१३०) बा मना, रमाकांत येकांत काळी भजावा; (१३१) भजन करण्याला श्रीरामासारखा देव नाही; (१३२) मना, विचार, आचार आणि उच्चार शुद्ध ठेव; (१३३) अशा शुद्ध क्रियावान् भक्ताची योग्यता काय सांगावी ? त्याच्या नुसत्या दर्शन - स्पर्शनानें पुण्य लागतें व भाषणानें संदेह हरण होतो; (१३४) असा जो योगी असतो, तो वीतरागी, क्षमाशील, शांत, दयाशील, दक्ष असतो; त्याला कशाचा लोभ नसतो आणि ह्मणून त्याचा कधी क्षोभ हि होत नाही, तो दैन्यवाणा नसतो; (१३५) तर हे मना, अशा सत्पुरुषांची संगति धर.

(१३६) असे हे सत्पुरुष निर्भय असतात, कारण भयाला कारण जो द्वैतभाव तो च मुळी त्यांचा नष्ट झालेला असतो; (१३७०१४३) श्रेष्ठ पुरुष हें च सांगत आले आहेत; पण देहबुद्धि कांही सुटत नाही आणि त्यामुळें आपल्या थोर पूर्वजांनी आपल्यासाठी ठेवलेलें आत्माख्य धन हाती येत नाही; तें जुनें ठेवणें कोठें पुरलेले नसून हि देहबुद्धीच्या योगेंकरून याला तें दिसत नाही; काय चमत्कार आहे ? याचें ठेवणें याच्या च जवळ असून हा भ्रमांत पडला आहे; भ्रमाला कारण त्रिगुण; ह्मणून मना, तूं निस्त्रैगुण्य हो; गुरु कर ह्मणजे तुला हें कळेल, एरव्ही कळणार नाही, एरव्ही तुझा संशय जाणार नाही, अहंता गळणार नाही, उमज पडणार नाही, खऱ्याखोट्याचा

तुझा श्रीसद्गुरुवांचून निर्णय होणार नाही; (१४४) हे मना, विचार कर ह्मणजे तुला हें कळेल व तुझा भ्रम दूर होईल; (१४५) मना, विषयांचे चिंतन सोाडून स्वरूपाचें चिंतन कर; (१४६-१४७) दृश्य हें अशाश्वत आहे, स्वरूप शाश्वत आहे, तें एकमेवाद्वितीयम् आहे; (१४८-१५१) विचार कर, शोध कर, ह्मणजे तूं तत्स्वरूप होशील ! तें स्वरूप या डोळ्यांनी दिसणार नाही; त्याला रूप नाही, रंग नाही, ते व्यक्त नाही, अव्यक्त नाही; मना, सद्गुरुवचनी विश्वास ठेव, त्यावांचून तुला तें कळणार नाहीं; (१५२-१५३) नुसतें शब्दज्ञान व्यर्थ होय, निश्चयात्मक ज्ञान पाहिजे, त्यासाठी सत्संग पाहिजे, तर च समाधान होईल; (१५४) शब्दज्ञान कांहीं अंतिम साध्य नव्हे, बोलूनचालून च हा गहन विषय आहे; (१५६) स्वरूप समजलें नाही असें समज; कारण तूं च मुळी तद्रूप असतां, मला तें समजले असे ह्मणणारा तूं निराळा कोण ? (१५७-१५८) शास्त्रें पुष्कळ आहेत व त्यांच्यात मतभेद हि बहुविध आहेत, तेव्हां त्यापासून कांहीं निश्चय व्हावयाचा नाही; तूं जाणीव टाक; (१५९) ही जाणीवरूप मक्षिका तुला ज्ञानामृत भोजन पचूं देणार नाही; (१६०) ती जाणीव जोपर्यंत तूं सोडली नाहींस तोपर्यंत लोकांस उपदेश करण्याच्या भरीस तूं विनाकारण पडूं नकोस; (१६१-१६२) अहंता सोड, कीं पहा, आनंदाव्यतिरिक्त दुसरें कांही नाही; एरव्ही तुझ्या ज्ञानाच्या गोष्टी व्यर्थ होत; सर्व दुःखास कारण अहंता, ती टाक; मी ह्मणतों तें खरें की खोटें याचा हे मना, तूं आपल्याशीं च विचार करून पहा; (१६३) खरें हित, या अहंतेच्या पलिकडे आहे; तें हित व्हावें ह्मणून सदां सज्जनाची संगति धर; (१६४) हे मना, देहबुद्धीच्या ठिकाणी आत्मबुद्धि स्थापित कर व अखेरीस आत्मबुद्धि हि स्वरूपी लीन करून सोड; (१६५) काय सांगू रे मना, देहादिकाची चिंता केल्यास लोभ सुटतो, लोभापासून क्षोभ उत्पन्न होतो व क्षोभापासून पुनरपि जननं पुनरपि मरणं मागे लागतें; ती च श्रीरामाची चिंता केल्यास, तू निष्काम होऊन जन्ममरणापासूनि की रे सुटशील ! (१६६) स्त्रियापुत्रमित्रादिकांचा मोह हा देहबुद्धाचा च विस्तार आहे, तो मोह सोड; (१६७) श्रीरामचिंतनावांचून एक क्षण राहू नकोस; (१६८) स्वार्थ सोड, उपाधीचा त्याग कर, सज्जनांना उपाधी बाधत नाहींत हें खरें, पण तूं साधक आहेत तोंवर तरी उपाधीत पडूं नकोस; उपाधीच्या योगे तुझी देहबुद्धि मात्र वाढेल; (१६९) प्रपंच सोड, (१७०) ज्ञानाने देहबुद्धि



झाड, प्रयत्न कर; (१७१) या डोळ्यांनी तें स्वरूप दिसणार नाहीं; (१७२) शुद्ध कल्पनेनें अशुद्ध कल्पना उडवावी व मग शुद्ध कल्पना हि स्वरूपी लीन करावी; (१७३) अहंकाराच्या योगानें स्वरूपसाक्षात्कार होणार नाहीं; (१७४) स्वरूपसाक्षात्कारापासून अक्षय सुखाची प्राप्ति होते; (१७५-१७६) ब्रह्मा, विष्णु, महेश, रुद्र, शक्र यांना निर्माण करणारा तो मुख्य देव; (१७७) तो तुटत नाही, फुटत नाही, चळत नाही, ढळत नाही, या डोळ्यांनी दिसत नाही, मीपणाने कळत नाही; (१७८) बाकी मग, इतर देव पुष्कळच आहेत व ज्यांची ज्यावर भक्ति बसते, त्याला तो च देव मोठा वाटतो; (१७९) परंतु सर्वात थोरला देव कोणता त्याचा कोणी च विचार करीत नाही; व गुरूवांचून तो कळणार हि पण नाही, (१८०-१८३) पण मग, आतां गुरु तरी कोणाला समजावें ? अडक्याचे तीन मिळणारे गुरु तर पुष्कळ च आहेत, परंतु मोक्षदाता सद्गुरु तो वेगळा च होय; (१८४) अशा सद्गुरुकृपेनें च कळणारी गोष्ट, मना, मी आतां तुला कशी सांगूं ? (१८५) बा मना, श्रीरामस्वरूपी लीन हो रे ! कायमचा च तेथे रहा, तेथून ढळूं नकोस, तद्रूप हो कसा ! (१८६-१९०) श्रीराम सर्वदा तुझ्या जवळ अन केवळ अहंकारामुळे तुला त्याची भेट होत नाही रे ! ह्मणून तो अहंकार आतां सोड; ज्ञानशस्त्राने तो अहंकार खुडून टाक; श्रीरामस्वरूपाची तूं जी कल्पना करीत आहेस, ती कल्पना हि अखेरीस निमाली पाहिजे; (१९१) तात्पर्य, देहबुद्धि सोड; देहबुद्धि आहे तोंवर स्वरूपसाक्षात्काराची आशा नको; (१९२) तें स्वरूप अद्वितीय असल्यामुळे त्याला देण्याला दृष्टांत नाही, (१९३) श्रुतींना देखील त्याचें यथार्थ वर्णन करवलें नाही; (१९४-१९५) तो देव आपल्या हृदयांत आहे ह्मणतात, पण देह पडल्यावर मग तो देव कोठें जातो, असा साधकाचा प्रश्न आहे; त्याचे उत्तर इतके च की तो देव सर्वत्र च असल्यामुळे त्याला जाणे येणे कांही नाही; (१९६-१९८) त्या देवावांचून रिकामे असे स्थळ नाही, विभक्तपणें त्याला पाहता येत नाही, त्याला पहावयाचें ह्मणजे तद्रूप च झालें पाहिजे; त्याला केव्हां केव्हा आकाशाचा दृष्टांत देतात, पण तो बरोबर लागूं पडत नाही; (१९९) असें तें स्वरूप पुरातन व विस्तीर्ण आहे; त्याची कल्पना करवत नाही; ते तत्काळ कळतें; ह्मणून मना, स्वामींचे चरण घट्ट धर; (२००) श्रीसद्गुरुकृपेनें त्या स्वरूपाचा साक्षात्कार झाला ह्मणजे तुर्यावस्था आटते,

मन उन्मन होतें व शब्द कुंठित होतो; असा, हे मना, तो गे तो चि तो राम सर्वत्र पाहें; (२०१) त्या रामाची आळख झाल्यावर आतां, हे मना, द्वैताला अवकाश कोठें आहे ? मना रे, धन्य तुझी ! फार दिवसांनी कां होईना, पण श्रीरामचरण एकदांचे तुझ्या दृष्टीस पडले ! तुझ्या आनंदाला आतां पारावार नाही ! (२०२-२०४) हे मना, असें हे गुह्य ज्ञान जरी तुला झालें, तरी नित्य श्रवणाने ते दृढ कर; त्यासाठी, मना, इतर सर्व संग सोडून सत्संग धर, ह्मणजे साधनावांचून तुला सन्मार्ग लागेल व मोक्षप्राप्ति होईल; (२०५) असे हे मनाचे श्लाक जो कोणी श्रवण करील, त्याचा श्रीसद्गुरुवचनी दृढ विश्वास मात्र पाहिजे, ह्मणजे तो क्रमानेक्रमाने बद्धाचा मुमुक्षु, मुमुक्षूचा साधक व साधकाचा सिद्ध होऊन ज्ञानवैराग्यसामर्थ्य यांनी संपन्न होईल !

वरील सारांशावरून वाचकांच्या इतकी गोष्ट लक्षांत येईल की, श्लोक त्रिकांडात्मक आहेत. या २०५ श्लोकांपैकी कांही कर्मपर, कांही उपासनापर व कांही ज्ञानपर आहेत. अगदी स्वतंत्र असे तीन भाग जरी करीतां आले नाहीत, प्रत्येक कांडांत इतर दोन्ही कांडांचे कांही कांही श्लोक आले आहेत हें जरी खरे आहे, तरी श्लोक १ ते ६६ बहुधा कर्मपर आहेत, ६७ ते १३५ उपासनापर व १३६ ते २०५ ज्ञानपर आहेत, असे स्थूल मानानें ह्मणण्यास हरकत वाटत नाही. १ ते ६६ पर्यंत श्लोकांनी परमार्थमार्गाकडे मनाचा ओढा लावला आहे, ६७ ते १०१ त श्रीरामाची थोरवी गाऊन नामस्मरण करावयास लाविले आहे. १०२ ते ११५ त वर्तनाचे कांही नियम ठरवून दिले आहेत, ११६ ते १३५ त श्रीरामाचे भक्तवात्सल्य मनावर प्रतिबिंबीत केले आहे आणि १३६ ते २०५ त आत्मज्ञानाचा बोध करून जीवास ज्ञानवैराग्यसमार्थ्यसंपन्न केले आहे.

**त्रिकांड वेदे बोलिला । उदंड अर्थ चालिका ।**
**बुझेल तो भला भला । जनीं महंत शोभला ।।**

हा च उपदेश श्रीसमर्थांच्या सर्व ग्रन्थांतून आहे. श्रीमत् दासबोधांत काय, या श्लोकांत काय किंवा श्रीसमर्थांच्या इतर कवितेंत काय,

**आधीं तें करावें कर्म । कर्ममार्गे उपासना ।**



**उपासकां सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्ष चि पावणें ।।**

हा च क्रम दिलेला आहे. प्रथमत: आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणे जी जी विहित कर्मे सांगितली आहेत ती यथासांग करावी, तर च साधकाची मनोभूमि श्रीसद्गुरुचरणचिंतनाला योग्य होईल आणि मग साधक एकदां श्रीसद्गुरुभक्त बनला ह्मणजे तो ज्ञानाचा अधिकारी होऊन, ज्ञानाचे फल जें कैवल्य, ते त्यास प्राप्त होईल असा बोध या श्लोकांपासून होतो आणि ह्मणून च

**वेदाचें जें गुह्य । शास्त्राचें जें सार ।।**

असें या श्लोकांचें अधिकारी पुरुषांनी स्तवन केले आहे.

बध्दाचे ठिकाणी मुमुक्षुत्व उत्पन्न होण्यासाठी बध्दाला श्रीमत् दासबोधांत जो उपदेश केला आहे तो च या हि श्लोकांत संक्षेपानें आला आहे. बंधमोक्षाला कारण होणाऱ्या मना, तूं जो प्रपंचांत सारखा धडपडत आणि तळमळत असतोस तो काय ह्मणून ? हे मना, तूं विचार करून पाहशील तर तुला कळण्याला कांही कठीण जाणार नाहीं की, ही मुळी मृत्युभूमि आहे, **येथे जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ।।** अरे मना, महा थोर ते मृत्यपंथे चि गेले, कोणी उरला नाही, असा हा नश्वर देह आहे, त्याच्या रक्षणासाठी किती हि धडपड केली तरी वेळ आली आली की तो काळमुखी पडणार च. ही जशी तुझ्या देहाची स्तिती, त्याच प्रमाणे ज्यांना तूं आपली ह्मणून ह्मणतोस त्या माणसांची हि स्थिती होय. वेड्या मना,

**कर्मयोगें सकळ मिळाली ।**
**येके स्थळी जन्मास आलीं ।**
**ते तुवां आपुली मानिली ।**
**कैसी रे पढतमूर्खा ।।**

असा दासबोधांतील व मनोबोधांतील हृदयांत ठसणार बोध श्रवण करुन, बध्द

**ह्मणे आतां पुरे सोस । संसारीचा ।।**
**प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निर्फळ ।**
**आतां कांही आपुला काळ । सार्थक करूं ।।**

असा पश्चात्ताप बध्दाला झाला ह्मणजे त्याची बध्ददशा संपली ह्मणून समजावें! मग, क्रमाक्रमाने कर्म, उपासना, ज्ञान यांचा तो अधिकारी होऊन त्याच्या जन्माचे सार्थक होतें.

याशिवाय या श्लोकांत (१) अनन्यभक्तीचा महिमा, (२) श्रीरामनामस्मरणाचें महत्व, (३) सत्संगाची थोरवी, (४) विचार, आचार आणि उच्चार यांची एक वाक्यता, (५) इंद्रियदमनाची आवश्यकता, (६) परोपकारबुध्दि, (७) वितंडवादाचा फोलपणा, (८) विचार, विवेक, यांची श्रेष्ठता, (९) श्रीसदुरूची लक्षणे,. (१०) श्रीरामाचे ब्रीद, (११) श्रीरामाचे रूप, इत्यादि जे अनेक विषय परोपरीनें आले आहेत, त्यांचा विचार करणे वाचकांवर च सोंपवितो.

वरील विवेचनावरून आपल्या इतकें लक्षांत आलें असेल की, श्रीसमर्थांच्या सर्व ग्रन्थांचे सार ह्मणजे हे २०५ श्लोक होत ! जन्मास येऊन दुसरें कांही न केलें आणि हे अवघे दोनशें पांच श्लोक श्रीसदुरुचरणापाशीं नित्य नियमाने वाचले, त्यांचे चिंतन केले, त्यांना अखंड हृदयांत सांठविले किंवा त्यांची माला कंठी धारण करून प्रसंगानुसार एक एक मणी ओढीत राहिले तरी जन्माचे सार्थक होणार आहे! असे हे श्लोक अत्यंत गोड आहेत, पवित्र आहेत, प्रेमळ आहेत, तल्लीन करणारे आहेत, भक्तिरसोत्पादक आहेत, धीर देणारे आहेत, साधनावांचून सन्मार्ग दाखविणारे आहेत ! यापेक्षां त्यांचे जास्त वर्णन करण्याची पाति माझ्या ठिकाणी त्याला मी काय करूं ? मी त्यांचे वर्णन करूं शकलो इतकी च त्यांची योग्यता असे कोणी हि समजूं नये. मी ह्मणतो त्याहून अनंत पट योग्यतेचे हे श्लोक आहेत. ब्रह्मस्वरूप जरी माझ्या प्रत्ययास आले नाही, तरी ते अनिर्वाच्य आहे ह्मणून सर्व सत्पुरुष सांगतात तसें च तें असावें, असें आतां माझ्या अनुभवास येतें; कारण माझ्याच्यानें या श्लोकांच्या हि यथार्थ स्वरूपाचे वर्णन होईना ! मला सलज्ज करणारी माझी ही वाग्दुर्बलता प्रांजलपणे कबूल करून स्वत: श्रीसदुरुसमर्थ या श्लोकांविषयी काय ह्मणतात, तें च वाचकांस सादर करून ही प्रस्तावना संपवू.

**मनाची शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती ।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य आंगी । ह्मणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ।।**



जो कोणी मनाचे श्लोक सदुरुवचनीं विश्वास ठेवून श्रध्दापूर्वक श्रवण करील, तो किती हि जरी मूढ असला, तरी तो सर्व दोषांपासून मुक्त होऊन भक्तिपंथाकडे वळेल व क्रमाक्रमाने ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य, यांनी युक्त होत्साता अखेरीस मोक्षाचा अधिकारी होईल ! अशी ज्या श्लोकांची महति श्रीसदुरुसमर्थ स्वत:गात आहेत, त्या श्लोकांचा छंद साधकांस लागून अज्ञान, लोलंगता, दुर्बलता ही समूळ विलयास जावोत अशी प्रार्थना आहे !

## उपसंहार

श्रीकल्याणस्वामींच्या हातच्या बाडावरून हे श्लोक छापले आहेत. ते २०५ आहेत. आजपर्यंत प्रकाशित प्रतींतून २१० श्लोक असत, पण त्यांपैकी ५ प्रक्षिप्त होत, या विषयी शंका नको. सर्व मठांतून मनाच्या श्लोकांच्या हस्तलिखित प्रती आहेत, पण कोणत्या हि प्रतीत २०५ हून अधिक श्लोक नाहींत; श्रीकल्याणस्वामींनी शेवटी **इति श्री मनाचे श्लोक संपूर्ण दोनीसें पांच समाप्त** असे स्वहस्तानें लिहिलेलें आहे, **दोन शतें पांच श्लोक हे जाण** असें यशवंतस्वामी आरतींत स्तवन करितात व मग मनबोध केले श्लोक पूर्ण । **दोन शतें जाण पांचागळें ।।** असें शिरगांवमठपति भीमस्वामी श्रीसमर्थ चरित्रांत (श्रीरामदास आणि रामदासी ग्रन्थमाला भाग २ अभंग ११९ पहा) ह्मणतात. तात्पर्य श्रीसमर्थांचे मनाचे ह्मणून २०५ श्लोक होत.

श्लोकांखाली ज्या टिपा दिल्या आहेत त्यांसंबंधाने इतकें च ह्मणावयाचें की, त्या देण्याचा देणाराला लवमात्र अधिकार नाही; परंतु श्री रामदास आणि रामदासी मालेंत हे पुष्प स्वतंत्रपणें ओंवायाचें ठरल्यामुळे त्याला टिपा देण्याचे अधिकाराबाहेरचे काम करावे लागले आहे. बाकी टिपा देण्यांत तरी त्याने विशेष काय केलें आहे ? श्री गन्थराज दासबोध आदिकरून श्रीसमर्थकवितेचा टिपा देणाराला जसा अर्थ समजला त्या अनुरोधाने होतां होईतों श्रीसमर्थ वचनांचा च आधार घेऊन श्लोकांचा अर्थ करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे; कांही थोड्या ठिकाणी श्री श्रेष्ठांचा व इतरांचा त्याने आश्रय केलेला आहे. तात्पर्य, कांही तरी आधारावांचून अर्थ केला

अशी स्थळे बहुधा नाहीत. अर्थात् टीकाकाराला श्रीसमर्थकवितेचा जसा बरावाईट अर्थ समजला असेल त्या मानाने त्याने केलेला श्लोकांचा अर्थ बरोबर किंवा चुकीचा असणार. शिवाय टिपा इतक्या विपुल दिलेल्या दिसतात की, त्या केवळ बालांच्या च उपयोगी पडाव्या असे धोरण दिसते, थोरांना त्यांचा काही उपयोग दिसत नाही. अशा स्थितीत टिपांवर फारसा भार न टाकतां, प्रत्येकाने

**अखंड येकांत सेवावा । ग्रन्थमात्र धांडोळावा ।**
**प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनी ।। १८-३-२०**

हें च खरे.

शके १५७१ त श्रीरामाच्या ज्या मूर्ति श्रीसमर्थांनी अंगापूरचे डोहांतून काढून श्रीक्षेत्र चाफळ येथे स्थापन केल्या, त्या मूर्ति प्रतिवर्षी फाल्गुन वद्य ११ पासून ३० पर्यंत गाभाऱ्यांतून बाहेर आणून चौखांबीत ठेवत असतात.त्याप्रमाणे परवां त्या बाहेर आणल्याअसतां त्यांचे चित्र घेऊन ते या ग्रंथाचे आरंभी दिले आहे. या तसवीरीचे महत्त्व श्रीसांप्रदायिकांस मी सांगावयास पाहिजे असें नाही.

**करी रे मना ध्यान राघवाचें ।।**

**श्री रामदास आणि रामदासी** ग्रन्थमालेंतील पहिले चार भाग ज्या आकाराचे आहेत, त्यापेक्षां या पाचव्यां भागाचा आकार मुद्दाम लहान धरला आहे; हेतु हा की, हे २०५ श्लोक कंठा धारण होईं तो पुस्तक रूपाने ते घरी, दारी, हिंडतां फिरतां जवळ बाळगावयास सोपें जावें. सहावा भाग ह्मणजें श्रीसद्गुरुभक्तिरसाचा केवळ अर्णव असा श्रीस्वानुभवदिनकर ग्रन्थ छापत आहे. तो विजयादशमीस श्रीकृपेने तयार व्हावा असा अदमास आहे.

धुळे
श्रीरामनवमी, १८३२

**शंकर श्रीकृष्ण देव**



।। श्रीरामसमर्थ ।।

## श्री रामदासांचे

# मनाचे श्लोक

## (सटीप)

**श्री रामदासांचे**

# मनाचे श्लोक

**श्रीराम**

**गणाधीश[१] जो ईश[२] सर्वा गुणांचा ।**
**मुळारंभ[३] आरंभ तो निर्गुणाचा ।**
**नमूं शारदा[४] मूळ चत्वार वाचा ।**
**गमूं पंथ आनंत[५] या राघवाचा ।।१।।**

१. शिवगणांचा आधीश.

२. षड्गुणेश्वर. **गणाधीश तो ईश सर्वां गुणेंसी।** (रामायण यु. कां. १०ह्न७४)

३. मुळारंभ ह्मणजे च तो निर्गुणाचा आरंभ. निर्गुणाला जेथे सगुणत्व प्राप्त झालें ती प्रथम भूमिका. **जो कर्तुत्वास आरंभ । मूळपुरुष मुळारंभ । जो परात्पर स्वयंभ। आदिअंती ।।** ७$\frac{1}{6}$

४. **शब्दमूळ वाग्देवता । माहं माया ।।**१ **तींही वाचा अंतरी आलें । तें वैखरिया प्रगट केलें । ह्मणौन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ।।**१$\frac{3}{14}$

५. **''सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म''**(पुढें श्लोक १४६ ते १५०,१६९,१८४ पहा).

६. प्रणवरूप आद्य गणेश व शब्दमूळ शारदा यांना नमन करून ब्रह्मस्वरूपाकार राघवाचा शाश्वत असा जो पंथ ताो आपणांस कळावा अशी या श्लोकांत प्रार्थना करून मनाच्या श्लोकांचा आरंभ केला आहे; व त्या प्रार्थनेप्रमाणें शेवटी सरासरी श्लोक १८४ पासून तों अखेरपर्यंत राघवस्वरूपाचा निश्चय झाला आहे.

$\frac{३}{10}$

**मना सज्जना[१] भक्तिपंथेंचि[२] जावें ।**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें[३] ।**
**जनीं[४] निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें ।**
**जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ।।२।।**

१. हें मनाचे विशेषण आहे. मन जात्या चंचल आहे; त्याला गोड शब्दांनी आळवून च भक्तिमार्गाकडे लाविलें पाहिजे. श्रीसमर्थांची शिकवण आहे च कीं, **दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे । सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी ।।** ११$\frac{9}{23}$

२. **श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद – सेवनं अर्चनं वंदनं दास्य सख्यमात्मनिवेदनम् ।।** असे भक्तीचे नऊ प्रकार आहेत. त्यांत **नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण । हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ।।** ४$\frac{9}{25}$ हे सर्व प्रकार समजण्यासाठीं श्रीदासबोधाचे नित्यनियमाने श्रवणमनन केलें पाहिजे.

३. सहज, तत्काळ. नवविध भक्तीमध्यें श्रेष्ठ जी आत्मनिवेदन भक्ति ती घडली ह्मणजे तत्काळ श्रीरामाचा साक्षात्कार होतो.
**आपणांस निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती । तयांस परामात्मा मुक्ती । तत्काळ देतो ।**८ श्रीदासबोधांतील ४ ह्न ९; ५ ह्न ६ ह्न ४६–५१; ८ ह्न ८; १२ ह्न ५; १६ ह्न २२ इत्यादि स्थळें पहा.

४. सर्व लोकांची चांगल्या वाईटाविषयी एकवाक्यता असते असें नाही. जी गोष्ट कांहींना चांगली वाटते ती च दुसऱ्यांना वाईट वाटते; तेव्हां जन ह्मणजे सामान्य लोक असा अर्थ न घेतां जनीं जनार्दन अशी ज्यांची वृत्ति झालेली असते ते सर्व जन घ्यावे. असे जन ह्मणजे सज्जन, साधुजन होत. सज्जनांची मात्र सत् आणि असत् याविषयी एकवाक्यता आहे. साधुजनांच्या मार्गानें जावे असा भावार्थ.

**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा[१] ।**
**पुढें वैखरीं राम आधीं वदावा[२] ।**
**सदाचार हा थोर सांडूं नये तो ।**
**जनीं तोचि तो मानवीं[३] धन्य होतो ।।३।।**

१ प्रभात काळी सर्ववृत्ति साहजिकपणें शांत असतात, त्यामुळें चित्ताची एकाग्रता होण्याला प्रात:काळ उत्तम. ह्मणून प्रभात काळीं एकाग्र चित्तानें श्रीरामाचे चिंतन करावें. (पुढील ६७ ते ७६ श्लोक पहा.)
**प्रात:काळी उठावें । कांही पाठांतर करावें । येथानशक्ति आठवावें। सर्वोत्तमासी ।।** ११$\frac{3}{15}$

२. पुढें ह्मणजे चिंतन झाल्यावर, आधीं ह्मणजे इतर व्यवहार करण्यापूर्वी, वैखरी ह्मणजे वाणीने, राम वदावा ह्मणजे श्रीरामाचें भजन करावें. असा अर्थ कोणी करितात व कांहीं हि भाषण करण्यापूर्वी प्रथम रामनामस्मरण करावें, असा अर्थ कोणी लावितात.

३. मानव, मनुष्य.

**मना वासना दुष्ट कामा नये रे ।**
**मना सर्वथा[१] पापबुद्धी नको रे ।**
**मना धर्मता[२] नीति सोडूं नको हो ।**
**मना अंतरीं सार[३] वीचार राहो ।।४।।**

१. सर्वथैव, मुळीच.

२. धर्मनिष्ठा, धर्मबुद्धि.

३. सत् शाश्वत्, सत्य. श्रीदासबोधाच्या ११ व्या दशकाच्या ४ थ्या समासांत सारविवेक सांगितला आहे तो पहावा.



**मना पापसंकल्प[१] सोडूनि द्यावा ।**
**मना सत्यसंकल्प[२] जीवीं धरावा ।**
**मना कल्पना[३] ते नको वीषयांची ।**
**विकारें घडे हो जनीं सर्व ची ची[४] ।।५।।**

१. **‘कोहं’ हा मिथ्या मायेचा विकल्प ।** ७$\frac{5}{4}$ किंवा द्वैत कल्पी अशी अशुद्ध, शबल कल्पना.

२. **‘सोहं’ हा सत्य ब्रह्माचा संकल्प ।** ७ किंवा अद्वैत कल्पी ती शुद्ध कल्पना.

३. **नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी**
आणि त्यांतल्या त्यांत विषयांची कल्पना तर, हे मना, करूं च नको.
**जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा । विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ।।**११ **।। सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ।।** ११$\frac{10}{62}$

४. विषयवासनेनें मन विकारी होऊन जगांत फजिती होते.
**ध्यायतो विषयान्पुंस: संगस्तेषूपजायते । संगात्संजायते काम: कामात्क्रोधोऽभिजायते । भ.गी. क्रोधाद्भवतिसंमोह: संमोहात्स्मृति विभ्रम: । स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।।**

**नको रे मना क्रोध[१] हा खेदकारी ।**
**नको रे मना काम[२] नाना विकारी ।**
**नको रे मदा सर्वदा[३] अंगिकारू ।**
**नको रे मना मछरू दंभ भारु[४] ।।६।।**

१. **क्रोध हा खेद संपादी । जेथें तेथें चहुंकडे । विवेक पाहातां कैचा । शुधी तेथें असेचिना** षड्रिपु . 3/2

२. या कामाच्या योगानें **रूपहानी शक्तिहानी । द्रव्यहानी परोपरीं । याती हानी कुळहानी । सर्व हानी च होत से ।।** ११

३. केव्हां हि.

४. भारी, मोठा, षड्रिपूंत दंभ हा मोठा शत्रु आहे. श्रीसमर्थांनी वर्णिलेल्या षड्रिपूंपैकी काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ या पांचांचा च उल्लेख या श्लोकांत आला आहे. श्रीसमर्थांचे ''षड्रिपु'' प्रकरण प्रत्येकाने आत्मशुद्धीचा हेतु धरून एकवार तरी वाचावें. (श्रीरामदासी मालेंतील तिसरा भाग, श्रीरामदासांची कविता, पान ३०८)

**मना श्रेष्ठ[1] धारिष्ट जीवीं धरावें ।**
**मना बोलणें नीच[2] सोसीत जावें ।**
**स्वयें सर्वदा नम्र[3] वाचे वदावें ।**
**मना सर्व लोकांसि रे नीववावें[4] ।।७।।**

१. **आघातीं उपजे धारिष्ट ।** तें श्रेष्ठ धारिष्ट होय.

२. नीच बोलणें सोशीत जावें असें सांगण्यांत श्रीसमर्थांचा हेतु असा आहे कीं, तेणेंकरून बोलणाऱ्याला च पश्चाताप होऊन तो आपलासा व्हावा. **धकें चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावें । प्रस्तावोन परावे । आपले होती ।।** १५

३. **जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ।।** १९ असें जाणून स्वत: आपण मात्र **विचारें गोड बोलावें ।** एतद्विषयी श्रीसमर्थांनी पुष्कळ च ठिकाणी बोध केला आहे, तो कोठवर द्यावा ! **दुसऱ्याच्या दु:खें दु:खवावें । परसंतोषें सुखी व्हावें । प्राणीमात्रांस मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ।।** १२ 10/7 **वेड्यास वेडे ह्मणों नये । वर्म कदापि बोलों नये । तरी च घडे दिग्विजये निस्पृहासी ।।** १३ इत्यादि.



४. अशा रीतीनें दिग्विजयाकडे लक्ष ठेवून सर्वांना समान लेखून त्यांची संतप्त अंत:करणें गार करावीं.
**उंच नीच ह्मणों नये । सकळांचे निववावें हृदय ।।**

**देहे त्यागितां कीर्ति[1] मागें उरावी ।**
**मना सज्जना हेचि क्रीया[2] धरावी ।**
**मना चंदनाचे[3] परी तां झिजावें ।**
**परी अंतरीं सज्जना नीववावें ।।८।।**

१. उपजला प्राणी तो मृत्युपंथे च जाणार आहे, देह हा नश्वर आहे, **ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थक ची करावें । जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ।।** ३ 9/44

२. **मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते । धन्य धन्य ह्मणे लोक । सत्क्रिया करितां बरी ।।** स्फु. प्र.

३. चंदन झिजतो खरा, पण तो झिजतो ह्मणून च त्याचा सुगंध सुटतो. मी न झिजतां लोकांनी माझा सुगंध घ्यावा, असें चंदन ह्मणेल तर तें योग्य होणार नाही. तद्वत् हे मना, साधुसंतांच्या अंत:करणाला जर तुला रिझवावयाचें असेल, तर तुला हि चंदनाप्रमाणें झिजलें पाहिजे. हे मना, तूं झिज, पण सत्पुरुषांचा संतोष संपादन केल्यावाचूंन राहू नकोस. **जंवरी चंदन झिजेना । तंव तों सुगंध कळेना । चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ।। १२-२-१७ जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे । उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ।।१८।। जगदांतर निवळत गेलें । जगदांतरी सख्य जालें । मग जाणावें वोळले । विश्व जन ।।१९।। जनीं जनार्दन वोळला । तरी काये उणें**

**तयाला । राजी राखावें सकळांला । कठीण आहे ।।२० ।।**

**नको रे मना द्रव्य तें पूढिलाचें[१] ।**
**अती स्वार्थबुधी न[२] रे पाप सांचे ।**
**घडे भोगणें पाप तें कर्म खोटें[३] ।**
**न होतां मनासारिखें दुख मोठें[४] ।।९ ।।**

१. भोंवतालच्यांचे, दुसऱ्यांचे, **मा गृधः कस्य स्विद्धनम्** ।। ईशावास्य.
२. अती स्वार्थबुद्धि नको रे, कारण तिच्या योगानें पापाचा संचय होतो; (कोणी स्वार्थबुधीन ही तृतीया घेतात) आणि
३. ज्या कर्माच्या योगानें वाट्याला पाप येतें ते कर्म वाईट होय; ह्मणून स्वार्थबुद्धि नसावी. शिवाय.
४. स्वार्थबुद्धि बाळगली आणि मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत, तर अतिशय दुःख मात्र होते.
सारांश : पापाला आणि दुःखाला कारणीभूत होणारी जी स्वार्थबुद्धि तिचा, हे मना त्याग कर.

**सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी ।**
**दुखाची स्वयें सांडि जीवीं करावी[१] ।**
**देहेदुख हे सूख मानीत जावें[२] ।**
**विवेकें[३] सदा सस्वरूपीं[४] भरावें ।।१० ।।**

१. श्रीरामाचे ठिकाणी इतकें अखंड प्रेम जडावें कीं, त्यापुढें दुःखाची आठवण ही होऊं नये.
**सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता । निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्या चि सांगाव्या ।।** ४ 8/7 **देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।। सर्व अर्पावें सेवटीं ।**



**प्राण तोहि वेचावा ।**४ **आपुलें आवघें चि जावें । परी देवासीं सख्य राहावें । ऐसी प्रीति जिवें भावें । भगवंती लागावी ।।**४
२. दुःखाची नुसती आठवण होऊं नये, इतकेंच नव्हें तर दुःख हें उलट सुख वाटलें पाहिजे. देहाला आपदा झाली ह्मणजे ईश्वर आठवतो, तेव्हां आपदेचे हे महदुपकारच ह्मणावयाचे ! आणि ह्मणून देहाला दुःख झालें किंवा आणखी कोणती संकटे आलीं तरी त्यांत च आपलें कल्याण आहे, असें जाणून सुख मानावें. ''**आपदः सन्तु नः शश्वत्**'' हा कुंतीने मागितलेला वर सर्वश्रुत च आहे.
३. विचार किंवा विवेक यांचे महत्त्व श्रीसमर्थांनी पदोपदी दर्शित केले आहे. या विचाराच्या योगानें **या चि जन्में येणें चि काळ । संसारी होईजे निराळें । मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ।।**
४. **सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप ह्मणिजे आपलें रूप । आपलें रूप ह्मणिजे अरूप । तत्व निर्शनाउपरी ।।**१३ त्या स्वरूपाचे ठिकाणी श्रीसमर्थ ह्मणतात :-**शिष्या येकांती बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें। तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ।। ५-६-५८**

**जनीं सर्व सूखी असा कोण आहे[१] ।**
**विचारें[२] मना तूंचि शोधूनि पाहें ।**
**मना तां[३] चि रे पूर्वसंचीत[४] केलें ।**
**तयासारिखें भोगणें प्राप्त जालें ।।११ ।।**

१. देहदुःखाची किंवा संकटांची काळजी करूं नये असा बोध ठसविण्यासाठी श्रीसमर्थ विचारतात, सर्वथैव सुखी असा जगांत कोण आहे ? कोणी नाहीं. तर मग दुःख किंवा संकट हीं जर अपरिहार्य आहेत, तर त्याबद्दल चिंता करण्यांत तात्पर्य कोणतें ? संचितानुरूप होणार असेल तें होईल

असे ह्मणून निभ्रांतपणे आपण श्रीरामभजनीं प्रवर्तावें हें च खरें स्वरूपाची एकदा ओळख झाल्यावर मग,

**आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां । तुटली मनांतील आशंका । जन्म – मृत्याची ।।** ६ $\frac{2}{44}$

२. **विचारानें, विचार करून.**

३. **त्वां.**

४. **जनीं संचितें पिंड निर्माण जाला । जनीं तें चि भोगावया जीव आला। शुभाशूभ होणार कांही कळेना । पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ।।**

**मना मानसीं दुख आणूं नको रे ।**<br>**मना सर्वथा[1] शोक चिंता नको रे ।**<br>**विवेकें देहबुधि[2] सोडूनि द्यावी ।**<br>**विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ।।१२।।**

१. ''दा'' वर हरताळ लावून ''था'' केला आहे.

२. **ते चि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण ।** ६ ही देहबुद्धि विवेकानें सोडली पाहिजे. ती जोंवर सुटत नाहीं तोंवर मुक्ति नाहीं, कारण **''हित आहे देहातीत''** । ७ $_{37}$ हा विवेक कसा करावा ? श्रीसमर्थ सांगतात **पाहातां देहाचा विचार । अवघा तत्त्वांचा विस्तार । तत्वें तत्व झाडितां सार । आत्मा च उरे ।।** ६ $\frac{2}{30}$ **बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी । विचार पाहातां ही गांठोडी । आडळेना ।।३२।। तत्वांचें गांठोडे शरीर । याचा पाहातां विचार । येक आत्मा निरंतर। आपण नाहीं ।।३३।। देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला। देहातीत होतां पावला मोक्षपद ।।३६।।**

असा हा, अर्थ करण्याला अत्यन्त सोपा पण अनुभवण्याला अत्यन्त



$\frac{8}{41}$

कठीण, श्लोक आहे !

**मना सांग पां रावणा काय जालें ।**<br>**अकस्मात[1] तें राज्य सर्वै[2] बुडालें ।**<br>**म्हणोनी कुडी[3] वासना सांडि वेगीं ।**<br>**बळें लागला काळ हा पाठिलागीं[4] ।।१३।।**

१. एकाएकी, ध्यानीं मनीं नसतां, पापाचा घडा भरल्यावर पटकन्.

२. सर्व ही.

३. वाईट, दुष्ट.

४. रावणाचे उदाहरण देण्यांत दोन हेतु दिसतात : एक रावणानें दुर्वासना धरली ह्मणून अखेरीस त्याचा नाश झाला असें सुचवून दुष्ट वासनेचा तत्काळ त्याग करावा, असा बोध करण्याचा व दुसरा, सर्व देवांना बंदीशाळेंत टाकून राबावयास लावणारा एवढा चौदा चौकड्यांचा राजा **मज रावणासारिखा कोण आहे । समरंगणी काळ भीडों न राहे ।।** अशी ज्याची घमेंड तो रावण देखील दैववशात् काळमुखीं निमाला तेथें इतरांनी आपल्या सामर्थ्याची घमेंड व वैभवाची शाश्वती काय मानावी ! असा बोध करून काळाचे महत्त्व दर्शविण्याचा. पहिल्या दोन चरणांत विचारलेल्या प्रश्नांची पुढील दोन चरणांत दोन उत्तरे सुचविली आहेत.

**जिवा कर्मयोगें जनीं जन्म जाला ।**<br>**परी सेवटीं काळमूखीं निमाला ।**<br>**महां थोर ते मृत्यपंथेचि गेले ।**<br>**कितीयेक ते जन्मले आणि मेले ।।१४।।**

या श्लोकावरचें भाष्य ह्मणून श्रीदासबोधातील तिसऱ्या दशकाचा नववा समास वाचावा. **असो ऐसे सकळ ही गेले । परंतु येक चि राहिले । जे**

**स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी** ।। ह्या व पुढील दोन चार श्लोकांत मरणांचे स्मरण करू न देण्यांत श्रीसमर्थांचा हेतु इतका च कीं, काळ सर्वांना च गिळणारा आहे असें जाणून ऐहिक वैभवास न भुलता प्रत्येकाने विलंब न लावतां तत्काळ आत्महिताचा मार्ग धरावा. **रामदास ह्मणे स्वहित करणें । निधरि मरणें मागें पुढें** ।। स्फुट ओ. ३२-१३.

**मना पाहतां सत्य हे मृत्यभूमी ।**
**जितां[१] बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव हे सर्व ही मानिताती ।**
**अकस्मात सांडूनियां सर्व जाती[२] ।।१५।।**

१. जिवंत असतांना जो तो मीपणाचा घमेंडीत च असतो. **जो जन्मासी येऊन गेला । तो मी थोर ह्मणतां च मेला** ।। ६-४-१८ परंतु वास्तविक गर्व करण्यासारखें आपल्याजवळ काय आहे ? **थोडे जिणें अर्धपुडी काया । गर्व करिती रडाया । शरीर आवघें पडाया । वेळ नाहीं ।।**
२. **येथील येथें अवघें चि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें । कोण काय घेऊन जातें । सांगाना कां** ।। १२-८-२८
तरी पण सर्वांचा व्यवहार कसा चाललेला असतो पहा ! जणूं काय मारुतीबिभीषणाप्रमाणें आपण हि चिरंजीव च आहों । **जिता तों किती घालमेली करावी । बहूतांपरी कल्पना ते धरावी । कितीयेक तें आपुलें तें परावें । जनीं सर्व सांडूनि सेखीं मरावें** ।। अप्र.

**मरे येक त्याचा दुजा शोक वाहे ।**
**अकस्मात तो[१] ही पुढें जात आहे ।**
**पुरेना जनीं लोभ[२] रे क्षोभ त्यातें ।**
**म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ।।१६।।**



१. तो = तो दुजा. पुढें = इतरांच्या पुढें. **पहातों जनाला किती येक जाती । तनू टाकिताहे पुढें ते पहाती । गताच्या कथा काढितों अल्प कांही । पुढें लोक ते काढिती आमुच्या ही** ।। अप्र.
२. लोभ कधीं पुरा होत नाहीं, ह्मणून उद्वेग प्राप्त होतो आणि तेणेंकरून जीव पुन्हः जन्मास येतो. ''लोभ'' याचा च अर्थ मुळी ज्याची कधीं तृप्ति नाहीं. वासना पुरवूं आणि मग परमार्थ करूं अशी आशा करूं नये. तृप्ति न होणें हा च ज्याचा स्वभाव तो लोभ पुरा होणार कसा ? अत एव लोभ सोडावा हें च उत्तम.
३. ''क्षोभतें ते'' असें होतें, पैकीं ''तें तें'' ला हरताळ लावून वर ''त्यातें'' लिहिलें आहे.

**मनीं मानव वेर्थ चिंता वाहातें[१] ।**
**अकस्मात होणार होऊनि जातें[२] ।**
**घडे भोगणें सर्वही कर्मयोगें[३] ।**
**मतीमंद तें खेद मानी वियोगें[४] ।।१७।।**

१. मनुष्याचे क्षुद्रत्व दर्शविण्यासाठी नपुंसकलिंगी प्रयोग केला आहे. **सर्व कांही चिंता केली भगवंतानें । आपले चिंतेनें काये होते** ।। स्फु.ओ. ३८-१.
२. **होणार तें कांही आतां पालटेना । तरी चिंता मना कां करीसी** ।। २१-१.
३. **हानी मृत्य लाभ होणार जाणार । सर्व ही संसार संचीताचा** २१-३ **लल्लाटीं लिहिलें होउनियां गेलें । संचीत भोगीलें पाहिजे तें ।**२१-४.
४. वियोगें = मनाप्रमाणें गोष्टी घडत नाहींत ह्मणून, किंवा मृत्यूमुळें होणाऱ्या

वियोगानें.

**मना राघवेंवीण आशा नको रे[१] ।**
**मना मानवाची नको[२] कीर्ति तूं रे ।**
**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।**
**तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ।।१८।।**

१. हे मना, श्रीरामाला सोडून गण, गोत, सोयरे, धायरे, विद्या, लक्ष्मी, शेजारी, पाजारी इत्यादि कशाची आशा, बापा, धरूं नकोस.
२. वर्णूं नकोस. **सेवकु मानवीयांचे । कष्टती बहुतांपरी । सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहालों । नीच हे मानवी प्राणी । नीचाश्रय कामा नये । महत्कीर्ति श्रीरामाची । फावला महदाश्रयो ।।** मा.पं.

**मना सर्वथा सत्य[१] सांडूं[२] नको रे ।**
**मना सर्वथा मिथ्य[३] मांडूं[४] नको रे ।**
**मना सत्य तें सत्य वाचें वदावें ।**
**मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ।।१९।।**

१. **सत्य स्वरूप.** सत्य ह्मणिजे स्वरूप जाण.
२. उच्छेदूं नकोस.
३. मिथ्या माया. **असत्य माया प्रमाण ।।** १०-१०-५५.
४. प्रतिपादूं नकोस.

**बहू हिंपुटी[१] होइजे मायपोटीं[२] ।**
**नको रे मना यातना तेचि मोठी ।**
**निरोधें पचे कोंडिलें गर्भवासी ।**
**अधोमूख रे दुख त्या बाळकासी ।।२०।।**



१. कष्टी.
२. श्रीदासबोध ३।१ पहा. **ऐसिये कारागृही वस्ती । नव मास बहु विपत्ती । नव ही द्वारें निरोधती । वायो कैचा तेथें ।।**३$\frac{1}{29}$

**मना वासना[१] चूकवी येरझारा ।**
**मना कामना सांडिं रे द्रव्यदारा[२] ।**
**मना यातना थोर हे गर्भवासीं ।**
**मना सज्जना भेटवीं राघवासी ।।२१।।**

१. ही षष्ठी आहे. वासनेच्या येरझारा, वासनोत्पन्न जननमरण.
२. द्रव्यदारेची कामना.

**मना सज्जना हीत[१] माझें करावें ।**
**रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।**
**महाराज तो स्वामि वायूसुताचा[२] ।**
**जना उधरी नाथ लोकत्रयाचा ।।२२।।**

१. कोणतें हित ? तर श्रीरामाला अखंड आपल्या हृदयांत सांठीव.
२. मारुतीचा.

**न बोले मना राघवेंवीण कांहीं ।**
**जनीं वाउगें[१] बोलतां सूख नाहीं ।**
**घडीनें घडी[२] काळ आयुष्य नेतो ।**
**देह्यांतीं तुला कोण सोडूं पहातो ।।२३।।**

१. वायफळ.
२. **संसार ह्मणिजे सवें च स्वार । नाहीं मरणास उधार । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ।।**

**रघूनायकावीण वायां सिणावें[1] ।**
**जनासारिखें वेर्थ कां वोसणावें[2] ।**
**सदा सर्वदा नाम वाचें वसों दे ।**
**अहंता[3] मनीं पापिणी ते नसों दे ।।२४।।**

१. **रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश । माझें माझें सावकास। सीण चि उरे ।।**

२. **जनाचा लालची स्वभाव । आरंभी च ह्मणती देव । ह्मणिजे मजला कांही देव । ऐसी वासना ।। १८ कांही च भक्ति केली नसतां आणी इच्छिती प्रसन्नता । जैसें कांहीं च सेवा न करितां । स्वामीस मागती ।।२।।** या जनस्वभावाप्रमाणे, रघुनाथभक्ति न करितां, व्यर्थ आशा कां करावी. वोसणावें ह्मणजे बरळावें.

३. **अभेदामाजी वाढवी भेदा । ते हे अहंता ।।**

**मना वीट मानूं नको बोलण्याचा[1] ।**
**पुढें मागुता राम जोडेल कैंचा ।**
**सुखाची घडी लोटतां सूख आहे[2] ।**
**पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ।।२५।।**

१. हे मना, या माझ्या बोलण्याचा कंटाळा करूं नकोस. कंटाळा करून नामस्मरण सोडशील तर मग तुला पुढे श्रीरामाची प्राप्ति कशी होईल ? असा कोणी अर्थ करितात. दुसरे कित्येक ९१ व्या श्लोकाच्या अनुरोधाने बोलण्याचा ह्मणजे नामस्मरणाचा असा अर्थ करितात,

२. काळ सुखांत चालला असतो तोंवर सुख होतें खरें, पण काळ कांही थांबत नसतो, कोणता समय कसा येईल याचा नियम नाही, आहे तें सर्व नाहीसे होऊन अखेरीस कांही शिल्लक उरावयाचें नाही. तात्पर्य **या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें । नीच योनी दु:ख**



**मागें । बहुत भोगिलें ।। ३ 10/38 ।। कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा । जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ।। ३९ ।। तैसें वैभव हें सकळ ।** वगैरे.

**देहेरक्षणाकारणें[1] येत्न केला ।**
**परी सेवटीं काळ घेऊनि गेला ।**
**करी रे मना भक्ति या राघवाची ।**
**पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची[2] ।।२६।।**

१. **तत्वें तत्व मेळविलें । त्यासी देह हें नाम ठेविलें । तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्वें तत्व ।** अशा ह्या नश्वर देहाच्या रक्षणाकरितां किती हि जरी धडपड केली तरी अखेरीस तो मृत्युमुखी पडतो च; तेव्हां जन्ममरणाची चिंता सोडून, हे मना, **या कारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।।**

२. प्रपंचाची किंवा जन्माची. जन्मामागें मरण आहे च, तेव्हां भवाची ह्मणजे जन्ममरणाची.

**भवाच्या भयें काय भीतोसि लंडी[1] ।**
**धरी रे मना धीर[2] धाकासि[3] सांडी ।**
**रघूनायका सारिखा स्वामि शीरीं[4] ।**
**नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी[5] ।।२७।।**

१. हे भित्र्या.

२. धैर्य.

३. भीति.

४. हा चरण वाचतांना, सज्जनगडी श्रीसमर्थांच्या समाधीवर श्रीरामाच्या मूर्ति आहेत त्यांची वाचकांस साहजिक आठवण होते.

५. यम. **रघूनायकासारिखा स्वामि दाता । असोनी शिरीं वाहसी वेर्थ चिंता । नको वीसरों राघवा भूजकांता । नुपेक्षी नुपेक्षी कदा तूज भ्रांता ।।**

**दिनानाथ हा राम कोदंडधारी[१] ।**
**पुढें देखतां काळ[२] पोटीं थरारी ।**
**जना वाक्य नेमस्त[३] हें सत्य मानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी[४] ।।२८।।**

१. धनुष्य धारण करणारा.
२. भक्तवत्सल श्रीरामापुढें सर्वग्रासी यमाचें देखील कांहीं चालत नाही, हें दर्शविण्यासाठी या ठिकाणी कोदंडधारी हें विशेषण विशेष शोभतें.
३. अपवादरहित.
४. **देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसी तारी । देव होय साहाकारी । अनाथांचा ।।** ४ 8/26 **देव अनाथाचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी । धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ।।२७।। देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु । देवासी भक्तांचा विसरु । पडणार नाही ।।** पुढील श्लोक ११६ ते १२५ यांत देवानें भक्तांचे रक्षण केल्याची उदाहरणें दिली आहेत.

**पदीं राघवाचें सदा ब्रीद गाजे[१] ।**
**बळें भक्तरीपूशिरीं कांबि[२] वाजे[३] ।**
**पुरी[४] वाइली सर्व जेणें विमानीं ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२९।।**

१. श्रीरामाचे पायांत तोडर असतात, त्यांचा रुमझुम आवाज होत असतो. भक्तांचे रक्षण करण्याचें श्रीरामाचें ब्रीद तो आवाज दाखवितो. **ब्रिदावळी पदीं वसे । विशेष दूसरा नसे । विबुधबंद सोडिले । अनंत जीव सोडिले ।।**
२. धनुष्यदंड.
३. धनुष्याच्या कांबीचा टणत्कार श्रीरामभक्ताच्या शत्रूंच्या मस्तकी जोरानें होतो.
४. ज्या श्रीरामांनी सर्व अयोध्यापुरी आपल्या बरोबर विमानांत नेली, ते भक्तकैवारी श्रीराम अनन्य भक्ताची उपेक्षा कधीं करीत नाहीत.



**समर्थाचिया[१] सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे ।**
**जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही[२] ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३०।।**

१. श्रीरामाचा जो एकदा दास बनला त्याच्याकडे वांकड्या नजरेनें पहाण्याची त्रिभुवनांत कोणाची प्राज्ञा आहे ! परंतु उलट **समर्थांची नाहीं पाठी । तयास भलता च कुटी । या कारणें उठाउठी । भजन करावें ।।**१६
२. शंकरानें शतकोटी रामायण तिन्ही लोकांत वाटून दिल्यामुळे रामाच्या लीलेचें वर्णन तिन्ही लोकांत होत आहे. **श्रीरामाचें चरित्र सांगतां अपार। जाहाला विस्तार तींहीं लोकीं ।।** स्फु.ओ. 48/1 **तींहीं लोकीं हरें वांटुनी दीधलें । तें आह्मा लाधलें कांही येक ।।२।।**

**महां संकटीं सोडिले देव जेणें[१] ।**
**प्रतापें बळें आगळा[२] सर्व गूणें ।**
**जयातें स्मरे शैल्यजा[३] शूळपाणी[४] ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३१।।**

१. **समीर लोटितो खडे । वरुण घालितो सडे । मयंक साउली धरी । मळीण पावकु हरी ।। विधी विधीस धाकतो । सुरेंद्र बाग राखतो । करावयास निग्रहो । भुमंडळासि विग्रहो ।। अखंड चाकरी करी । सदा वरुची भादरी । सटी आरंधली दळी । गणेश गाढवें वळी ।। बहु कठीण काळ हो । समस्त पावले मोहो । हिना -दिनाचिया परी । सदा गळीत अंतरी ।। समस्त केंश लांबले । कितेक वेस्त लोंबले । नखें चि योग साधले । समस्त देव गादले ।।** (श्रीरामदासांची कविता - पान ४८१) अशा त्रस्त स्थितीतून ज्यानें देवांची सुटका केली.

२. विशेष

३. शैलजा, पार्वती.

४. शंकर.

**अहिल्या[1] शिळा राघवें मुक्त केली ।**
**पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३२।।**

१. गौतममुनींनी आपली भार्या अहल्या हिला तिच्या अपराधाबद्दल शाप दिल्यावरून ती हजारों वर्षे शिळा होऊन पडली होती. विश्वामित्राबरोबर लक्ष्मणासह राम मिथिलानगरीस जात असतां मार्गांत गौतममुनींचा रिकामा आश्रम त्यांच्या नजरेस पडला, ह्मणून त्यांनी विश्वामित्रांना हा आश्रम कोणाचा वगैरे हकिकत विचारली. ती सर्व हकिकत सांगून विश्वामित्र रामलक्ष्मणांना आश्रमाकडे घेऊन गेले व तेथें श्रीरामाच्या पादस्पर्शानें अहल्येचा उद्धार झाल्याची हकिकत सर्वश्रुत च आहे. श्रीरामचरणस्पर्शानें जेथे शिळा उद्धरली तेथें मनुष्य उद्धरेल यांत काय शंका आहे ! **रामपाईं शिळा जाली दिव्य बाळा । तैसाची सोहळा मानवांसी ।।** $\frac{46}{8}$ स्फु.ओ.



**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा ।**
**शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ।**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३३।।**

जोंवर मेरुमंदरादि सृष्टिलीला आहे व जोंवर चंद्र, सूर्य तारांगणे व मेघमाळा हीं आहेत, तोंवर ज्या श्रीरामानें आपले दोन भक्त (मारुती व बिभीषण) या लोकी चिरंजीव केले तो भक्तकैवारी श्रीराम केव्हां हि दासाची उपेक्षा करीत नाही. **यावच्चंद्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी । यावन्मम कथा लोके तावद्राज्यं करोत्यसौ ।।** हा अध्यात्मरामायणांतील (यु.कां. सर्ग ३-४३) श्लोक, किंवा **ह्मणे गा विरा तां पुरीमाजि जावें । ध्रुवाचे परी राज्य सूखें करावें । शशी सूर्य तारांगणे अंतराळीं । असावें सुखी भोगिजे सर्व काळी ।।** हा समर्थकृत रामायणाच्या युद्धकांडातील अकराव्या प्रसंगांतील ५१ वा श्लोक पाहिला ह्मणजे या मनाच्या श्लोकाचा वर जो अर्थ केला तो बरोबर आहे असें स्पष्ट होतें.

**उपेक्षा कदा रामरूपीं[1] असेना ।**
**जिवां मानवां निश्चये तो वसेना[2] ।**
**शिरी भार वाहेन बोले पुराणीं[3] ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३४।।**

१. रामाचे ठिकाणीं.

२. **देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही । परंतु त्यांची निष्ठा कांही । तैसी च नसे ।।** वास्तविक श्रीरामानें भक्ताची कधी उपेक्षा केली नाहीं, परंतु मनाचा तसा निश्चय होत नाही, याला काय करावें ।

३. **सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते । अभयं सर्व भूतेभ्यो ददाम्येतत् व्रतं मम ।** असा अध्यात्मरामायणांत भार घेतला आहे. किंवा

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जना: पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्** । हा भगवद्गितेंतील नवव्या अध्यायाचा २२ वा श्लोक सर्वांच्या पाठांतला च आहे; इत्यादि **दयाळूपणें देव राजाधिराजें। शिरी वाहिजें सर्व ही भक्तवोझें । जनीं दास देखोनियां दैन्य वाणा । मनामाजि वोसावतो देवराणा ।।**

**असे हो जया अंतरीं भाव जैसा ।**
**वसे तो तया अंतरीं देव तैसा[१] ।**
**अनन्यास[२] रक्षीतसे च्यापपाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।**

१. **जया अंतरी भाव होईल जैसा । तयालागि तो देव पावेल तैसा ।।** किंवा **मनीं भावना भक्ती लोकांसि जैसी । तयासारिखी देवरायासी तैसी ।।** किंवा **ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।। जैसे जयाचें भजन । तैसा चि देव हि आपण । ह्मणौन हें आवघें जाण । आपणा चि पासीं ।।**

२. ''**अनन्याश्चिंतयंतो मां**'' वगैरे. अनन्य भक्त कोणास ह्मणावे ? **च्यारीदेह निरसावे । साधकें देहातीत व्हावें । देहातीत होतां जाणावे । अनन्य भक्त ।।** अशा अनन्य भक्ताची देवानें उपेक्षा केल्याचें उदाहरण नाही ! **सदा सर्वदा देव दासाभिमानी कृपा भाकितां सीघ्र पावे निदानीं । तया अंतरी थोर लाहान नाहीं । परी पाहिजे दृढ भावार्थ कांही ।।**

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे[१] ।**
**कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे[२] ।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी[३] ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।**



१. पुढील श्लोक १८६ पहा. **बहु काळ गेले देवासी धुंडितां । देव पाहों जातां जवळी च ।।१।।** स्फु.ओ.१५-१ **जवळी च असे । पाहातां न दिसे । सन्नीध चि वसे रात्रदिस ।।२।। रात्रदिस देव बाह्यआभ्यांतरी। जीवा क्षणभरी विसंभेना ।।३।। विसंभेना परी जीव हे नेणती । जाती अधोगती ह्मणोनीयां ।।४।।**

२. देव सर्वदा जवळ आहे मग पावत कां नाही ? आपली त्याच्यावर कितपत निष्ठा आहे, हें तो पहात आहे. वैराग्येंकरून थोडेसें धैर्य आपण दाखविण्याचा उशीर; कीं तो झाला च व्यक्त, तो फार दयाळु आहे. केवळ धाक दाखवावा ह्मणून गायीपुढे टाकण्याचा मिषाने आईनें मुलाला उचलतां च मूल 'नको नको' ह्मणून ओरडतें. **मातेचें ह्रदय कोमळ । नोळखोनी भयभीत बाळ । तेवी श्रीराम कृपाळ । भक्तपरीक्षा आरंभी ।।१।। संकटामागें संकट । येतां धैर्य धरी चोखट । तरी भक्तासी दीर्घ काळ वाट । पाहणें नलगे ।।२।। ऐसा कृपाळु देवाधिदेव । पाहे शरणागताचा भाव । परी हेतु तद्रक्षणीं सर्व । मातेपरी मुळीहुनी ।।३।। माय बाप रामराय । ज्यातें दास नित्य गाय । ते चि धरी घट्ट पाय । आलिया रे ।।४।।**

३. सुख, आनंद, मोक्ष देणारा.

**सदा चक्रवाकासि मार्तंड[१] जैसा ।**
**उडी घालितो संकटीं स्वामी तैसा[२] ।**
**हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं[३] ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी[४] ।।३७।।**

१. सूर्य.

२. चक्रवाक पक्षाची कथा अशी आहे की, हा पक्षी एकटा बहुधा नसतो. नर आणि मादी बरोबर असतात. योग असा येतो की, एकाद्या विस्तृत नदीच्या

दुसऱ्या तीरावर नर गेलेला असतो व मादी अलिकडच्या तीरावर च असतां सूर्य मावळतो. मग इकडून मादीने ओरडावयाचे व तिकडून नराने ओरडावयाचें ! अशा रीतीने सारी रात्र ते नरमादी विरहांत कंठीत असतात. प्रात:काळी सूर्य उदयास येऊन जसे त्यांचे विरहदु:ख हरण करितो, तद्वत् भक्ताला संकटांत पाहून श्रीसद्गुरू भक्तसहाय्यार्थ धांवून येतात.

३. निस्साण ह्मणून एक नगाऱ्यासारखे वाद्य आहे. ह्मणतात. तसा अर्थ असला तर 'नगाऱ्यावर हरिभक्तीचें टिपरूं सारखें वाजत आहे असा या चरणाचा अर्थ होईल. पण निशाण शब्दाचा तसा कांही अर्थ येथें नसला तर 'हरिभक्तीचे निशाण प्रगट रीतीनें सारखें फडकत आहे' असा अर्थ करावा. **प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानधन विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ।।** २०-४-१४

४. **कदा काळीं राम दासां उपेक्षीना । रामउपासना ऐसी आहे ।।** स्फु.ओ. १६-१८.

**मना प्रार्थना तूजला येक आहे ।**
**रघूराज थकीत होऊनि पाहे[१] ।**
**अवज्ञा[२] कदा हो येदर्थीं[३] न कीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति[४] कीजे ।।३८।।**

१. हे मना, तुला एक विनंति आहे. काय ? तर अशी भक्ति कर की तुझी ती भक्ति पाहून रघुराज थक्कीत होतील ! असा कोणी अर्थ करितात, किंवा रघुनाथाचे गुण आठवून आश्चर्ययुक्त होत्साता, हे मना, श्रीरामाचें ध्यान कर, रघुनाथाचे गुण आठवीत गुंग होऊन रहा, असा कित्येक अर्थ करितात.

२. अनादर.

३. या माझ्या प्रार्थनेसंबंधाने.

४. हे सज्जना मना, श्रीरामाच्या स्वरूपी अखंड लीन होऊन रहा.



**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।**
**जयाचेनि योगें समाधान[१] बाणे ।**
**तयालागि हें सर्व चांचल्य[२] दीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३९।।**

१. समाधी, तादात्म्य.

२. चंचलता हा मनाचा स्वभाव आहे. ती चंचलता, हे मना, श्रीरामचंद्रार्पण करून तत्स्वरूपीं अखंड वसती करून रहा.

**मना पाविजे सर्व ही सूख जेथें ।**
**अती आदरें ठेविजे लक्ष तेथें[१] ।**
**विवेकें कुडी[२] कल्पना[३] पालटीजे ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४०।।**

१. **जयास वाटे सुख चि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळ ही त्यागावें । दु:खमूळ जे ।।** ३-१०-६३

२. वाईट, दुष्ट; मिथ्या, शबल, अशुद्ध. कुडी कल्पना = अशुद्ध कल्पना. **अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।।**

३. समाधानाला काय किंवा पतनाला काय, कारण कल्पना आहे; तेव्हां तिचे निर्मूलन केल्यावांचून ब्रह्मप्राप्ती होणें नाही. शुद्ध कल्पनेने अशुद्ध कल्पना उडवावी आणि मग जी शुद्ध कल्पना उरते ती स्वरूपाचें चिंतन करितां करितां तद्रूप होऊन जातें. **कल्पनेचें येक बरें । मोहरितांच च मोहरे । स्वरूपी घालितां भरे । निर्विकल्पी ।।** ७-३-५० **निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता । नि:संगास भेटों जातां । नि:संग होइजे ।।५१।।** या कल्पनेचे साद्यंत स्वरूप कळण्यासाठी श्रीमत् दासबोधाच्या सातव्या दशकाचा पांचवा समास अवश्य वाचावा.

**बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं ।**
**सिणावें परी नातुडे[1] हीत कांहीं[2] ।**
**विचारें बरें अंतरा बोधवीजे[3] ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४१।।**

१. प्राप्त होत नाही.

२. **उगें च वणवण हिंडोन । काय होतें ।।** १९-६-२४ हिंडण्याने शीण मात्र होतो, हित कांही होत नाही, असें श्रीसमर्थ येथे ह्मणतात. पण **नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ।।** किंवा **येके ठाई बैसोन राहिला ।। तरी मग व्याप चि बुडाला । सावधपणें ज्याला त्याला । भेटि द्यावी ।।** १५-१-३४ इत्यादि कित्येक ठिकाणी तर देशाटणाचे महत्त्व श्रीसमर्थांनी फार दर्शविले आहे. फार काय, ''परिभ्रमण'' एक सांप्रदायाचे लक्षण ठरविलें आहे. होय, पण त्या पर्यटणाचा हेतु वेगळा. परमेश्वरप्राप्तीसाठी हिंडावयाचे असेल तर मात्र तो हेतु हिंडण्याने साध्य व्हावयाचा नाही, **येक ह्मणती फिरावें । तीर्थाटण ।।** ८-१०-१७ त्यावर **येक ह्मणती हे अटाटी । पाणी पाषाणाची भेटी । चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासावीस व्हावें ।।** १८ हें च खरें. परिभ्रमण हा परमेश्वरप्राप्तीचा उपाय नाहीं. ईश्वरप्राप्तीचा उपाय ह्मटला ह्मणजे बसल्या ठायी **विचारें बरें अंतरा बोधवीजे ।।**

३. विचार करून स्वत:च्या अंत:करणाला बोध करावा. या विचाराचें किंवा विवेकाचें महत्त्व दर्शविणारी शेकडो नव्हे हजारों - स्थळें श्रीदासबोधांत व इतर कवितेंत आहेत. त्यांचा विस्तार करावा तर ग्रंथ वाढतो. **संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां । जनामध्ये सार्थकता । विचारें चि होये ।।** ६-९-२४ **विचार पाहेल तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु । ऐसी वचनें सर्वेशु । ठाई ठाई बोलिला ।।** १०-९-२८ तेव्हां ती आतां किती सादर करावी !



**बहुतांपरी हें चि आतां धरावें ।**
**रघूनायेका आपुलेंसें करावें[1] ।**
**दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे[2] ।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे[3] ।।४२।।**

१. हे मना, आतां फार काय सांगू, एक च गोष्ट सांगतो. काय पाहिजे तें कर, पण श्रीरामाला प्रथम आपलासा करून घे आणि मग इतर सर्व व्याप कर! असें कां सांगतो याचे कारण आहे. दीन जनांचे रक्षण करणें हा श्रीरामाचा बाणा आहे. देव **अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी । धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें** ४-८-२७

२. **पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।।** (वरील श्लोक २९ पहा)

३. श्लोक ३८ ते ४२ अशा पांच श्लोकांचे हे सवेल आहे. ३८ त श्रीरामाचें ध्यान करण्यास सांगितले, ३९ त एकाग्र चित्त करण्यास सांगितले, ४० त श्रीचरणीं सारखें लक्ष ठेवून कल्पनाक्षय किंवा मनोजय करण्यास सांगितला, ४१ त अव्यभिचारिणी भक्तीच्या द्वारें विचारानें मनोबोध करण्यास सांगून, या श्लोकांत शेवटी इत्यर्थ सांगितला तो हा, की श्रीरामाला कसें हि करून आपलासा करून घे.

**मना सज्जना येक जीवीं धरावें ।**
**जनीं आपुलें हीत तूंवां करावें[1] ।**
**रघूनायेकावीण बोलों नको हो[2] ।**
**सदा मानसीं तो निजध्यास[3] राहो ।।४३।।**

१. या जगांत जन्माला येऊन परमार्थ प्राप्त करून घ्यावयाचा आहे, याचा, हे मना, केव्हां हि विसर पडूं देऊं नकोस. याविषयीं प्रतिक्षणी जागृत रहा. तर च नरदेहाची सफलता होईल.

२. **कांही च न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागी सांभाळी ।।** ४-३-२१. श्रीरामनामजपावांचून, हे मना जिव्हेला व्यर्थ शिणवूं नकोस. बोलावयाचे च तर रामनामाचा जप कर, नाहीं पेक्षां, **मनी रे जनीं मौन्यमुद्रा धरावी ।।**

३. साक्षात्कार होण्यापूर्वी श्रवण-मनन निदिध्यास ह्या एकाहून एक वरचढ पायऱ्या चढाव्या लागतात, **श्रवणापरीस मनन सार । मननें कळे सारासार । निजध्यासें साक्षात्कार । निसंग वस्तु ।।** ११-१-४१

**मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी ।**
**कथा आदरें राघवाची करावी[१] ।**
**नसे राम तें धाम सोडून द्यावें ।**
**सुखालागि आरण्य सेवीत जावें[२] ।।४४।।**

१. मुखस्तंभ राहण्याने मौन धरल्यासारखे होत नाही. खरें मौन ह्मणजे कोणते ते समर्थांनी अजपाजप निरूपण करतांना सांगितले आहे. **येकांती मौन्य धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे । सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।।** १७-५-७ **ते शब्द सांडून बैसला । तो मौनी ह्मणावा भला। योगाभ्यासाचा गलबला । याकारणें ।।९ ।।** अशाप्रकारें मौनी होतां न आलें तर निदान वायफळ भाषण वर्ज करावे. हे मना, इतर वाग्विलास सोडून देऊन श्रीरामाचें गुणानुवादनकीर्तन कर. **कळहो करील शब्द रे । अनंत तो निशब्द रे । तुह्मी अनंत कां न व्हा । वेवादतां अव्हासव्हा ।।**

२. राम नाही असे धाम असेल तर ते सोडून, सुख व्हावें अशी इच्छा असल्यास, अरण्यवास पत्करावा. (धाम सोडून श्रीराम वनवासाला गेले तेव्हां त्यांची भेट घरीं कोठून होणार ? भेटीची इच्छा असल्यास वनवास च पत्करिला पाहिजे. श्रीसमर्थांना हि अरण्यवास अत्यंत प्रिय होता तो उगी च नव्हे.)



**जयाचेनि संगें समाधान[१] भंगे ।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे ।**
**तये संगतीची जनीं कोण गोडी ।**
**जये संगतीनें मती राम सोडी ।।४५।।**

१. **आपलें मूळ शोधितां । आपली तों माईक वार्ता । पुढें वस्तु च तत्वता । समाधान ।।** ६-१०-१३ समाधान ह्मणजे समाधी. **दृढ करुनियां बुद्धी । आधी घ्यावी आपशुद्धी । तेणें लागे समाधी । अकस्मात ।।** ६-१०-१२ अशी समाधान वृत्ति ज्यांच्या संगतीत भंगून तिच्या ऐवजी देहबुद्धि अंगी जडते त्या दुर्जन वितंडवाद्यांची संगती नको. **कदा वाजटाचा नको संग देवा । धिटाउद्धटामाजि पाषांड ठेवा । जेणे वृत्ति ढासळे साधकाची । त्यजा रे त्यजा संगती बाधकाची ।।**

**मना जे घडी राघवेंवीण गेली ।**
**जनीं आपुली ते तुवां हानि केली[१] ।**
**रघूनायेकावीण तो सीण आहे[२] ।**
**जनीं दक्ष[३] तो लक्ष लाऊनि पाहे ।।४६।।**

१. राघवाचा चिंतनावांचून गेलेला काळ फुकट गेला, आयुष्याचा तितका नाश झाला, असें समजावें.

२. **सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी ।।**

३. विचारी, सावध. **विवेकी दक्ष जो कोण्ही । पुरुषार्थी धर्मरक्षकु । आमोल्य जन्म हा तेणे । वेर्थ ची दवडूं नये ।।**

मनीं लोचनीं श्रीहरी तो चि पाहे[१] ।
जनीं जाणता भक्त होऊनि राहे[२] ।
गुणीं प्रीति राखे[३] क्रमू साधनाचा[४] ।
जगीं धन्य तो दास[५] सर्वोत्तमाचा[६] ।।४७।।

१. अंतर्बाह्यदृष्टीने जो श्रीराम च पहातो, श्रीरामावांचून ज्याच्या अंतर्बाह्यदृष्टीला दुसरें कांही दिसत च नाही, ज्याचे मन आणि दृष्टी ही राममय झाली आहेत.
२. असा तो जाणता ह्मणजे ज्ञानी असून हि सेव्यसेवकभावानें राहतो. श्रेष्ठ सुगमोपायांत ह्मणतात :- **माझा राम आवघा चि आपण । दुसरें नाही त्याची च आण । हें स्थित न मोडतां स्वामीसेवकपणा । दिधलें ऐसा उदार ।।** १-३८
३. ''लागे'' खोडून समारांत ''राखे'' लिहिलें आहे.
४. सगुणावरचें प्रेम व साधनाचा क्रम जो राखतो. ज्याच्या दृष्टीला सर्वत्र राम दिसतो आहे, असा जो सिध्द झाला त्याला आणखी सगुणाची भक्ति व साधनांचे अनुष्ठान कशास पाहिजे, असें कोणी विचारीले त्यास समर्थ ह्मणतात :-**आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती । कोण पुसे ।।** ह्मणून सिध्दानें देखील साधन सोडतां कामा नये. सिध्दपणाच्या घमेंडीत जो साधन सोडील तो बध्द च समजावा. **साधन न मने जयाला । तो सिध्दपणें बध्द जाला ।।** ५-६-७३. **ज्ञानबळे उपासना । आह्मी भक्त जरी मानूं ना । तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्त पणें ।।**६-७-४०
५. श्लोक ४७ ते ५६ हे सद्गुरुभक्तांस श्रीसमर्थपर च दिसतील. श्रीरामाच्या दासाचा धन्यवाद गातांना या दहा श्लोकांत जी लक्षणें दिली आहेत ती सर्व समर्थांना लागतात.
६. सर्वोत्तम जो श्रीराम त्याचा. **सर्वांमधें जो उत्तम । त्या नांव सर्वोत्तम ।।**



सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा[१] ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा[२] ।
स्वधर्मेचि[३] चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास[४] सर्वोत्तमाचा ।।४८।।

१. सातवी भक्ति जी दास्य ती ज्याला नेहमी घडते. २ तिसरी भक्ति जी नामस्मरण ती जो नेहमी करितो. ३ वर्णाश्रमधर्माने किंवा **सकाळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहाणे हा स्वधर्म ।।** दा. ८-९-५४ त्या स्वधर्मानें. ४ ब्राह्मणानें मनुष्याचे दास्य करणे अनुचित होय, परंतु देवाचे किंवा सद्गुरूचे दास्य करणे हे भूषण होय.**अहो शूद्र सेवक जैसा तिही वर्णास । तैसें मनुष्यदास्य अनुचित ब्राह्मणास । तें दूषण योजील हरिभक्तांस । तो चतुर कीं मूर्ख ।। सुगमोपाय १०-५४ विप्र दास व्हावया ईश्वराचे। संचित पाहिजे कीं जन्मोजन्मीचें । नारदादि ह्मणविती जयांचे । दासाचे दास ।।५५।।**

सदा बोलण्यासारिखें चालताहे[१] ।
अनेकीं सदा येक देवासि पाहे[२] ।
सगूणीं भजे[३] लेश नाहीं भ्रमाचा[४] ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४९।।

१. हा उपदेश श्रीदासबोधांत व इतरत्र समर्थांनी अनेक ठिकाणी केलेला आहे महंताचे ठिकाणी जे गुण असावयास पाहिजेत त्यांत हा श्रेष्ठ गुणांपैकी एक आहे. **जैसे बोलणें बोलावें । तैसें चि चालणें चालावे । मग महंतलीळा स्वभावें । आंगी बाणे ।। (२) देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला । परंतु बहुविध जाला । हें तों घडेना ।।** दा.९-३-३१ **तो येकला चि सकळां घटीं । करी भिन्नभिन्न राहाटी । सकळ सृष्टीची गोष्टी । किती ह्मणौनी सांगावी ।।** ११-८-४. **इतुके ठाईं**

**पुरवला । अनेकीं येक चि वर्तला ।।** ११-८-२१ **(३) सांडील सगुण भजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेसी । ह्मणोनि यां सगुणभजनासी । सांडू च नये ।।** १०-७-१८४. **निर्गुण ब्रह्मावेगळें अघवें । भ्रमरूप ।।** १०-६-३६.

**नसें अंतरीं कामकारी[१] विकारी ।**
**उदासीन[२] जो तापसी ब्रह्मच्यारी ।**
**निवाला[३] मनीं लेश नाही तमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा[४] ।।५० ।।**

१. काम उत्पन्न करणारा. ज्याच्या अंत:करणांत काम किंवा इतर विकार नसतो, किंवा ज्याची वृति कामाकार नसते. **स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरल कामना । ह्मणौनियां साधु जना । काम चि नाहीं ।।** दा. ८-९-२४
२. विषयावरील ज्याचे प्रेम गेलें आहे असा; वीतरागी ; आशारहित; निराश. **आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची । ह्मणोन नैराशता साधूची । वोळखण ।।** दा. ८-९-४६
३. जो नि:संदेह झाला; तम ह्मणजे अज्ञान समूळ नाहीसें होऊन संशयरहित ज्ञानानें ज्याचें समाधान झालें.
४. श्लोक ५०, ५१ व ५२ यावरील भाष्य ह्मणजे आठव्या दशकाचा नववा समास होय.

**मदें[१] मछरें[२] सांडिला[३] स्वार्थबुधी[४] ।**
**प्रपंचीक[५] नाहीं जयातें उपाधी ।**
**सदा बोलणें नम्र[६] वाचा सुवाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५१ ।।**



१. **आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ।।** दा.८-९२८.
२. **आपला आपण मस्तर । कोणावरी करावा ।।२९ ।।**
३. ''ली'' चा ''ला'' केला आहे. ४ ही हि तृतीया आहे. मद मत्सर आणि स्वार्थबुध्दि किंवा लोभ यांनी ज्याला सोडला आहे. **दुराशा तुटली स्वार्थाची ।।**८-९-४६. **(५) जेणे दृष्य केले विसंच । तयास कैचा हो प्रपंच । याकारणें नि:प्रपंच । साधु जाणावा ।।** ८-९-३२ **६ मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण । याकारणें साधुवचन । कठीण नाही ।।**८-९-४७

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें[१] ।**
**न लिंपे कदा दंभ[२] वादें विवादें[३] ।**
**करी सूखसंवाद[४] जो ऊगमाचा[५] ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५२ ।।**

१. 'तत्त्वमसि' या महावाक्याचे आपल्या मनाशीं चिंतन व जनांत अनुवाद करून **पुढे भोजन जालियांवरी । कांही वाची चर्चा करी । येकांती जाऊन विवरी । नाना ग्रंथ ।। दा.११-३-२२**
२. **साधु स्वरूप स्वयंभ । तेथे कैंचा असेल दंभ । जेथे द्वैताचा आरंभ । जाला च नाहीं ८-९-३१.**
३. **आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद । याकारणें वादवेवाद । तुटोन गेला ।। ८-९-२८.**
४. **हितकारी संवाद. तुटे वाद संवाद तो हीतकारी ।**
५. **चंचळ नदी गुप्त गंगा ।** अशी जी माया तिच्या उगमाचा; ब्रह्माचा. **येक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमास गेले । उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ।। ११-७-१०.**

**सदा आर्जवी[१] प्रीय[२] जो सर्व लोकीं ।**
**सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा[३] ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५३।।**

१. **सकळ जनासी आर्जव ।।** २-७-६४ असें दासबोधांत सत्त्वगुणांचे एक लक्षण दिले आहे.
२. **जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे हा असावा ।।** १९-६-२१
३. निश्चयेकरून. जो तीनदां बोलत नाही, एकदां बोलतो; ह्मणजे ज्याचें भाषण निश्चयाचें असतें.

**सदा सेवि आरण्य[१] तारुण्यकाळीं[२] ।**
**मिळेना[३] कदा कल्पनेचेन मेळीं ।**
**चळेना[४] मनीं निश्चयो दृढ ज्याचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५४।।**

१. श्रीरामाचा दास आपलें तारुण्य सर्वकाळ अरण्याच्या सेवनांत घालवितो. अरण्यांत एकांत असतो आणि एकांतांत चाळणा होऊन ज्ञान होतें ह्मणून अरण्यवास श्रेष्ठ. **चाळणा करावी सर्वे । येकांती राहातां बरें । येकांत मानला ज्याला । त्याला साधे हळु हळु ।। स्फु. प्र. १४-३ संवाद वेवाद होतों । वेवादें युध्द होतसे । ह्मणोनि लोक सोडावे । आरण्य धरिता बरें ।। स्फु. प्र. १४-१०**
२. असा हा श्रेष्ठ अरण्यवास वृध्दपणी कोठून होणार ? **देह्याचा भर्वसा नाहीं । तारुण्य चळतें जनी । वृधापी विटंबे काया । रूप विद्रूप होतसे ।।**असें सांगून स्फुट प्रकरणांपैकी नव्या प्रकरणांत वृध्दावस्थेच्या आपदा निवेदन करून श्री समर्थ म्हणतात. **ऐसें हें दुःख वृधापीं । कळलें पाहिजे जना । परत्र साधणें आधीं । तारुणीं च उठाउठी ।।**



३. 'विषयकल्पनेच्या घोटाळ्यांत जो गुरफटला जात नाही,' असा या चरण कोणी अर्थ करितात. कोणी ह्मणतात, 'श्रीरामाच्या या दासाचें निश्चित स्वरूप तरी कोणतें आहे, याची कोणालाच बरोबर कल्पना होत नाही,' असा या चरणाचा अर्थ करावा. हा दुसरा अर्थ करणारे आधार देतात :- **एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितां हि तर्केना । कदापि भावितां भावेना । योगेश्वर ।। दा. ११-१०-१३ लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघे चि निर्फळ होती । जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ।। ११-३०-१५.**
४. ब्रह्मांड कोसळले तरी श्रीरामरूपावरून ज्याचें मन ढळत नाहीं. **विषईं धांवे वासना । परी तो कदा डळमळिना । ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्वगुण ।। २-७-५९**

**नसे मानसीं नष्ट आशा[१] दुराशा ।**
**वसे अंतरीं प्रेम पाशा[२] पिपाशा ।**
**ऋणी देव हा भक्तिभावें[३] जयाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।**

१. नष्ट आशा = दुष्ट आशा, दुराशा, स्वार्थाची आशा
२. ''आ'' खोडून समासांत ''पा'' केला आहे. प्रेमबध्द पिपासा ह्मणजे तृष्णा. भगवत्प्रेमाची ज्याला तहान लागली आहे. **माझें सर्व जावें । देवाचें राहावें । देवासी पाहावें भक्तपणें ।।**
३. अशा भक्तिभावाने ज्यानें देव आपुलासा केला. **भगवंत भावाचा भुकेला। भावार्थ देखोन भुलला । संकटी पावें भाविकाला रक्षितसे।।**

**दिनाचा दयालु मनाचा मवाळु ।**
**स्नेहाळु कृपाळु जनीं दासपाळु[१] ।**
**तया अंतरीं क्रोध संताप कैचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५६।।**

१. **रामदास दासा । सांभाळितो कैसा । जीव प्राण जैसा । तैसा पाहे ।।** दिनकर

२. **जेथे नाहीं दुसरी परीं । क्रोध यावा कोणावरी । क्रोधरहित सचराचरीं । साधु जन वर्तती ।।** दासबोधाच्या दुसऱ्या दशकाच्या सातव्या समासात सत्वगुणाची व आठव्या दशकाच्या नवव्या समासात सिध्दाची जी लक्षणें दिलीं आहेत ती सूत्ररूपाने, श्लोक ४७ ते ५६ या दहा श्लोकांत आलीं आहेत, हें वाचकाच्या ध्यानांत येईल च.

**जगीं होईजे धन्य या रामनामें[१] ।**
**क्रिया भक्ति उपासना नित्य[२] नेमें ।**
**उदासीनता[३] तत्वता सार आहे ।**
**सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।।५७।।**

१. श्रीरामनामस्मरणाचा महिमा कळण्यासाठी श्रीश्रेष्ठांचा 'भक्तिरहस्य' ग्रन्थ अवश्य वाचावा. **श्री राम जय राम जय जय राम । अखंड जो स्मरे सप्रेम । तो स्वयें चि असे पुरुषोत्तम । ह्मणौनि राम न विसरावा ।।**

२. नित्य नियमासंबंधानें श्रीसमर्थांचा ''अंतर्भाव'' ग्रन्थ वाचकांनी अवश्य पहावा. **मानसपूजा जप ध्यान । येकाग्र करूनियां मन । त्रिकाळ घ्यावें दर्शन । मरुत्सुताचें ।।**

३. वैराग्य, नैराश्य, उदासीनता सत्वगुणाचें लक्षण असून तींच नरजन्माची सफलता आहे. या असार संसारांत सार काय ती उदासीनता आहे. या उदासीनतेमुळे सदासर्वदा वृत्ति मोकळी राहते, ह्मणजे अलिप्त स्थिति प्राप्त होते. अखंड श्रीरामनामस्मरण व श्रीसद्गुरूंनी पूजा, ध्यान, जप, श्रवण, मनन, इत्यादि जो नित्य नियम घालून दिला असेल त्याचें प्रतिपालन करीत असतां कसल्याहि फलाची अपेक्षा न करितां निरंतर निरुपाधिक स्थितीत रहावें, असा भावार्थ.



**नको वासना वीषई वृत्तिरूपें[१] ।**
**पदार्थीं जडे कामना पूर्वपापें[२] ।**
**सदा राम नि:काम चिंतीत जावा[३] ।**
**मना कल्पनालेश तो ही नसावा[४] ।।५८।।**

१. उदासीनता नसली तर मनोवृत्तींचा सारा ओढा विषयांकडे असतो. तो तसा नसावा.

२. पण, नसावा एवढे ह्मणून भागत नाही. पूर्वजन्मार्जित कर्माप्रमाणें पदार्थांच्या ठिकाणी वासना जडत असते.

३. यासाठी आतां तरी या जन्मी श्रीरामाचें चिंतन निष्काम बुध्दीने करीत जावें.

४. कामनेचा लेश हि नसावा, कल्पनेवांचून कामना अन्य काय आहे ? ह्मणून कल्पनालेश म्हणजे कामनालेश च. **कामनेनें फळ घडे । नि:काम भजनें भगवंत जोडे । फळ भगवंता कोणीकडे । महादांतर १०-७-२० नाना फळें देवापासीं । आणी फळ अंतरी भगवंतासी । याकारणें परमेश्वरासी । नि:काम भजावें ।।२१।। भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपण चि करावें । तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ।।२३।।**

**मना कल्पना कल्पितां कल्पकोटी[१] ।**
**नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।**
**मनीं कामना राम नाहीं जयाला[२] ।**
**अती आदरें प्रीति नाहीं तयाला ।।५९।।**

१. हे मना, कल्पकोटी कल्पना केल्या तरी काय होणार आहे रे ! कल्पनेनें श्रीरामचरणाचे दर्शन कधी तरी झाले आहे काय ! कल्पनारूपी कामनेचा संपूर्ण क्षय झाल्यावांचून श्रीराम भेटणार नाहींत हें निश्चित होय. **आपुले अनुभवें । कल्पनेसी मोडावें । मग सुकाळी पडावें । अनुभवाचे ।।७-**

३-४८ निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावें । कल्पकोटी ।।४९।।

२. जयाला मनी कामना (आहे) तयाला राम नाही. (व) अती आदरें (श्रीरामी) प्रीति नाही. ज्याला श्रीरामावांचून अन्य कामना असते, त्याला श्रीरामदर्शन होत नाही व त्याची श्रीरामाच्या ठिकाणी अनन्य प्रीति हि नसते.

**मना राम कल्पतरु कामधेनु ।**
**निधी सार चिंतामणी काय वानूं ।**
**जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।**
**तया साम्यता कायसी कोण आतां ।।६०।।**

श्रीराम माझा कल्पतरु । अथवा कामधेनु महुरु । इच्छाप्रदानीं आदरु। अत्यंत ज्यातें ।।१।। अथवा कुबेराचे नव निधी । चिंतामणी दे समृध्दी । तेवी सद्गुरु उदारधी । कोड पुरवी परोपरी ।।२।। परी हे ही दृष्टान्त । केवी श्रीरामी शोभत । दृष्टान्तवस्तूंसी वस्तुत्व । ज्याचिया सामर्थ्ये ।।३।। कामधेनु कल्पतरु । निधी चिंतामणी सारु । रामसत्तामात्रें थोरु । असतां परी ।।४।। कैसी रामी बरोबरी । करितीं बापुडीं भिकारीं रामसत्ता अनुपम्य खरी । भुवनत्रयी ।।५।। तस्तात् शरण जावें श्रीरामाला। सकल मुनिजनविश्रामाला । देवबंदविमोचकाला । अनन्य भावे ।।६।। ''देवावेगळें कोणी नाही । ऐसें बोलती सर्व हि । परंतु त्यांची निष्ठा कांही । तैसी च नसे'' ।।७।। ''ह्मणोनि ऐसें न करावें । सख्य तरी खरें चि करावें । अंतरीं सदृढ धरावें परमेश्वरासी'' ।।८।।

**उभा कल्पवृक्षातळीं दुख वाहे ।**
**तया अंतरीं सर्वदा तें चि आहे ।**
**जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।**
**पुढें मागुता शोक जीवीं धरावा ।।६१।।**



श्रीराम सखा असतां शिरीं । जो बुडे चिंतासागरीं । तेणें कल्पवृक्षातळीं। रुदन आरंभिलें ।।१।। समर्थ असतां पाठीराखा । चिंता किमर्थ करणें मूर्खा । नेणोनिया सत्संगसुखा । वृथा कां भ्रमसी ।।२।। आपुलाल्या दैवताचा । अभिमान घेती जन साचा । तेणें अनंत जगदीशाचा । विसर पडे ।।३।। ''मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर'' ।।४।। ऐसें जाणोनिया जीवें । जनी वाद करणें त्यागावें । नाहीं तरी लागेल शिणावें। वेर्थ बापा ।।५।। स्थितप्रज्ञ होवोनिया । श्रीराम कर्ता जाणोनिया । शोक कारी वाद वाया । कासया करावावा ।।६।।

**निजध्यास तो सर्व तूटोनि गेला ।**
**बळें अंतरीं शोक संताप ठेला ।**
**सुखानंद आनंद भेदें बुडाला ।**
**मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला ।।६२।।**

अभिमानें वाद वाढवावा । तरी आत्मघात करावा । मनीं द्वैतभाव उपजावा । दुःखमूळ ।।१।। ''अभिमाने उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार। पुढें क्रोधाचा विकार । प्रबळें बळें'' ।।२।। एवं षड्रिपु बळावती । मन पावे अधोगती । तेणें उपासना विस्मृती । सहज चि होये ।।३।। उपासनाविस्मृतियोगें । मनी संशय उपजों लागे । क्षणक्षणी विक्षोभें मन भंगे । साधकाचें ।।४।। या सर्व पतनाचें मूळ । जनीं वाचाळता केवळ । तरी तो कासया व्हावा निर्फळ । वादवेवाद ।।५।। श्रीगुरुचरणीं पूर्ण निष्ठा । ठेवोनि राही भक्तश्रेष्ठा । तेणें तुझी कामना इष्टा । पूर्ण होवे।।६।।

**घरीं कामधेनु पुढें ताक मागे ।**
**हरीबोध सांडूनि वेवाद लागे ।**
**करीं सार चिंतामणी काचखंडें ।**
**तया मागतां देत आहे उदंडें ।।६३।।**

**''आराध्य देव अति समर्थ । वरी भक्ताचा दृढ भावार्थ । तरी तें भक्तिप्रेम व्यर्थ । होईल कां हो'' ।।१।। ऐसा सद्गुरु समर्थ असतां । सेवकें कां धरावी दीनता । समर्थसेवका वक्र पहातां । उरी कैसी कोणासी ।।२।। कामधेनु असतां द्वारी । तक्र मागणें घरोघरी । तेणें पढतमूर्खता पदरीं । येऊं पाहे ।।३।। अथवा चिंतामणी असे करीं । तया मागे काचखंडे परी । तो जन्मदरिद्री भिकारी । भोगूं नेणें सर्वथा ।।४।। तेवी श्रीसद्गुरुभक्त । करूं लागतां वादवेवाद । तेणे शुद्ध ज्ञानाचा पथ । चुकोनि गेला ।।५।। तस्मात् वादवेवाद सोडावा । सुखसंवाद सर्वथा करावा । ब्रह्मगोळ अवघा भरावा । श्रीरामदास्यें ।।६।। श्रीरामाच्या दासांचे दास । त्यांचे जे जे अनुदास । तयांना किंकर होय उदास । महद्भाग्यें ।।७।।**

**अती मूढ[1] त्या दृढ बुधी[2] असेना ।**
**अती काम[3] त्या राम चित्तीं वसेना ।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा[4] ।**
**अती वीषई सर्वदा दैन्यवाणा[5] ।।६४।।**

१. दुश्चित, मतिमंद.
२. दृढ निश्चय. ज्याची विषयवासना प्रबल असते त्याच्या हातून श्रीरामाचें चिंतन होत नाहीं; आणि याच्या उलट ज्याच्या मुखीं सदा सर्वदा रामनाम असतें त्याला कामाची बाधा होत नाही.
३. काम आहे तेथें राम नाहीं व राम आहे तेथें काम नाही.



**मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।।८७।।**
४. लोभाला कांही मर्यादा नसते. तेव्हां अनावर लोभ दुःखाला च कारण झाला पाहिजे. **पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें ।।१६।।**
५. **जाली विषईं वृत्ति अनावर । दृढ धरिल संसार । परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ।।५-३-५५ मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा । भार वाहिला कुटुंबाचा । काबाडी जाला ।।५६।। मानिला प्रपंची आनंद । केला परमार्थी विनोद । भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ।।५७।।**

**नको दैन्यवाणें जिणें भक्तिऊणें[1] ।**
**अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें[2] ।**
**धरीं रे मना आदरें प्रीति रामीं ।**
**नको वासना हेमधामीं विरामीं[3] ।।६५।।**

१. तेव्हां, हे देवा, असलें भक्तिहीन दैन्यवाणें जिणें मला देऊं नकोस; माझी वासना विषयांच्या ठिकाणी अनावर होऊं देऊं नकोस.
२. पण जो मूर्ख आहे त्याला जरी ठाऊक असतें की, संसार हा दुःखमूळ आहे, विषय हे दुःखाला च कारण होणार आहेत, तरी पण त्या च संसारापासून व विषयांपासून तो सुखाची अपेक्षा करीत असतो. याचा परिणाम असा होतो की, त्याला सुख तर होत नाहीं च, पण दुःख मात्र दुप्पट होते. **होईजेतें कष्टी तें चि कां धरावें । वेगी उधरावें आपणासी ।।**
३. तेव्हां, हे मना ज्यापासून दुःख होणें निश्चित आहे ते विषयचिंतन सोडून दे. हे मना, हेम, धाम, विराम इत्यादि पदार्थांवरील आसक्ती सोडून अनन्य भावानें श्रीरामाच्या ठिकाणी रत हो, ह्मणजे तुला श्रीरामाची सहज भेट होईल. एरव्ही नाही. ५९ व्या श्लोकांत मागे सांगितलेंच आहे की, **मनीं कामना राम नाहीं जयाला । अती आदरें प्रीति नाहीं तयाला ।।**

**नव्हे सार संसार[1] हा घोर आहे ।**
**मना सज्जना सत्य[2] शोधूनि पाहें ।**
**जनीं वीष[3] खातां पुढें सूख कैचें ।**
**करी रे मना ध्यान[4] या राघवाचें ।।६६।।**

१. **संसार ह्मणिजे सवें च स्वार । नाहीं मरणास उधार । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ।।३-९-१ संसार ह्मणिजे माहा पूर । माजी जळचरें अपार । डंखूं धावती विखार । काळसर्प ।।** असा हा संसार असार आणि घोर आहे. त्यांत सुख मानणारा महामूर्ख होय. **परम मूर्खांमाजी मूर्ख । जो संसारी मानी सुख । या संसारदु:खा ऐसें दु:ख । आणीक नाही ।।**

२. मी ह्मणतो ते खरे की खोटें याचा, हे मना, तूं पूर्ण विचार करून पहा, असा कोणी अर्थ करितात, कोणी, हे मना, असा हा संसार असार आहे हें जाणून सत्य, सार काय आहे त्याचा शोध कर, असा अर्थ करितात. **सांडून आपली संसारवेथा । करीत जावी देवाची चिंता ।।४-८-७**

३. ''ख'' खोडून ''ष'' केला आहे. संसार नुसता विषतुल्य आहे, तेव्हां त्या विषाचें सेवन करीत असतां सुख कोठून होणार ?

४. यासाठी, हे मना, तूं संसारचिंतां सोडून देऊन श्रीरामाचें ध्यान कर, ह्मणजे तुला परम सुखाची प्राप्ती होईल. **संसारीचें दुख मज वाटे सुख । राघवाचें मुख पाहातां चि ।।** श्रीसमर्थ ज्या श्रीरामाचे मुख पहात तें ध्यान कसें होतें हे पहावयाचें असल्यास श्रीरामदासांची कविता-स्फुट ओव्या ९ पहा.

**घनशाम[1] हा राम लावण्यरूपी ।**
**महां धीर गंभीर पूर्णप्रतापी ।**
**करी संकटीं सेवकाचा[2] कुढावा[3] ।**
**प्रभाते[4] मनीं राम चिंतीत जावा ।।६७।।**



१. मेघाप्रमाणें ज्याचा वर्ण आहे, सांवळा.

२. सेवक = सख्य भक्ति करणारा दास. **देव अनांथाचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ।।**

३. कुडावा, रक्षण. **ह्मणे दास हा राम तत्काळ पावे । करी संकटी सेवकाचें कुडावें । प्रतापें चि ब्रह्मादिकां सोडवीलें । महीमंडळालागि आनंदवीलें ।।**

४. प्रात:काळी. प्रभातकाळी मन साहजिक रीतीनें उद्वेग रहित व हर्षयुक्त असतें, यासाठी नामस्मरण विशेषत: तेव्हां करावें, असे सांगितले आहे; तर मग इतर वेळी नामस्मरण करावयास नको, असली बाष्कळ कोटी कोणी करूं नये. **नित्य नेम प्रात:काळी । माध्यानकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्व काळी करीत जावें ।।**

**बळें आगळा[1] राम कोदंडधारी[2] ।**
**महां काळ विक्राळ तो ही थरारी ।**
**पुढें मानवा किंकरा कोण केवा[3] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६८।।**

१. बळें आगळा = बळाने विशेष, विशेष बळाचा. आगळा = अग्र, प्रथम, पहिला.

२. धनुर्धारी. (मागील श्लोक २८ पहा.)

३. पाड, मात्रा, कथा. कोदंडधारी श्रीरामाला पाहून महाभयंकर असा यम देखील थरथर कांपतो, तेथें दुर्बळ अशा मनुष्याचा पाड तो किती ! **हरीहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक । तूं येक मानवी रंक । भजेसिना तरी काय गेलें ।।** तरी आतां असें न करतां मुमुक्षूनें श्रीरघुनाथभजनीं लागावें.

**सुखानंदकारी[१] निवारी भयातें[२] ।**
**जनीं भक्तिभावें भजावें तयातें ।**
**विवेकें तजावा[३] अनाचार हेवा[४] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६९।।**

१. सुख आणि आनंद देणारा. **सांगतसे खूण माझे अंतरीची । सर्व ही सुखाची सुखमूर्ती ।। सुखमूर्ती राम । सोडूं नको कदा । तुज तो आपदा लोगों नेदी ।।** स्फु.ओ.१३०

२. श्रीरामाची कृपा झाली ह्मणजे देहावरचे प्रेम उडतें. देहबुद्धि आहे ह्मणून भीति आहे, ती देहबुद्धि नष्ट झाल्यावर भय कसें उरणार ? **भय वाटे देही तुं तव विदेही । देह्यातीत पाही आपणासी ।।**

३. त्यजावा.

४. हेवा = इच्छा.

**सदा रामनामें वदा पूर्णकामें[१] ।**
**कदा बाधिजेनापदा[२] नित्य[३] नेमें ।**
**मदालस्य[४] हा सर्व सोडूनि द्यावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७०।।**

१. पूर्णकामे हे 'रामनामे' चें विशेषण होय. पूर्णकामें ह्मणजे ज्यांच्या योगाने कामना पूर्ण होतात अशी. **ठाईं पाडी राम जीवांचा विश्राम । तेणें सर्व काम पूर्ण होती ।।** स्फु.ओ.३३-९

२. बाधिजेना + आपदा. **आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् । लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ।।**

३. जी साधने करावयाची ती नित्य नियमानें करीत गेल्यास कोणत्या हि संकटांची बाधा होत नाही. **परमेश्वराची अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्य नेमें । नामस्मरण करितां येमें । बाधिजेना ।।**



४. मद + आलस्य = गर्व आणि आळस. **थोर आयुष्य मोलाचें । मदें वेर्थ चि नासिलें ।।** असा आयुष्याचा नाश करणारा गर्व न करावा. मोठेपणाची घमेंड सोडून लहानाबरोबर लहान होऊन अखंड श्रीरामनामस्मरण करावें ! नित्य नियमाला दुसरें विघ्न आळसाचें, तो आळस हि सर्वथा त्यजावा. **येकाग्र करूनियां मन । बळें चि धरावें साधन । येत्नीं आळसाचें दर्शन । होऊं च नये ।।**

**जयाचेनि नामें महा दोष[१] जाती ।**
**जयाचेनि नामें गती[२] पाविजेती ।**
**जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा[३] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७१।।**

१. **नाम स्मरे निरंतर । ते जाणावें पुण्यशरीर । माहा दोषांचे गिरिवर । रामनामें नासती ।।** ४-३-२२

२. **नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती । नामें होये उत्तम गती । अंतकाळी ।।**४-३-१३

३. **सहस्त्रा नामामधे कोणी येक । ह्मणतां होतसे सार्थक । नाम स्मरतां पुण्यश्लोक । होइजे स्वयें ।।** ४-३-२०

**न[१] वेचे कदा ग्रंथिचें[२] अर्थ[३] कांहीं ।**
**मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं[४] ।**
**महां घोर संसार[५] शत्रु जिणावा[६] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७२।।**

१. खर्च होत नाही.

२. गांठीचा, पदरचा.

३. पैसा.

४. नामस्मरण हे साधन फार सोपे आहे. त्याला कांही वेचावें लागत नाही, कष्टावें लागत नाही, कांही उपकरणे किंवा सामुग्री लागत नाही.

५. पण असें जरी हे सोपे साधन आहे तरी त्याचे कार्य मोठे आहे. नामस्मरणापुढे संसाररूपी भयंकर शत्रूचे कांही चालत नाही. अखंड नामस्मरण करणाराला संसारांतील उपाधी बाधत नाहीत.

६. जिंकावा. **तुला सांगतो गूज हे बीज मंत्रु । जेणे नीरसे थोर संसार शत्रु । नव्हे मिथ्य हें बोलणें सत्य वाचा । जपे अंतरी मंत्र तेराक्षराचा ।।**
।। श्री राम जय राम जय जय राम ।। ।। श्री दासजय दास जय जय दास ।।

**देहेदंडणेचें[1] महां दुख आहे ।**
**महां दुख तें नाम[2] घेतां न राहे ।**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा[3] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७३।।**

१. तीर्थयात्रा, व्रते, अनुष्ठानें इत्यादि जी साधनें आहेत त्यांत शरीराला कष्ट असतात.

२. परंतु नामस्मरणांत तसले कोणत्या हि प्रकारचे कष्ट होत नाहीत.

३. देवांचा हि देव जो श्रीराम. **सेवकु मानवीयांचे । कष्टती बहुतांपरि । सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहालों ।।** मा.पं.४-३ **राम हा देव देवांचा । देव प्रत्यक्ष सोडिले । गाजली गोष्टी वैकुंठी । माजली सचराचरीं ।।** स्फु.प्र.६४

**बहूतांपरी संकटें साधनाचीं ।**
**व्रतें दान उद्यापनें तें धनाचीं ।**
**दिनाचा दयालु मनीं आठवावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७४।।**

नामस्मरण हे किती सुलभ साधन आहे हे दर्शविण्यासाठी हा श्लोक आहे.



तीर्थयात्रीदि इतर साधने इतकी सोपी नाहीत. त्या वेळी काशीयात्रा हि दुर्घट होती. आज ती दुर्घटता काशीयात्रेत नसली तर मानससरोवर दर्शनांत आहे. त्यांत नसलीतर त्याच्या पलिकडच्या यात्रेंत आहे. तसे व्रते, उद्यापनें किंवा दानधर्म करणे ही कामे पैशाची आहेत. ती निर्धनाच्या हातून होणार नाहीत. ज्यांत श्रम नाहीत, साहस नाही, द्रव्यादिकांची अपेक्षा नाही असे सर्वांना सुलभ वाटणारें परमार्थाचें साधन ह्मटलें ह्मणजे दीन दयाळ श्रीरामचंद्र यांचे अखंड नामस्मरण हे होय. **यासी नचले कांही विघ्न । कोण्ही हि न करूं शके भग्न । ह्मणौनि नारदादि सर्वज्ञ । परी नामीं च रमोनि राहिले ।।**

पण हे साधन खरोखर च कां इतकें सोपे आहे आणि तें जर इतके सोपे आहे तर त्याचा आश्रय करून सर्व जीव आपला उद्धार कां करून घेत नाहीत? साधन सोपे आहे याचा अर्थ त्यांत कष्ट नाहीत इतके च, परंतु तें घोर तपश्चर्या व निष्ठा यावांचून कोणास साधत नाही ! चारी अवस्थांत अखंड नामस्मरण होणे काय सोपे आहे ! एक परी अवघड यात्रा करवतील व व्रतादिकांसाठी शरीर कष्टवून वित्तोपार्जन करून उद्यापनें हि होतील, पण अखंड नामस्मरण होणार नाही ! श्रीसमर्थांचे वडील बंधु ह्मणतात च :- **सुलभ व्रत तप दान दमन । सुलभ तीर्थाटण वेदाध्ययन । सुलभ यज्ञ व्याकरणाभ्यासन । हरिभक्ति अति दुर्लभा ।।** भ.र.५६-७५

**समस्तामधें सार साचार आहे ।**
**कळेना तरी सर्व शोधून पाहें ।**
**जिवा संशयो वाउगा तो तजावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७५।।**

सर्व उपायांमध्ये रामनाम हें खरोखर सार आहे, सत्य आहे. तें कसें, हे समजत नसल्यास ग्रन्थग्रन्थांतरी शोध करून विचार करून पहा ह्मणजे कळेल. पण असे कांहीच न करितां निरर्थक संशयाचे भरी भरण्याचे सोडून द्यावे. अहर्निशी श्रीरामाचें चिंतन करावे हे च उत्तम. **रामदास ह्मणे साराचें हि**

**सार। सर्वांसी आधार भक्ती भाव ।।** स्फु.ओ.२५१ **भजनरहित ज्ञानें मोक्ष होणार नाहीं । सकळ निगम त्यांचे सार शोधूनि पांही । सगुण भजन मागें रक्षिलें थोर थोरी । अधम नर तयांचे ज्ञान संदेहकारी ।।**

**नव्हे कर्म ना धर्म ना योग कांही ।**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग[१] पाहीं ।**
**म्हणे दास विश्वास नामीं धरावा[२] ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७६।।**

१. यथासांग, विधिपूर्वक.

२. कर्म, धर्म, योग, भोग, त्याग कांही च यथाविधि घडत नाही आणि तशांत नामस्मरणाचे ठिकाणी हि विश्वास नसेल तर मग त्या पापाला पारावार नाही. या कलियुगांत कर्म, धर्म, योग इत्यादि यथासांग घडणे दुर्घट आहे, तेव्हां विश्वासयुक्त अंत:करणाने नामस्मरण करून तरून जावें असा श्रीसमर्थांचा उपदेश आहे. श्रेष्ठ हि ते च सांगतात :
**कलौ कर्मधर्मादि सकळ । परमेश्वरस्मरणेविण विकळ । जीविका चि अधर्माचें मूळ । तद्रूप सर्व हि आचार ।।** भ.र.८-५१ **यासाठी सकळ हि तपें तेणें केलीं । सांग विधिपूर्वक त्यासी च फळलीं । ज्याचे वाचें विश्वासें आलीं । नामें हरिहरार्ची ।।** ८-४७ **तेणें केले सर्व हि याग । तेणें केले महा योग । तेणें केला सर्वस्वाचा त्याग । हरिहरनामें स्मरे जो ।।** ८-४८

**करी काम नि:काम या राघवाचें ।**
**करी रूप स्वरूप सर्वां जिवाचें ।**
**करी छेद निर्द्वंद हे गूण गातां ।**
**हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ।।७७।।**

**अन्वय :** या राघवाचे काम (भक्ताला) निष्काम करी; (राघवाचे) रूप



(भक्ताला) सर्वां जिवाचे स्वरूप करी; हे गुण गातां (व) हरिकीर्तनी वृत्तिविश्वास होतां (राघवाचा गुणांचा) छंद (भक्ताला) निर्द्वंद करी.

**अर्थ :** एका श्रीरामाची इच्छा केली, श्रीरामचरणाला मनाला सारखा ध्यास लागला, ह्मणजे भक्त निष्काम होतो, त्याच्या सर्व इच्छा नाहीशा होतात किंवा सर्व इच्छा पूर्ण होऊन तो निष्काम होतो. **मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।** आणि कामाची तंगडी मोडली ह्मणजे मग कामापासून होणारे सर्वच अनर्थ आपोआप टळतात;

राघवाचें ध्यान हृदयामध्यें एकदां ठसावले ह्मणजे भक्ताला सर्वत्र राम भरलेला दिसतो, त्याची दृष्टि जाई तिकडे त्याला राम च दिसतो, **पहा पहा या जगांत राम आहे रे । राम आहे राम आहे राम आहे रे ।।** याचा त्याला अनुभव येतो, **रिता ठाव या राघवेवीण नाहीं ।** हे त्याच्या प्रत्ययास येतें, **माझा राम अवघाचि आपण । दुसरें नाही त्याची च आण ।।** असें तो प्रतिज्ञापूर्वक ह्मणूं लागतो; राघवाचे गुण गात गात हरिकीर्तनाच्या ठिकाणी वृत्ति स्थिर होऊन श्रीरामाच्या गुणानुवादाचा भक्ताला जो छंद लागतो तेणे करून भक्त निर्वैर होतो.

**अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं ।**
**तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ।**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता ।**
**वृथा वाहणें देहे संसार चिंता ।।७८।।**

ज्याचीपरमेश्वरावर निष्ठा नसते अशा क्षुद्र मनुष्याला सर्व कांही बाधते, त्याला कशाचें हि सुख लागत नाही, देहाची व संसाराची चिंता करण्यांत तो चूर असतो. परंतु **सर्व कांही चिंता केली भगवंतानें ।** असा ज्याचा विश्वास असतो त्याला सुखदु:खाची मुळी पर्वा च उरत नाही; आणि असे होणें साहजिक आहे. मोक्षदाता प्रभु श्रीराम यानें आपला सर्व भार घेतला आहे अशी निष्ठा असल्यावर काळजी कशाची उरणार ? **वसे अंतरी रामविश्वास जेथें । नसे**

**मानसीं नष्ट संदेह तेथें । विवेकें अहंभाव ज्याचा गळाला । सदा राघवीं ऐक्यरूपें मिळाला ।।**

**मना पावना भावना राघवाची ।**
**धरीं अंतरीं सोडिं चिंता भवाची ।**
**भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।**
**नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली ।।७९ ।।**

**अन्वय :** मना, राघवाची पावना भावना अंतरी धरी, भवाची चिंता सोडि, जिवा मानवा भवाची भूलि ठेली, नसे वस्तूची धारणा वेर्थ गेली.

**अर्थ :** हे मना, तूं जी प्रपंचाची चिंता करीत असतोस ती सोडून त्याऐवजी मनाला पावन करणारी अशी श्रीरामाची भावना कर, श्रीरामाचा तुला ध्यास लागूं दे. **सांडून आपली संसारवेथा । करीत जावी देवाची चिंता ।।** ४-८-७ परंतु, हे सोडून देऊन तूं संसाराची च चिंता करीत असतोस, पण संसार ही नुसती भूल, भ्रम आहे. **येक परब्रह्म संचलें । कदापी नाहीं विकारलें । त्यावेगळें भासलें । ते भ्रमरूप ।।** १०-६-९ अशा भ्रमरूप, मिथ्या संसाराची (नसे वस्तुची = नसणाऱ्या, मिथ्या, असत्य गोष्टीची) भावना व्यर्थ होय. **नसत्या वस्तूंच्या ठायीं जाण । मी माझें हा अभिमान । तें चि मोहाचें लक्षण । ममता दारुण ते संधी ।।** ए.भा. सत्य स्वरूपाचा छंद घे, मिथ्या मायेचा सोड, इत्यर्थ.

**धरा श्रीवरा[१] त्या हरा[२] अंतरातें ।**
**तरा दुस्तरा त्या परा सागरातें[३] ।**
**सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें[४] ।**
**करा नीकरा त्या खरा मछरातें[५] ।।८० ।।**

१. श्रीवर = सीतापति श्रीराम.



11/79

२. हराअंतरातें = हरहृदयातें; शंकराचें हृदय जो, शंकराच्या हृदयांत असलेला जो श्रीराम त्याला. शंकराच्या हृदयांत असणारा श्रीराम त्याला धरा, त्याला आपल्या हृदयांत अखंड सांठवा, त्याला आपलासा करा.
३. तेणे करून दुस्तर ह्मणजे तरून जाण्याला कठीण असा जो पर ह्मणजे फार मोठा (प्रपंचरूपी) सागर त्याला तरून जा.
४. दुर्भर ह्मणजे भरण्यास कठीण, किती हि भरले तरी जें भरत च नाही, असे जे पोट ते भरा, आह्मी नाही ह्मणत नाही, पण सारखें आपलें त्या पोटाच्या च नादी लागूं नका, त्यापासून सरा ह्मणजे मागें हटा, अलिप्त रहा व त्याला विसरा. **संसार सुखें करावा । परी कांही परमार्थ वाढवावा ।।**
५. व खर ह्मणजे गर्दभ, तद्रूप जो मत्सर त्याला नीकरा करा ह्मणजे त्याच्याशी हट्टाने झगडून त्याचा नाश करा. या मत्सराच्या योगानें आपण सत्य ते असत्य व असत्य ते सत्य मानीत असतो, यासाठी बुद्धिभ्रंश करणारा मत्सर टाकून देऊन साधुसंतांनी आक्रमिलेल्या मार्गाने जा, हा भावार्थ.

**मना मछरें[१] नाम सांडूं नको हो ।**
**अती आदरें हा निजध्यास[२] राहो ।**
**समस्तांमधें नाम हें सार आहे[३] ।**
**दुजी तूळणा तूळितां ही न साहे[४] ।।८१ ।।**

१. हे मना, सत्पुरुषांविषयी मत्सरग्रस्त होऊन नामस्मरण सोडून देऊं नकोस.
२. नामस्मरणाचा छंद लागला ह्मणजे ज्या दैवताचें आपण नामस्मरण करितो त्याचा निदिध्यास लागतो व तेणेंकरून साधक साक्षात्कारी होतो.
३. सर्व साधनांमध्ये श्रेष्ठ साधन नामस्मरण हें होय. **कांही च न करूनि प्राणी । राम नाम जपें वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ।**
४. त्या नामस्मरणाची सर यज्ञ, याग, दान, तप, व्रत इत्यादि साधनांना येणार नाही.

**बहू नाम या रामनामीं तुळेना[1] ।**
**अभाग्या नरा पामरा हें कळेना ।**
**विषा औषध घेतलें पार्वतीशें[2] ।**
**जिवा मानवा किंकरा कोण पूसे ।।८२।।**

१. **काय करावे कष्टसाध्य मंत्र अन्य । नश्वर फळद विधानलोपें देती दैन्य । एक होत्साता शाश्वतफळद धन्य । उघडा मंत्र श्रीराम ।।** सु.उ.१०-९९

२. **जेणें दिग्बंधन जालें मुक्त । जेणें विधिनिषेध केला भक्त । जो आचांडाळविप्रपर्यंत युक्त । तो उघडा मंत्र श्रीराम ।।१००।। जो नवविधभक्तीचे मूळ । जो चतुर्विधमुक्तीचें फळ । जो सर्व साधनांची सिद्धि केवळ । तो उघडा मंत्र श्रीराम ।।१०१।। जयाचें वर्णितां महिमान । न शक्रोमि ह्मणजे चतुरानन । शेषा सहस्त्रमुखीं घडे मौन। तो उघडा मंत्र श्रीराम ।।१०२ ।। तारकब्रह्म हें नाम ज्याचें । काशी मुक्तिक्षेत्र हें गौरव त्याचें । जें कंठरत्न उदास सदाशिवाचें । तो उघडा मंत्र श्रीराम ।।१०३।।** सु.उ.१० **सकळ जनामधें नाम । राम नाम उत्तमोउत्तम । श्रम जाउनी विश्राम । चंद्रमौळी पावला ।।** १६-८-३ तेथे क्षुद्र अशा मनुष्याची कथा काय ?

**जेणें जाळिला काम तो राम ध्यातो[1] ।**
**उमेसी अती आदरें गूण गातो[2] ।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें ।**
**परी अंतरीं नामविश्वास तेथें[3] ।।८३।।**

१. ज्यानें कामाला जाळून भस्म केलें असा मदनारि शंकर श्रीरामाचे ध्यान करिता. (मग ज्यांची काममगरमिठी सुटत नाही त्यांनी नामस्मरणाचा किती तरी छंद घेतला पाहिजे.)



२. तो पार्वतीसह अत्यंत आदरपूर्वक श्रीरामाचे गुण गातो. अध्यात्मरामायण उमामहेश्वरसंवादात्मक आहे हे सर्वविश्रुत च आहे.

३. ज्या शंकराचे ठिकाणी श्रेष्ठ ज्ञान, वैराग्य व सामर्थ्य ही आहेत तो देखील नामस्मरणावर विश्वास ठेऊन अखंड नामस्मरण करितो; मग ज्यांना ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य यांपैकी कांही च नाही, जे दीन, दुर्बल, लाचार, हताश, हतवीर्य आहेत त्यांनी श्रद्धापूर्व नामस्मरणाचा किती निदिध्यास लावून घेतला पाहिजे हे काय सांगावयास पाहिजे !

**विठोनें शिरीं वाहिला देवराणा ।**
**तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा[1] ।**
**निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी ।**
**जिवां सोडवी राम हा अंतकाळीं[2] ।।८४।।**

१. विठ्ठलाने ज्या शंकराला आपल्या मस्तकी धारण केलें आहे त्या शंकराला ज्या श्रीरामाचा ध्यास लागला आहे त्यास आपण ओळखत नाही, यास काय ह्मणावें ?

२. ज्या रामानें शंकराची बाधा दूर केली तो च राम अंतकाळी आपणांस मुक्ति देईल. **लीळा वेषधारी भक्तांचे माहेर । ध्यानीं गौरीहर चिंतीतसे।। चिंतीतसे रामनाम पूर्णकाम । पावला विश्राम रामनामें ।। नव्हे सोडवण रामनामेंवीण । रामदास खूण सांगतसे ।।** स्फुट आ.३०

**भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।**
**जपू नेमिला नेम गौरीहराचा ।**
**स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी ।**
**तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं ।।८५।।**

**राम विश्राम देवांचा । राम भक्तांसि आश्रयो । राम योगीमुनीध्यानी। राम रक्षी ऋषी कुळा ।।** मा.पं.१-१ **राम ध्यातो चंद्रमौळी । राम राम सदा**

**जपे । रामकथा ऐकतां हे । रामरूप निरंतरी ।।२।। पार्वती पुसतां सांगे। राम जप अत्यादरें । सुंदरें दोनी अक्षरें । निवालों अंतरी सुखें ।।३।। जाळिले पोळिले वीषे कर्कशें काळिमा चढे । उपाय बहुधा केले । रामनामें चि सुटिका ।।४।। सव्य अपसव्य या नामें । तरले सुटले बहु । अंतकाळी सर्व काळी । सुटिका सकळै जना ।।५।।**

**मुखीं राम विश्राम[१] तेथेंचि आहे ।**
**सदानंद आनंद सेऊनि राहे[२] ।**
**तयावीण[३] तो सीण संदेहकारी ।**
**निजधाम[४] हें नाम शोकापहारी ।।८६।।**

१. श्रीराम हा च योगेश्वांचा विश्राम आहे असें मागच्या श्लोकांत सांगितले, तो श्रीराम ज्यांनी कंठी धारण केला त्यांना च विश्राम मिळाला, शांतसुख लाभले.
२. ह्मणून मी ह्मणतो, हे मना, तूं अखंड नामस्मरण करीत नित्यानंदांत निमग्न होऊन रहा.
३. श्रीरामावांचून बाकी सर्व संशय उत्पन्न करणारा शीण आहे. **सांडून राम आनंदघन । ज्याचे मनी विषयचिंतन । त्यासी कैचे समाधान । लोलंगतासी ।।**
४. श्रीरामाचे नाम हें च शोक हरण करुन विश्रांति देणारें आमचें धाम होय.

**मुखी राम त्या काम बाधूं शकेना[१] ।**
**गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना[२] ।**
**हरीभक्त तो शक्त कामास मारी[३] ।**
**जगीं धन्य तो मारुती ब्रह्मच्यारी[४] ।।८७।।**

१. अखंड नामस्मरण करणाराला कामाची बाधा होऊं शकत नाही. **जो कोणी स्मरे माझें नामु । तिकडे पाहूं न शके कामु ।।ए.भा.१२ १५५**



२. श्रीरामाच्या गुणसंकीर्तनाच्या योगानें साधकावर किती हि संकटे आली तरी तो डगमगत नाही. **विषई धांवे वासना । परी तो कदा डळमळिना। ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्वगुण ।।**
३. हरिभक्ति करणारा सामर्थ्यवान् होय, त्याच्या पुढें कामाचें कांही चालत नाहीं, तो कामाला जिंकतो.
४. पहिल्या तीन चरणांत रामनामस्मरणाचा जो महिमा वर्णिला आहे त्याचे प्रत्यक्ष उदाहरण ह्मणजे मारुतीचे होय.

**बहू चांगलें नाम या राघवाचें ।**
**अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।**
**करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें ।**
**जिवां मानवां हें चि कैवल्य साचें ।।८८।।**

‘‘राम’’ ही दोन अक्षरे किती चांगली आहेत, गोड आहेत, थोडक्यांत आहेत, सोपी आहेत आणि फुकटची आहेत ! श्रोता प्रश्न करितो, ‘‘राम’’ ही अक्षरें किती सोपी आहेत, थोडक्यांत आहेत, फुकटची आहेत इत्यादि रीतीनें जें या नामाचे महात्म्य वर्णन केले यापेक्षां जास्त त्या नामांत कांही नाही काय ? आणि एवढें च जर या दोन अक्षरांचे महत्व असेल तर मग त्यांत कांही मोठेसे नाही. वक्ता उत्तर देतो, आह्मी पहिल्या दोन चरणांत सांगितलेले गुण तर या नामी आहेत च पण ते नाम जो घेईल तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटेल. रामनाम घेतलें असतां भवाचें ह्मणजे जन्माचें मूळ जी वासना तिचे ते नाम निर्मूलन करितें,आणि ह्मणून आह्मी ह्मणतो, रामनामस्मरण हें च खरोखर आमचे कैवल्य होय, हा च आमचा मोक्ष होय. **सोपें सुगम हें नाम राघवाचे। सर्व काळ वाचे येवों द्यावें ।। येवों द्यावें वाचे नाम निरंतर । तेणे हा संसार तरीजेले ।। तरीजेल नामी रामदास ह्मणे । सावधान होणें रामनामीं।।**

**जनीं भोजनीं नाम वाचे वदावें[१] ।**
**अती आदरें गद्य घोषें[२] म्हणावें ।**
**हरीचिंतनें अन्न जेवीत जावें ।**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।।८९।।**

१. **चालतां बोलता धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ।।४-३-७**
तात्पर्य, अखंड नामस्मरणाचा छंद लागावा ह्मणजे ज्याचे नाम आपण स्मरतों तो श्रीराम पावल्यावांचून राहणार नाही.

२. गद्य घोषे = गर्जना करून, मोठ्यानें.

**न ये राम वाणी तया थोर हाणी[१] ।**
**जनी[२] वेर्थ प्राणी तया नाम काणी[३] ।**
**हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं ।**
**बहू आगळें बोलिली व्यासवाणी[४] ।।९०।।**

१. ज्याच्या मुखी राम नाम येत नाही तो आपण होऊन आपला मोठा घात करून घेत आहे.

२ जगामध्यें ज्याचा जन्म निरर्थक आहे अशा च मनुष्याला नाम हे तुच्छ वाटतें किंवा नामस्मरणाचे त्यास कष्ट वाटतात; अर्थात् ज्याला नामस्मरण तुच्छ किंवा क्लेशदायक वाटतें त्याचा जन्म निरर्थक होय.

३. काणी= तुच्छ. हंसकोश कारांनी क्लेश असा अर्थ दिला आहे.

४. ''हरीनाम हे बहु आगळे (आहे अशी) वेदशास्त्री पुराणी व्यासवाणी बोलली (आहे)'' असा अन्वय करून कोणी अर्थ करितात. परंतु वेदशास्त्रे ही कांही व्यासप्रणीत नाहीत अशी शंका घेऊन ''वेदशास्त्री हरीनाम हे बहु आगळे (आहे अशी) पुराणीं व्यासवाणी बोलली (आहे)'' असा अन्वय दुसरे कांही लावतात. यावर पहिल्यांचे ह्मणे असे की, इतके बारीक



भेद करण्याला श्रीसमर्थांना वेळ नव्हता. व्याकरणादिकांचे नियम त्यांना बाधक होत नसत. त्यांचा जो कवित्वाचा प्रवाह चाले तो पाहून व्याकरणानें वाटल्यास आपले नियम बदलावे, आणि ह्मणून पहिला व अन्वयार्थ योग्य होय; व्यासवाणी पुराणापुरती च घ्यावी ह्मणजे झाले.

**नको वीट मानूं रघूनायेकाचा[१] ।**
**अती आदरें बोलिजे राम वाचा ।**
**न वेचे[२] मुखीं सांपडे रे फुकाचा ।**
**करी घोष[३] त्या जानकीवल्लभाचा ।।९१।।**

१. श्रीरामनामस्मरणाचा. २ यांत तुझें कांही खर्च होत नाही. **३ जय जय रघुवीर समर्थ ।** असा घोष करावा. असा घोष केल्यानें काय होईल ? याचे उत्तर पुढील श्लोकांत दिले आहे.

**अती आदरें सर्व ही नामघोषें[१] ।**
**गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें ।**
**हरी तिष्टतु तोषला नामतोषें[२] ।**
**विशेषें हरा मानसीं रामपीसें[३] ।।९२।।**

१. श्रीरघुवीराचा अती आदराने घोष केल्यास घोष करणारापासून सर्व दोष पळून गिरिकंदरी लपावयास जातात, सर्व दोष नाहीसे होतात, इत्यर्थ. **नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर । माहा दोषांचे गिरिवर । रामनामें नासती ।**

२. ''नामतोषें तोशला हरी तिष्ठतु'' असा अन्वय. नामस्मरणाच्या आनंदानें आनंदित झालेला असा परमेश्वर तिष्ठतु ह्मणजे रहातो; जेथें नामस्मरण होत असेल तेथे आनंदाने रहातो, असा अर्थ. **नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।। नाहीं वैकुंठीचा**

**ठाईं । नाहीं योगियांचा हृदई । माझे भक्त गाती ठाई ठाई । तेथें मी तिष्ठतु नारदा ।।**

३. हरा मनासी रामपीसें विशेष (आहे), असा अन्वय शंकराच्या अंत:करणाला रामनामस्मरणाचें वेड विशेष आहे, असा अर्थ.

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता ।**
**तया लागली तत्वता सार[१] चिंता ।**
**तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें ।**
**मना सांग पां रे तुझें काय वेचे ।।९३।।**

१. सार = सर्व. वस्तुत: प्राणीमात्राचा योगक्षेम चालविण्याची सर्व काळजी परमेश्वर करितो. त्या परमेश्वराचें फुकटचे नाम घेण्यांत, हे मना, तुझें काय खर्च होतें रे ! **आह्मि काय कुणाचे खातों रे । तो राम आह्मांला देतो रे ।।**

**तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां ।**
**निवाला हरू तो मुखें नाम घेतां ।**
**जपे आदरें पार्वती विश्वमाता ।**
**म्हणोनी म्हणा तें चि हें नाम आतां ।।९४।।**

**सुरेंद्र चंद्रशेखरु । अखंड ध्यातसे हरु । जनासि सांगतो खुणा । श्री राम राम हें ह्मणा ।। महेश पार्वतीप्रती । विशेष गूज सांगती । सलाभ होतसे दुणा । श्री राम राम हें ह्मणा ।। विषें बहुत जाळिलें । विशेष आंग पोळिलें । प्रचीत माझिया मना । श्री राम राम हें ह्मणा ।। बहुत प्रेत्न पाहिले । परंतु सर्व राहिले । विबुधपक्षरक्षणा । श्री राम राम हें ह्मणा ।। अपाय होत चूकला । उपाय हा भला भला । नसे जयासि तूळणा । श्री राम राम हें ह्मणा ।। बहुत पाहिले खरें । परंतु दोनि आक्षरें। चुकेल येमयातना । श्री राम राम हें ह्मणा ।।** स्फु.श्लो.१



**अजामेळ[१] पापी वदे पुत्रकामें ।**
**तया मुक्ति नारायेणाचेनि नामें ।**
**शुकाकारणें कुंटणी[२] राम वाणी ।**
**मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ।।९५।।**

१. अजामिल नावाच्या मूळच्या सदाचारी, पण मन अनावर झाल्यामुळें पापी बनलेल्या ब्राह्मणाला दासीपासून दहा पुत्र झाले; त्यांत धाकट्याने नांव नारायण होते. त्यावर त्याचें अत्यन्त प्रेम असे. आसन्नमरण स्थितीत हि अरे नारायणा, अरे नारायणा, अशा च तो हांका मारीत होता. जरी त्या हांका पुत्राला होत्या, तरी तो वैकुंठला गेला. केवळ पुत्राच्या मिषानें मरणसमयी हरिनामस्मरण घडलें तरी अजामिल विष्णुपदी गेला, मग श्रध्दापूर्वक नामस्मरण करणारा पुरुष उत्तम लोकी जाईल यांत काय नवल आहे ?

२. **या च देहीं गती पावली कुंटणी । रामनाम वाणी उच्चारीतां ।।**

**महां भक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं ।**
**जपे रामनामावळी नित्यकाळीं ।**
**पिता पापरूपी तया देखवेना ।**
**जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना ।।९६।।**

ह्मणून ज्यांचा नामस्मरणावर विश्वास नाही ते दैत्य च होत. प्रत्यक्ष दैत्य हिरण्यकशिपु याच्या पोटी जरी प्रल्हाद जन्मास आला होता तरी लहानपणापासून च त्याचें लक्ष ईश्वरचरणी लागलेलें होतें. बाळा, तुला शाळेंत पंतोजीनें काय शिकविलें ह्मणून हिरण्यकशिपूनें मोठ्या प्रेमानें प्रश्न केल्यावरुन **श्रवणं कीर्तनं विष्णो : स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदम् ।।** इत्यादि उत्तर प्रल्हादाने दिलें ! झालें, हिरण्यकशिपूच्या मनाने घेतले की शाळेतील शिस्त बिघडली. तो गुरुपुत्रांना अद्वावद्वा बोलला.

प्रल्हादाची ही नैसर्गिक मति आहे असें गुरुपुत्र ह्मणत, तें हिरण्यकशिपूला पटेना. त्यानें शालेला जास्त शिस्त लावली; तरी प्रल्हादाची भगवद्भक्ति कमी होत नाही, असे पाहून प्रल्हादाचा त्यानें अतोनात छळ केला. तथापि प्रल्हाद भक्तिमार्गापासून लवमात्र ढळला नाही. अखेरीस बापानें मुलाला स्वत: ठार मारण्याचे इच्छेनें आणविलें; मूर्खा मजवांचून दुसरा कोण जगन्नायक आहे, तो सर्वत्र आहे ह्मणतोस तर तो या खांबांत आहे काय ? अशी हिरण्यकशिपूने गर्वोक्ति केली. ''होय, आहे' असाच जबाब प्रल्हादा ने दिला. कार्ट्या, हा मी तुला ठार करितों आणि खांबातील तुझा हरि तुझें कसें रक्षण करितों पहातो, असे त्वेषानें ह्मणून हिरण्यकशिपूनें खांबावर जोराने मुष्टिप्रहार करितां च भगवान श्रीहरि नृसिंहरूप धारण करून त्या स्तंभाचे ठिकाणी प्रगट झाले. भक्तकैवारी भगवान दासाची कधी हि उपेक्षा करीत नाहीत, हें दाखविण्यासाठी श्रीसमर्थांनी पुढील श्लोक १२१ यांत या कथेचा पुढील अन्वय आणला आहे. श्रीमत् भागवत, सप्तम स्कंध अध्याय ५ ते १० यांत प्रल्हादाचा जो कथाभाग आला आहे, तो प्रत्येक बालानें अवश्य प्रेमानें वाचावा ! **हरिभक्त येक जाहाला प्रल्हाद । जयाचा गोविंद कैवारी ।। कैवारी हरि राखे नानापरी । ऐसा भाव धरीं आलया रे ।।**

**मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची ।**
**अहंतागुणें यातना ते फुकाची ।**
**पुढें अंत येईल तो दैन्यवाणा ।**
**म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ।।९७।।**

माझें घर, माझी शेती, माझा प्रपंच, अशा रीतीनें माझें माझें करण्यानें व्यर्थ दु:ख मात्र होतें, मरणसमयी यांतले कांही एक उपयोगी पडावयाचें नाहीं, असा विचार करून अहोरात्र प्रपंचांत गुंतलेल्या मनाला कांही प्रहर तरी तेथून काढून नामस्मरणाकडे लावावे ! ज्याच्या मुखीं राम नाही, त्याच्या अंतरी तरी भगवंत कोठून येणार आणि त्याला मुक्त तरी कशी मिळणार ! **कोणाचें हे घर**



**कोणाचा संसार । सांडुनी जोजार जाणें लागे ।।** स्फु. ओ. २५-१ **जाणें लागे अंती येकलें सेवट । वेर्थ खटपट सांडुनीयां ।।२।। जन्मवरी देहे संसारी गोविलें । नाहीं कांही केलें आत्महित ।।३।। आत्महित गेलें संसाराचे वाढी । अंती कोण सोडी रामेंवीण ।।४।।**

**हरीनाम नेमस्त पाषाण तारी[1] ।**
**बहू तारिले मानवदेहधारी ।**
**तया रामनामीं सदा जो विकल्पी[2] ।**
**वदेना कदा जीव तो पापरूपी ।।९८।।**

१. **नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । माहा पापी ते चि जाले । परम पवित्र ।।** धादांत पाषाण तरले, मग मानवदेहधारी, पाषाण का होईनात, रामनामेंकरून तरील यांत काय संशय उरला.

२. पण असें असून हि, त्या रामनामाविषयी नेहमी साशंक होऊन जो कधी हि नामस्मरण करीत नाही तो पापी ह्मटला पाहिजे. **सद्य प्रत्यय हि देखोनि । भक्ति नुपजे ज्याचें मनीं । तो चि पाषाण ये जनीं । नव्हे पाषाण पाषाण ।।**भ.र.२३-४४

**जगीं धन्य वाराणसी पुण्यरासी ।**
**तयेमाजिं जातां गती पूर्वजांसी ।**
**मुखें रामनामावळी नित्यकाळीं ।**
**जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ।।९९।।**

**नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसी विश्वेश्वर । वाराणसी मुक्ति क्षेत्र । रामनामें करूनी ।।**४-३-१५ रावणवधान्ती सर्व देवांनी श्रीरामाची स्तुति केली, तेव्हां स्तुति करितांना महादेव ह्मणालें :- **अहं भवन्नाम गृणन्कृतार्थो । वसामि काश्यामनिशं भवान्या । मुमूर्षमाणस्य विमुक्तयेऽहं । दिशामि मंत्रं तव राम नाम ।।**(अ.रामायण पु.स.१५-६२)

**येथासांग रे कर्म तें हि घडेना ।**
**घडे धर्म तें पुण्य गांठी पडेना ।**
**दया पाहतां सर्व भूतीं असेना ।**
**फुकाचे मुखीं नाम तें हि वसेना ।।१००।।**

या कलियुगांत यथाविधि कर्मे होत नाहींत, धर्म घडत नाहीं, घडला च तर त्या मनानें त्याचें पुण्य पदरीं पडत नाहीं, भूतमात्रविषयी अंतरी दया वसत नाहीं, अशा स्थितीत भगवंताचें फुकटचें नाम तरी मुखीं यावें, तर तें हि येत नाहीं ! कोण ही दुर्दशा ! ''**कलौ करितां हि न करवे स्वकर्म । धरितां हि न धरवे स्वधर्म ।'' न कळे कैसें भूतदयावर्म । नाम हि फुकाचें न ये मुखीं ।।**

**जया नावडे नाम त्या येम जाची ।**
**विकल्पें[1] उठे तर्क त्या नर्क ची ची ।**
**म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें ।**
**मुखें बोलतां दोष[2] जाती स्वभावें ।।१०१।।**

१. नामस्मरणाविषयी संशयग्रस्त होऊन जे तर्क कुतर्क काढितात त्यांना नर्कवास प्राप्त होऊन त्यांची छी थू होते.
२. **गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें ।।९२।।**

**अती लीनता सर्वभावें स्वभावें[1] ।**
**जना सज्जनालागिं संतोषवावें ।**
**देहे कारणीं[2] सर्व लावीत जावें ।**
**सगूणीं[3] अती आदरेंसी भजावें ।।१०२।।**

१. महंताचा स्वभाव च असा असावा कीं, त्यानें सर्वांशी मनोभावेंकरून नम्रपणे वागून सत्पुरुषांना संतोषवीत असावें.



२. सर्व देह भगवत्कारणीं झिजवीत जावा; नेत्रानें सगुण मूर्तीचें दर्शन घ्यावें, घ्राणेंद्रियानें श्रीपदावरील तुलसीचें अवघ्राण करावें, जिव्हेनें नामस्मरण करावें, कानानें गुणानुवाद श्रवण करावे, मस्तकानें नमन करावें, हातानें पूजन करावें, चरणानें तीर्थयात्रा कराव्या, इत्यादि. **सर्व काळ राम मानसीं धरावा । वाचे उचारावा नामघोष ।।** स्फु.ओ.४६-४ **नामघोष वाचे श्रवण कीर्तन । चरणीं गमन देवाळया ।।५।। देवाळयां जातां सार्थक जाहालें । कारणीं लागलें कळीवर ।।६।। कळीवर त्वचा जोडुनी हस्तक । ठेवावा मस्तक रामपाईं ।।७।।**
३. **सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें** ह्मणून सगुणाची उपासना अति आदरानें करावी. सर्व सृष्टि जेथें मिथ्या आहे, तेथें सगुणोपासना कां करावी, अशी मनाला शंका येऊं देऊं नये. **एवं सृष्टि मिथ्या जाण। जाणोनि रक्षावें सगुण । ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती।।**

**हरीकीर्तनें[1] प्रीति रामीं धरावी ।**
**देहेबुधि नीरूपणीं वीसरावी ।**
**परद्रव्य[2] आणीक कांता परावी ।**
**येदर्थी मना सांडि जीवीं करावी ।।१०३।।**

१. कीर्तन ह्मणजे सगुणरूपगुणानुवादन व निरूपण ह्मणजे अद्वैतविवरण. **सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत ह्मणिजे निरूपण ।।**४-२-२३ सगुणाचें कीर्तन स्वत: करीत असतां किंवा श्रवण करीत असतां श्रीरामी रंगून जावें. तसेंच अद्वैताचें निरूपण स्वत: करीत असतां किंवा श्रवण करीत असतां देहाचें भान राहूं नये. साहजिक आहे. एकदांचित्त श्रीरामचरणीं जडले ह्मणजे देहाचे व परिस्थितीचें भान कोठून उरणार ?

**ध्यानी गुंतले मन । कैचें आठवेल जन । निशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ।। १४-५-२७**

२. **कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हे ची दोनी ।। स्फु.ओ.१३६-२** ह्मणून हे मना, त्या उभयतांचा मनापासून त्याग कर. पहिल्या दोन चरणांचा दुसऱ्या दोन चरणांशी काय संबंध आहे असा कोणी प्रश्न विचारताच त्याचें दुसरे कोणी उत्तर देतात कीं, पहिल्या दोन चरणांत सांगितल्याप्रमाणें कीर्तनप्रसंगी मन श्रीरामकार होऊन श्रोत्यांवक्त्यांना देहाचा हि विसर पडावा अशी इच्छा असेल तर द्रव्य आणि कांता यांची कल्पना सुध्दा डोळ्यापुढें येतां कामा नयें. ह्मणून वक्त्यांनी **मोलें कीर्तन करूं नये ।** १४-१-५५ आणि कीर्तनांत **स्त्रीयांदिकांचें कौतुक । वर्णूं नयें कीं ।।** १४-५-२१ व **विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकांकडे च पाहाती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा** १७-१०-२६ असे श्रोते नसावेत.

**क्रियेवीण नानापरी बोलिजेतें ।**
**परी चीत दुश्चीत तें लाजवीतें[1] ।**
**मना कल्पना धीट सैराट धावे ।**
**तया मानवा देव कैसेनि पावे[2] ।।१०४।।**

१. बोलण्याप्रमाणे स्वत: वर्तन न करितां जो नुसता मनाला उपदेश मात्र करितो, त्याचें मन त्याला खात असतें. **क्रियेवीण शब्दज्ञान । तें चि स्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ।।**

२. हे मना, स्वत: आपली क्रिया कशी होत आहे हे न पाहतां, कल्पनेला नुसत्या भराऱ्या मारूं दिल्यानें देव कोणाला भेटला आहे काय ? आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें क्रिया घडली पाहिजे, ह्मणून समर्थ ह्मणतात :-



**विवेकें क्रिया आपुली पालटावी[1] ।**
**अती आदरें शुध[2] क्रिया धरावी ।**
**जनीं बोलण्यासारिखें चाल बापा ।**
**मना कल्पना सोडि संसारतापा[3] ।।१०५।।**

१. वर्णाश्रमधर्माप्रमाणें आपली क्रिया होत नसेल तर वर्णाश्रमधर्माचा विचार करून आपण धर्मबाह्य क्रियेचा त्याग करून शुध्द क्रियेचा मनोभावानें अवलंब केला पाहिजे.

२. शुध्द क्रिया ह्मणजे वर्णाश्रमधर्मयुक्त अशी क्रिया. ज्या क्रियेंत बोलण्याचा आणि चालण्याचा मेळ असतो ती शुध्द क्रिया होय, असें कोणी ह्मणतात. हा हि अर्थ वावगा नाहीं, कारण वर्णाश्रमधर्माला सोडून कोणी बोलूं च शकत नाहीं किंबहुना हा च अर्थ येथे अभिप्रेत दिसतो. कारण पुढें तिसऱ्या चरणांत, 'जसें बोलतोस तसें चाल, असें श्रीसद्गुरु सांगत आहेत. अर्थात् बोलण्याप्रमाणें जी क्रिया ती च दुसऱ्या चरणांतील शुध्द क्रिया होय. **बोला ऐसें वर्तो जाणे । उत्तम क्रिया ।।१९-४-८**

३. हे मना, कल्पनोत्पन्न संसारताप सोड. संसार ही मुळीं कल्पना आहे, तेव्हां त्या संसारापासून सुख दु:ख होतें ही हि नुसती कल्पना च होय. हे मना, तुला जर बोलण्याप्रमाणें चालावयाचें असेल तर संसारापासून सुख दु:ख होतें अशी जी तूं कल्पना करीत असतोस ती सोडली पाहिजेस, नाहीं पेक्षां, संसार मिथ्या आहे, असें जें तू प्रतिपादन करीत असतोस, त्याला कांही अर्थ राहणार नाही.

**बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।**
**विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा[1] ।**
**दया[2] सर्व भूतीं जया मानवाला ।**
**सदा प्रेमळु भक्तिभावें निवाला ।।१०६।।**

१. स्नानसंध्यादि कर्मे एकनिष्ठपणें करून स्थानभ्रष्ट अशा मनाला विवेकें आवरी. मनाचे वास्तविक स्थान निर्विषय आहे, तेथून ढळून मन विषयासक्त झालें आहे, त्याला विषयांपासून आवर.

२. **सर्वां भूतांचे हृदय । नाम त्याचें रामराय ।।** असा प्रत्यय आला, तर च भूतमात्राचे ठिकाणीं दया उत्पन्न होऊन मनाला शांति मिळणार आहे.

**मना कोप आरोपणा ते नसावी[१] ।**
**मना बुधि हे साधुसंगीं वसावी[२] ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं[३] ।**
**मना होई रे मोक्षभागीं विभागी ।।१०७।।**

१. हे मना कोपाची आरोपणा (धारणा) नसावी, ह्मणजे कोपाला उद्भवूं देऊं नकोस.

२. संतापाचा उद्भव न होण्याला एक उपाय आहे. हे मना, सत्संगतीपासून बुद्धीला ढळूं देऊं नकोस. कारण, **दुर्जनसंगती सज्जन ढांसळे । क्रोध हा प्रबळे अकस्मात ।।**

३. ज्या संगतीपासून साधक कृतनिश्चयापासून ढळतो तो संग दुष्ट होय. असा नष्ट, चांडाळ संग सोडून, हे मना, संतसज्जनांचा संग धर; ह्मणजे तेणेंकरून तूं मोक्षाचा वाटेकरी होशील. **दुर्जनाचा संग होये मना भंग । सज्जनाचा योग सुखकारी ।। सुखकारी संग संतसज्जनाचा । संताप मनाचा दुरी ठाके ।। स्फु. ओ. १३७ चांडाळसंगती होईज चांडाळ । होये पुण्यसीळ साधुसंगे ।। स्फु. ओ. ५४**

**सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें ।**
**क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागें[१] ।**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारी[२] ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी[३] ।।१०८।।**



१. सत्संगाचा महिमा असा आहे कीं, त्यायोगें मनुष्याची अशुद्ध क्रिया पालटून त्याच्या ठिकाणीं भक्ति, भाव हीं उत्पन्न होतात.

२. हे मना, कृतीवांचून नुसती बडबड करणें सोडून दे. **वर्तल्यावीण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।**

३. ज्या भाषणानें वाद मिटतो त्याला संवाद ह्मणावें व तो च हितप्रद होय, बाकीचा वितंड वाद.

**जनीं वाद वेवाद[१] सोडूनि द्यावा ।**
**जनीं सूखसंवाद[२] सूखें करावा ।**
**जगीं तो चि तो शोकसंतापहारी[३] ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१०९।।**

१. वादवेवाद ह्मणजे आग्रहाचा, अभिमानाचा, वितंड वाद होय, तो सांडावा.

२. सुखसंवाद ह्मणजे प्रेमाचा, निरहंकाराचा वाद होय, तो खुशाल करावा; कारण.

३. असल्या च सुखसंवादानें जगांतील शोक आणि संताप ही नाहींशी होऊन आनंद आणि शांती यांचे साम्राज्य सुरू होते. वितंड वादाला कारण अभिमान; प्रेमावांचून संवाद नाही. भिन्न भिन्न मतें असली तरी परस्परांचा द्वेष न करावा, प्रेम धरावें, प्रेमानें बोलावें, प्रेमानें ऐकावें. असा प्रेमसंवाद तो च हितकारी होय. **नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती वेवाद । परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ।।**

**तुटे वाद संवाद[१] त्यातें म्हणावें ।**
**विवेकें अहंभाव[२] यातें जिणावें ।**
**अहंतागुणें वाद नाना विकारी[३] ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११०।।**

१. संवाद ह्मणजे खरा वाद. ज्यापासून वादाचा उलगडा होतो तो च खरा वाद, त्याला च संवाद ह्मणावें.
२. उभयपक्षीं पक्षाभिमान आहे तोंवर असला संवाद होणें शक्य नाही; यासाठी भल्यांनी विचार करून अहंकाराला जिंकले पाहिजे. ज्याच्या अंतरीचा अभिमान गळाला नाहीं त्यानें वाद करण्याच्या भरीस पडूं नये, कारण.
३. अभिमानाला पेटून केलेला वाद क्रोध, मद, मत्सर इत्यादि अनेक विकार उत्पन्न करितो. तात्पर्य, मनुष्याच्या अंतगरणांत अहंकारानें जें ठाणें दिलेलें असतें, तें तेथून उठवून त्या ठिकाणीं प्रेमाची स्थापना केल्यावांचून हितकारी वाद होणें शक्य नव्हे. (पुढील १६० वा श्लोक पहा.)

**हिताकारणें[१] बोलणें सत्य आहे ।**
**हिताकारणें सर्व शोधूनि[२] पाहें ।**
**हिताकारणें बंड पाषांड[३] वारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१११।।**

१. हिताकारणें ह्मणजे हित व्हावें ह्मणून, हे मना, तुझें हित व्हावें ह्मणून या खऱ्या गोष्टी तुला सांगाव्या लागत आहेत; त्या तुला अप्रिय वाटल्या तरी त्या तुझ्या हिताच्या आहेत, ह्मणून तूं त्या ऐकल्या पाहिजेस, असा भावार्थ.
२. हे मना, तुझें हित व्हावें अशी इच्छा असल्यास मी ह्मणतों ते खरें आहे कीं खोटें आहे याचा विचार करून पहा; केवळ मी सांगतो ह्मणून तूं माझ्या गोष्टी ऐकाव्या असा माझा आग्रह नाहीं.
३. पण, विचारांनी माझें ह्मणणें तुला पटलें तर धर्मशास्त्रानिषिद्ध अशी तू केव्हां केव्हां बडबड करीत असतोस ती त्वां सोडून दिली पाहिजेस. त्यांत च तुझें हित आहे. ह्या गोष्टी आह्मी ह्मणजे कांही पहिल्यांदा च सांगतों आहोंत व तूं प्रथम च ऐकत आहेत असें नाही; तर



**जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला ।**
**परी वाद वेवाद तैसा चि ठेला[१] ।**
**उठे संशयो वाद हा दंभधारी[२] ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११२।।**

१. जगाच्या आरंभापासून तों आतांपर्यंत सांगणारे पुष्कळ व ऐकणारे त्याहून पुष्कळ होऊन गेले; परंतु वितंडवाद ह्मणून ज्याला ह्मणतात तो जशाचा तसा शिल्लक आहे.
२. ज्या वादापासून परस्परांची मनें निर्मळ होण्याऐवजीं संशयग्रस्त होतात तो वाद दांभिक होय. असें कां व्हावें ? पुष्कळांनी पुष्कळ चांगल्या गोष्टी आजवर सांगितल्या असून व पुष्कळांनी त्या वाचल्या किंवा ऐकल्या असून हि या जगांत वितंडपणाला अजून थारा कां मिळाला ? याचें उत्तर श्रीसमर्थ पुढच्या श्लोकांत देतात.

**जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।**
**अहंतागुणें ब्रह्मराक्षेस जाले[१] ।**
**तयांहूनि[२] वित्पन्न तो कोण आहे ।**
**मना सर्व जाणीव[३] सांडूनि राहे ।।११३।।**

१. असला हिताचा बोध पुष्कळांनी केला आहे खरा, पण त्याप्रमाणें वर्तन करितो कोण ? जो तो आपल्या विद्वतेंत, मोठेपणांत चूर ! याचा परिणाम काय झाला ? विद्याभ्यासानें ज्यांचा अभिमान झडला नाहीं ते ब्रह्मराक्षस मात्र होऊन बसले. (वामनपंडितांची गोष्ट या ठिकाणीं वाचकांस आठवेल च.)
२. परंतु आपण आपल्या विद्वतेचा किंवा मोठेपणाचा किंवा सामर्थ्याचा गर्व तो काय वाहावा ? तयाहूनि ह्मणजे ईश्वरापेक्षां जास्त विद्वान्, मोठा किंवा समर्थ कोण आहे ?

३. सारांश, हे मना, मी मोठा व माझें तेवढें च खरें, हा अभिमान सोडून देऊन रहा. पण श्रीसमर्थ ह्मणतात :-

**फुकाचें[१] मुखीं बोलतां काय वेचे ।**
**दिसेंदीस अभ्यांतरी गर्व सांचे[२] ।**
**क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे[३] ।**
**विचारें तुझा तूं चि शोधून पाहें[४] ।।११४।।**

१. तत्वज्ञानाच्या या गोष्टी नुसत्या बोलण्यांत काय कोणाचें खर्च होतें. **मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।** हें चरण अगदीं पाठ झालें व उठतां बसतां तें सारखे पुटपुटलें तरी काय ? अंतरी पहावें तो.
२. दिवसानुदिवस याचा मोठेपणाचा गर्व बळावत च चालला असतो.
३. तात्पर्य, नुसतें बोलणे व्यर्थ आहे, बोलण्याप्रमाणें क्रिया पाहिजे.
४. हे मना, मी हें ह्मणतों तें खरें कां खोटें याचा तूं च आपल्याशीं विचार करून पहा; ह्मणजे तुला आढळून येईल की तूं लोकांना ज्या ज्ञानाच्या गोष्टी सांगत असतोस त्याप्रमाणें तुझें स्वत:चे च वर्तन नसतें. तात्पर्य

**तुटे वाद संवाद तेथें करावा ।**
**विवेकें अहंभाव हा पालटावा[१] ।**
**जनीं बोलण्यासारखे आचरावें ।**
**क्रियापालटें[२] भक्तिपंथें चि जावें ।।११५।।**

१. विचारानें आपण तर अभिमान सोडावा च,पण दुसऱ्या कोणाबरोबर वाद करण्यापूर्वी त्याच्या ठिकाणीं अहंकाराची बाधा कितपत आहे हें हि पहावें. अहंकार असेल त वाद करूं नये, कारण कोणता हि पक्ष अभिमानाला पेटला ह्मणजे वादाचा शेवट लागत नाहीं. जेथें वाद मिटेल तेथें तो करावा.
२. आपण आपली क्रिया हळुहळु पालटून भक्तिमार्गाला लागावें. आपण जी आडवाट धरली आहे, ती सोडून भक्तिमार्गाने जावें.



**बहू श्रापितां कष्टला अंबऋषी[१] ।**
**तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी ।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी[२] ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११६।।**

१. अंबरीषानें ईश्वराची आराधना करण्याकरितां साधनद्वादशीचें व्रत एक वर्ष केलेलें होतें. व्रतसमाप्तीचे वेळी तो पारणें करणार, इतक्यांत दुर्वासमुनि त्याजकडें आले. राजानें मुनींना भोजनास ठेवून घेतलें. मुनि माध्यान्हिक कृत्य करण्याकरितां नदीवर गेले; त्यांना परत येण्यास उशीर झाला व इकडे द्वादशी तर केवळ एक घटका उरली. द्वादशी असतांना पारणें केलें नाहीं तर व्रतभंग होतो व मुनींच्या आधीं तर भोजन करतां येत नाहीं, तेंव्हा आतां काय करावें, असें राजाला मोठें संकट पडलें, तेंव्हां ब्राह्मणांच्या अनुमतीनें राजानें उदक प्राशन करून पारणें केलें. कांही वेळानें मुनि परत आले. राजानें उदक प्राशन केल्याचें त्यांनी जाणलें. मुनींना राग येऊन त्यांनी राजावर कृत्या सोडली. राजा डगमगला नाहीं. भक्तकैवारी भगवंतानें संकट निवारण्याची योजना आधीं च करून ठेविली होती. भगवंताच्या सुदर्शनचक्रानें ती कृत्या जाळून तें मुनींच्या मागें लागलें. ब्रह्मदेव व महादेव यांना मुनि शरण गेले, पण त्यांचा इलाज चालेना. अखेरीस मुनि भगवंतास शरण गेले. भगवान् ह्मणाले मुने, या कामीं आपण हि स्वतंत्र नसून भक्ताधीन आहोंत, तरी आपण अंबरीषाला च शरण जावें, तो च तुमची सुटका करील. त्याप्रमाणें मुनींनी केलें व चक्र शांत झालें; इत्यादि कथाभाग श्रीमत् भागवतांत आहे; परंतु अंबरीषासाठी भगवंतांनी जन्म घेतल्याची जी आख्यायिका आहे, तिला मात्र भागवतांत आधार नाहीं, असें वाटतें.
२. उपमन्यु बाळाला त्याची आई दुधाऐवजी पाण्यांत पीठ कालवून देत असे. एकदां शेजारच्या आश्रमांत त्याला खरोखरीचें दूध प्यावयास मिळालें. तेव्हां तें त्याला फारच गोड लागले. आपल्या आश्रमीं आल्यावर आईपाशी

तों तसें दूध मागूं लागला. आईनें नित्याप्रमाणें उदकांत पीठ कालवून दिलें. 'हे नको तसें दे, असा उपमन्यूने हट्ट धरिला. आईला वाईट वाटलें. बाळा, तसें दूध आपणां गरिबास कोठून मिळाणार ? असें ती ह्मणाली, पण गरिबी आणि श्रीमंती त्या बाळाला काय होय ? त्यानें हट्ट सोडला नाहीं. तेव्हां आईनें सांगितलें, देवाजवळ माग ! त्याला काय ? तो देवापाशी हट्ट धरून बसला. देवाला करुणा येऊन त्यानें त्यास क्षीरसागर च दिला. (या हि कथेला भारतभागवताचा आधार नाहीं, असें वाटतें.)

**धुरु[१] लेकरूं बापुडें दैन्यवाणें ।**
**कृपा भाकितां दीधली भेटि जेणें ।**
**चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी[२] ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११७।।**

१. पांच वर्षांचे अनाथ ध्रुव बाळ तें काय बापानें झिडकारल्यामुळें व सापत्न मातु:श्रीचें कठोर वचन न साहून, आईच्या उपदेशाप्रमाणें अरण्यांत जाऊन घोर तपश्चर्या करून ईश्वरप्राप्ति तें काय करून घेतें ! अनन्य भक्ता ची देव कधीं उपेक्षा करीत नाहीं, हें च खरें ! भागवतांतील हा कथाभाग ह्मणजे चतुर्थ स्कंध, अध्याय ८ ते १२, प्रत्येक बालानें वारंवार वाचावा, इतका तो प्रेमळ व कल्याणकारी आहे.

२. भगवत्प्रेमाची खाणी जो ध्रुव तो तारांगणीं चिरंजीव झाला म्हणजे त्यानें अढळपद मिळविलें.

**गजेंद्र[१] महां संकटीं वास[२] पाहे ।**
**तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।**
**उडी घातली जाहला जीवदानी[३] ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११८।।**



१. मदानें धुंद झालेला गजेंद्र आपल्या स्त्रियांसह सरोवरांत क्रीडा करीत असतां नक्राने पाय धरून त्यास आंत कसें ओढून नेलें, त्या संकटांतून सुटण्याचे त्या गजराजाचे व त्याच्या स्त्रिया, बालक,आप्तेष्ट इत्यादिकांचे सारे प्रयत्न कसे थकले, अखेरीस श्रीहरीस त्यानें आळविल्यावर भगवान् गरुडावर आरूढ होऊन तेथें कसे आले व नक्रासह गजेंद्राला बाहेर काढून त्या नक्राचे मुख विदारण करून भगवंतांनी गजेंद्राला संकटांतून कसें मुक्त केलें इत्यादि श्रीमद्भागवतांतील बोधप्रद कथाभाग (अष्टम स्कंध अध्याय २ ते ४) आबालवृद्धांस श्रुत च आहे. **देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी । धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ।।**

२. वाट.

३. प्राणदान करणारा.

**अजामेळ[१] पापी तया अंत आला ।**
**कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।**
**अनाथासि[२] आधार हा चक्रपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११९।।**

१. नामस्मरणाची थोरवी गातांना मागील ९५ व्या श्लोकांत अजामिलाचा उल्लेख आला च आहे, तो पहावा.

२. **देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसि तारी ।। देव होय साहाकारी । अनाथांचा ।। ४-८-२६**

**विधीकारणें[१] जाहला मछ वेगीं ।**
**धरी कूर्मरूपें धरा[२] पुष्टिभागीं[३] ।**
**जना रक्षणाकारणें नीच[४] योनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२०।।**

१. विधीकारणें ह्मणजे ब्रह्मदेवाकरितां. प्रलयकाली ब्रह्मदेव निद्रा घेऊं लागले असतां हयग्रीव दैत्यानें त्यांच्या मुखांतून वेद हरण करून समुद्रांत नेलें; त्या वेळीं भगवंताने मत्स्यरूप धारण करून त्या दैत्यास मारून ब्रह्मदेवाला वेद परत आणून दिले.
२. पृथ्वी.
३. पाठीवर. समुद्रमंथानाचे वेळी मंदर पर्वत जेव्हां बुडूं लागला तेव्हा देवांच्या करितां भगवंताने कांसवाचें रूप धरिलें व बुडत चाललेला पर्वत आपल्या पाठीवर घेऊन वर काढिला.
४. नीच योनी = वराहावतार. भूदेवीला दैत्यांनी समुद्रांत ओढून नेले असतां तिला वर काढण्यासाठी देवानें विराट स्वरूपी वराहाचा अवतार घेतल्याची कथा भागवत, तृतीय स्कंध, अध्याय तेरावा, यांत वाचावयास सांपडते.

**महां भक्त प्रल्हाद[1] हा कष्टवीला ।**
**म्हणोनी तयाकारणें सिंह्य जाला ।**
**न ये ज्वाळ वीषाळ संन्नीध कोण्ही[2] ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२१।।**

१. मागील श्लोक ९६ त प्रल्हादाची कथा आली च आहे.
२. ज्वाळा म्हणजे अग्निः वीषाळ म्हणजे शंकर, असा अर्थ कोणी लावतात. हिरण्यकशिपूच्या वधाचे वेळी नृसिंहाचें रूप इतके उग्र व भयंकर होतें की, कोणी हि त्याचे जवळ जाऊ शकले नाहीत. ब्रह्मदेव, शंकर वगैरेंनी त्याची स्तुति केली तरी कोणी हि त्याच्यापुढें जाण्यास धजेना. प्रत्यक्ष लक्ष्मीला हि पुढें जाण्याचे धैर्य होईना. तेव्हां ब्रह्मदेवानें प्रल्हादास पुढें केले प्रल्हादाने साष्टांग नमस्कार करून भगवंताची स्तुति केली वगैरे कथा सुप्रसिध्द च आहे.



**कृपा भाकितां जाहला वज्रपाणी[1] ।**
**तयाकारणें वामनु[2] चक्रपाणी ।**
**द्विजांकारणें भार्गव[3] च्यापपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२२।।**

१. इंद्र.
२. भगवंताने वामनरुप धारण करून विरोचनपुत्र दैत्यराज बली याजपाशी त्रिपाद भूमीची याचना करून त्याचा गर्व परिहार केला व पुन्हां इंद्र दि देवांना त्यांचे गतवैभव मिळवून दिले. इत्यादि कथाभाग, भागवतांत ८–१५ ते २३ त असलेला, कोणाला हि बोधप्रदच आहे.
३. परशुराम. क्षत्रियांनी ब्राह्मणांचा छळ केलेला पाहून भक्तकैवारी भगवंताने परशुरामाचा अवतार घेऊन एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली, (भागवत, नवम स्कंध, अध्याय १५ व १६)

**अहिले[1] सतीलागि आरण्यपंथें ।**
**कुढावा[2] पुढें देव बंदीं तयातें ।**
**बळें सोडितां घाव घाली निशाणी[3] ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी[4] ।।१२३।।**

१. मागील श्लोक ३२ पहा.
२. कुडावा, रक्षण. मागे श्लोक ३१ पहा.
३. निशाण=नगारा. अरण्यांत जातांना अहल्येचा उध्दार केल्यावर बंधनांत पडलेल्या देवांना स्वपराक्रमानें बंधमुक्त करण्यासाठीं नगारा झडतो.
४. इतर अवतारांचे वर्णन करितांना शेवटल्या चरणांत 'देव भक्ताभिमानी' असे ह्मटले आहे; परंतु य श्लोकांत ''राम दासाभिमानी'' अशी योजना, मागचा व पुढचा क्रम सोडून, केलेली वाचकांच्या तेव्हां च ध्यानांत येते.

**तये द्रुपदीकारणें लागवेगें ।**
**त्वरें धांवतु सर्व सांडूनि मागें[१] ।**
**कळीलागि[२] जाला असे बोध्य मौनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२४।।**

१. **कृष्ण कृष्ण महायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन । प्रपन्नां पाहि गोविन्द कुरुमध्येवसीदतीम् ।।** इत्यादि रीतीनें वस्त्रहरणाचे वेळीं व कोपिष्ठ दुर्वासमुनि अतिथीच्या रुपानें शिष्यांसह आले असतां **दु:शासनादहं पूर्वं सभायां मोचिता यथा । तथैव संकटादस्मान्मामुद्धर्तुमिहार्हसि ।।** इत्यादि रीतने द्रौपदीनें धांवा करितां च भक्तवत्सल जगन्नायक श्रीकृष्ण जवळ असलेल्या रुक्मिणीला हि सोडून त्वरेनें धांवत आल्याचे प्रसंग आबालवृद्धांस विदित च आहेत.
२. कलियुगामध्ये होणाऱ्या पापांचे भोक्तृत्व मनुष्यप्राण्याकडून प्रारब्धकर्मानुसार अल्पावधीत भोगविण्याकरितां परमेश्वराने बुद्धरुपानें मौनव्रत धारण केले आहे.

**अनाथां दिनाकारणें जन्मताहे[१] ।**
**कलंकी[२] पुढें देव होणार आहे ।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२५।।**

१. अनाथांचा उद्धार करण्यासाठी ह्या जगांत देव जन्मताहे ह्मणजे वारंवार अवतीर्ण होतो.
२. तो जगन्नियंता परमेश्वर, शंभल ग्रामांत विष्णुयशा नामक पवित्र ब्राह्मणाच्या घरी कलिकरुपानें प्रगट होणार आहे, कशी कथा भागवांत दिलेली आहे.



**जनाकारणें देव लीळावतारी ।**
**बहूतां परी आदरें वेषधारी[१] ।**
**तया नेणती ते जन पापरूपी[२] ।**
**दुरात्मे[३] महां नष्ट चांडाळ पापी ।।१२६।।**

१. अनंत वेष धारण करुन, भगवंत लोकांकरितां वारंवार सहज लीलेनें प्रगट होत असतात.
२. **कळेना जया देव तो पापरुपी ।।**
३. **सकळांवडील अंतरात्मा । त्यासिं नेणे तो दुरात्मा । दुरात्मा ह्मणिजे दुरी आत्मा । अंतरला तया ।।१५-९-१८**

**जगीं धन्य तो रामसूखें[१] निवाला ।**
**कथा[२] ऐकतां सर्व तल्लीन जाला ।**
**देहेभावना रामबोधें[३] उडाली ।**
**मनोवासना रामरूपीं[४] बुडाली ।।१२७।।**

१. रामसुख = श्रीरामाचें ध्यान करण्यापासून होणारें सुख. **रामरुपी द्रुष्टी जाऊनी बैसली । सुखें सुखावली न्याहाळीतां ।**
२. श्रीरामाचे गुणानुवाद श्रवण करीत असतां जो राममय झाला, ज्याला **कथानिरुपणें समाधी लागली ।** तो धन्य होय.
३. रामबोध ह्मणजे सर्वत्र राम आहे हा बोध. असा बोध होऊन ज्याची देहबुद्धि नष्ट झाली तो धन्य होय. **रामरुप देहो जाला निसंदेहो । माझे मनीं राहो निरंतर ।।**
४. श्रीरामस्वरुपाचे ठिकाणी ज्याच्या सर्व वासनांचा लय झाला, श्रीरामावांचून ज्याला दुसरी कशाची इच्छा उरली नाही तो धन्य होय.

**मना वासना वासुदेवीं वसों दे ।**
**मना कामना कामसंगी नसों दे ।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे ।**
**मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ।।१२८।।**

हे मना, श्रीरामावांचून अन्य इच्छा करुं नकोस, कामादि विकारांचे ठिकाणी आसक्त होऊ नकोस,(विषया-विषयी) व्यर्थ कल्पना करुं नकोस, तर हे साधु मना, सत्पुरुषांच्या ठिकाणी अखंड रत होऊन रहा.

**गतीकारणें संगती सज्जनाची ।**
**मती पालटे सूमती दुर्जनाची ।**
**रतीनायकेचा पती नष्ट आहे ।**
**म्हणोनी मनातीत होऊनि राहे ।।१२९।।**

सत्पुरुषांचा महिमा असा आहे की, त्यांच्या संगतीने सद्गति प्राप्त होते, ह्मणून सद्गति प्राप्त होण्यासाठी सत्संगती धरावी. सत्संगाच्या योगानें दुर्जनांची देखील मति पालटून ते सज्जन होतात. रती जी नायका, तिचा पति जो मदन, तो फार चांडाळ आहे, त्याचा स्पर्श हि होऊ नये, अशी इच्छा असल्यास, हे मना, तूं निर्विकार होऊन रहा. सत्संगतीवांचून निर्विकल्प स्थिति प्राप्त व्हावयाची नाही, ह्मणून या हि कारणासाठी सत्संग धर, असा भावार्थ.

**मना अल्प संकल्प तो ही नसावा ।**
**सदा सत्य संकल्प चित्तीं वसावा ।**
**जनीं जल्प वीकल्प तो ही तजावा[१] ।**
**रमाकांत येकांतकाळीं भजावा[२] ।।१३०।।**

१. **सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प ।**
**ऐसिया द्वैताचा जल्प । मन चि करी ।।**



पैकीं ब्रह्माचा संकल्प करावा व मायेचा विकल्प त्यागावा असें दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत सांगितलें आहे खरे, परंतु खरोखर मनांत अल्पमात्र संकल्प नसावा असें पहिल्या चरणांत सांगितलें आहे. सत्य ब्रह्माचा संकल्प करणारें मन वृत्तिरहित झालें पाहिजे.
**वृत्तिरहित जें ज्ञान । तें चि पूर्ण समाधान ।**
**जेतें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ।।**

२. असे ज्ञान होण्याला एकांतांत श्रीरामाचें भजन, पूजन इत्यादि करावे. ध्यानधारणेस एकांताचे महत्व फार आहे. एकांतांत संकोचवृत्ति किंवा दांभिकपणा यांचा संबंध नसतो व चित्त सर्वस्वी श्रीरामचरणी जडावयास सोईचे पडते.
**शिष्या येकांती बैसावें । स्वरुपीं विश्रांतीस जावें । तेणें गुणें दृढावे। परमार्थ हा ।।५-६-५८**

**भजाया जनीं पाहतां राम येकु[१] ।**
**करी बाण येकु मुखीं शब्द येकु ।**
**क्रिया पाहतां उधरे सर्व लोकु ।**
**धरा जानकीनायकाचा विवेकु[२] ।।१३१।।**

१. **चळेना समरंगणीं ठाण मागें । चळेना मुखें बोलतां वाक्य युगें । चळेना कृपासिंधु कल्पांत काळीं । रघूराज हा आदरें दास पाळी ।। चमत्कारलें चित्त हे रामगुणीं । उठे कीर्ति वाखाणितां प्रेम दुणी । रघूनायकासारिखा देव नाहीं । क्रिया पाहतां चोखडी सर्व कांही । कीर्ति या रघुनाथाची पाहातां तुळणा नसे । येकबाणी येकवचनी । येकपत्नी च धार्मिकु ।। मा. पं. १-६ ।। सौन्दर्यैर्वा गुणैर्वा रघुपतिसदृशो नास्ति देवो व्दितीयः ।।सुभाषित.**

२. यासाठीं राघवाचा जो ज्ञानपंथ आहे तो स्वीकारावा.

**विचारूनि बोले विवंचूनि चाले[१] ।**
**तयाचेनि संतप्त[२] ते ही निवाले ।**
**बरें शोधिल्यावीण[३] बोलों नको हो ।**
**जनीं चालणें शुध[४] नेमस्त राहो ।।१३२।।**

१. जें बोलावयाचें व करावयाचें तें जो विचार करुन बोलतो व करतो.
२. त्रिविध तापानें पोळलेले.
३. पूर्ण विचार केल्यावांचून.
४. बोलण्याप्रमाणे चालणे ते शुध्द चालणे होय. श्लोक १०५ पहा. **मुख्य येत्न विचाराचा। त्यावरी बोलणें बरें । चालणें सत्य नेमाचें । नीति न्याय चुकों नये।।**

**हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी[१] ।**
**जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासी[२] ।**
**तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे ।**
**तया भाषणें नष्ट संदेह मोडे[३] ।।१३३।।**

१. जो हरिभक्त ह्मणजे हरिदास आहे तो बहुधा विरक्त नसावयाचा व जो ज्ञाता आहे तो बहुधा भक्त नसावयाचा; (१४-५-४) तेव्हां जो भक्ति, ज्ञान आणि वैराग्य या तिन्ही गुणांनी संपन्न आहे व ज्याची निश्चयात्मक आत्मबुद्धि झाली आहे, अशा पुरुषाच्या दर्शनस्पर्शनान पुण्य लागतें व अशाच्या भाषणानें आपल्या ठिकाणचा संशय मावळून आपणांस हि निश्चयात्मक ज्ञान होते.
२. निश्चयाचें लक्षण कोणते, तें समजण्यासाठी दासबोध ५-१० पहा. **आत्मबुद्धि निश्चयाची । ते चि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हें कधी चि । विसरों नये ।।**
३. कोऽहं हा संदेह; तो नाहींसा होऊन सोऽहं असें निश्चयात्मक ज्ञान होते.



**नसे गर्व आंगीं सदा वीतरागी[१] ।**
**क्षमा शांति भोगी[२] दया दक्ष[३] योगी[४] ।**
**नसे लोभ ना क्षोभ[५] ना दैन्यवाणा ।**
**यहीं[६] लक्षणीं जाणिजे योगिराणा ।।१३४।।**

१. वीत (वि+इत) = गेले, राग=विषयांवरील प्रेम. विषयांवरील ज्याचें प्रेम गेलें आहे; विरक्त.
२. क्षमा आणि शांति ही ज्याच्या ठिकाणी आहेत.
३. जो भूतदयेविषयी दक्ष असतो.
४. योगी ह्मणजे जो अष्टांग योग जाणतो तो किंवा श्रीरामचरणी ज्याचें अखंड चित्त जडलें आहे तो. **अखंड योग ह्मणोनि योगी ।।** १७-१-२३
५. लोभापासून क्षोभ व्हावयाचा; तो लोभ च नाहीं, तेव्हां, अर्थात् क्षोभ हि नाही व दैन्य हि नाहीं.
६. ह्या लक्षणांनी युक्त तो योगिराणा जाणावा.

**धरीं रे मना संगती सज्जनाची ।**
**जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची[१] ।**
**बळें भाव सद्बुधि सन्मार्ग लागे ।**
**महां क्रूर तो काळ[२] विक्राळ भंगे ।।१३५।।**

१. मागील श्लोक १२९ पहा. २ यम.

**भये व्यापिलें सर्व ब्रह्मांड[१] आहे ।**
**भयातीत तें संत[२] आनंत पाहें ।**
**जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना ।**
**भय मानसीं सर्वथा ही असेना ।।१३६।।**

१. एकंदर ब्रह्मांडाकडे पाहतां असे दिसून येते की, जीवाजीवांत विरोध

लागलेला आहे, आणि त्यामुळें सर्व जीव भीतीनें व्याप्त दिसतात.

२. संत ह्मणजे ब्रह्म, असा कोणी अर्थ घेऊन हा श्लोक लावतात. ''अनंत'' हि ब्रह्माचें च विशेषण. भयानें व्याप्त सारें ब्रह्मांड आहे, फक्त शाश्वत असें जें ब्रह्म तें मात्र भयातीत आहे. ''भयं द्वितीयाभिनिवेशत: स्यात् ।'' भय असतें द्वैतापासून आणि ब्रह्म आहे ''एकमेवाद्वितीयम.'' ब्रह्माचे ठिकाणी द्वैत च नाही, तेव्हां साहजिक च भय हि नाहीं. दुसरे कित्येक संत ह्मणजे साधु असा अर्थ घेतात; तो हि युक्त च आहे, कारण साधु आणि ब्रह्म एकस्वरुप च असतात व त्यांच्या ठिकाणी हि द्वैत नसतें व भय हि सर्वथा नसतें. **साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल भये । परब्रह्म तें निर्भये। तो चि साधु ।।** ८-९-३९ **याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत। सकळास मांडेल अंत । साधु अनंतरुपी ।।**४०

**जिवां श्रेष्ठ[१] ते पष्ट सांगोनि गेले ।**
**परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।**
**देहेबुधिचें[२] कर्म खोटें टळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३७।।**

१. श्रीज्ञानेश्वर, मुकुंदराज यांचे पासून तो श्रीरामीरामदास उर्फ श्रेष्ठ यांच्यापर्यंत सर्वांनी या अज्ञानी जीवास स्पष्ट उपदेश केला आहे. परंतु त्याचे अज्ञान कांही केल्या जात नाही, तें जसेंच्या तसेंच आजमित्तीला शिल्लक आहे.

२. याचें कारण, याने देहबुद्धि घट्ट उराशी धरलीआहे. देहबुद्धिचें जें खोटें कर्म ह्मणजे जीवाला मोहांत पाडणें हा जो तिचा दुष्परिणाम तो कांही केल्या टळत नाही,आणि त्यामुळें आपल्या पूर्वजांनी ग्रन्थादि व्दारां स्वरुपविज्ञानरूपी जी ठेव आपल्यासाठी ठेविलीआहे. तिचें आकलन होत नाही **अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा । तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ।।**





**भ्रमें नाडळे वीत ते गुप्त जालें[१] ।**
**जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें[२] ।**
**देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना[३] ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३८।।**

१. आपल्या पूर्वजांनी ठेवलेली ब्रह्मज्ञानाची गुप्त ठेव, जीव केवळ भ्रमांत पडल्यामुळें,त्यास सांपडत नाही, तें आत्माख्य धन याला दिसत नाहीं.

२. आणि त्यामुळें मोक्षश्रियाविराजित थोर पूर्वजांच्या पोटी जन्मास येऊन हि या अज्ञानी जीवाच्या मागचें जन्मरुपी दारिद्र्य सुटन नाही. **पुनरपि जननं पुनरपि मरणं ।** याच्या पुढें दत्त ह्मणून आहे च.

३. देह तो च मी, असा जो याने आपल्या मनाचा ग्रह करुन घेतला आहे तो जोंवर नाहीसा होत नाही तोंवर स्वरुपसाक्षात्कार होणें नाही. **देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा । देहाभिमानें येरझारा । भोगिल्या च भोगी ।।** ५

**पुढें पाहतां सर्व ही कोंदलेसे[१] ।**
**अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे[२] ।**
**अभावें कदा पुण्य गांठीं पडेना[३] ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३९।।**

१. तें धन ह्मणजे कोठें पुरुन ठेवलेलें आहे आणि त्यामुळें यास सांपडत नाही, असें नाही, तर तें सर्वत्र संचलेलें आहे. **जिकडे तिकडे जेथें तेथें। विन्मुख होतां सन्मुख होतें । सन्मुखपण चुकेना तें । कांही केल्या।** मग तें सांपडत कां नाही.

२. तर हा जीव अभागी आहे. पूर्वजांच्या शब्दावर याचा विश्वास नाही, सर्वत्र राम भरलेलाआहे, हें यास खरें वाटत नाही, याला श्रीरामाची सगुण मूर्ति ही पाषाण भासते, त्या मूर्तींच्या अंतरीचा राम याला दिसत नाही.

खरोखर असावा परीस आणि अभागी मनुष्याला तो वाटावा पाषाण, तशी याची स्थिति झाली आहे.

३. परंतु अशा अभावें ह्मणजे अश्रद्धेने कधी हि पुण्याची जोड होणार नाही. सारांश, गुरुवेदांत-वाक्यांच्या ठिकाणी विश्वास पाहिजे. कोणी पुण्य ह्मणजे परब्रह्म, असा अर्थ करितात.

**जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं[1] ।**
**गुणें गोविलें जाहलें दुख देहीं[2] ।**
**गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना[3] ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१४० ।।**

१. वास्तविक हें जुनें ठेवणें ज्याचे त्याच्या जवळ असून जो तो भ्रमांत पडला आहे आणि ह्मणून त्याला तों कांही मिळत नाही. ज्याप्रमाणें **मृग मद नाभिसि असतां नेणुनि भ्रमतां भ्रमतां मेलें रे ।।**

२. हा भ्रम किंवा मोह त्रिगुणामुळें झाला आहे व ते त्याच्या दु:खाला कारण झाले आहेत. **सत्वं रजस्तम इति गुणा: प्रकृतिसंभवा: । निबन्धंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ।।**

३. म्हणून निस्त्रैगुण्य वृत्ति झाली पाहिजे, पण ती कांही होत नाही आणि त्यामुळे याचें च वित्त, याच्या जवळ असून हि, तें याला दुर्लभ झालें आहे. **त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।।**

**म्हणे दास सायास[1] त्याचे करावे ।**
**जनीं जाणता[2] पाय त्याचे धरावे ।**
**गुरुअंजनेंवीण[3] तें आकळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ।।१४१ ।।**

१. कष्ट, सेवा.

२. ज्ञाता. दा. १८ ह्न २ पहा. **याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह**



**घ्यावा । सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ।।** ६-१-३१. **तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ।।** भ. गी.

३. **दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन । संगती शोधावा ।।** ६-९-१९. **असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरुवीण मोक्ष पावावा । हें कल्पांती न घडे ।।** ५-१-४४. **सर्व कांही कळे सद्गुरु करितां । दास ह्मणे आतां गुरु करी ।।** स्फु. ओ. १९८-५

**कळेना[1] कळेना कळेना ढळेना[2] ।**
**ढळे नाढळे[3] संशयो ही ढळेना ।**
**गळेना गळेना अहंता गळेना ।**
**बळें[4] आकळेना मिळेना मिळेना ।।१४२ ।।**

१. वस्तूची दुर्लभता दर्शविण्यासाठी प्रस्तुत श्लोकांत शब्दांची द्विस्त्रिरुक्ति आहे. जुनें ठेवणें मीपणें कळेना कळेना कळेना.

२. 'ढळेना' याचा संबंध पुढील चरणाकडे आहे. संशय ढळत नाही.

३. ढळे नाढळे- कांही केल्या ढळत नाही.

४. नुसत्या हट्टानें वस्तुज्ञान होत नाही.

**अविद्यागुणें[1] मानवा ऊमजेना ।**
**भ्रमें चूकलें हीत तें आकळेना ।**
**परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें[2] ।**
**परी सत्य मिथ्या असें कोण जाणे ।।१४३ ।।**

१. अज्ञानानें. **स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या ।**

२. एकाद्याच्या कमरेला असावें खोटें नाणें, परंतु खऱ्याखोट्याची परीक्षा नसल्यामुळें त्यास ते च खरें वाटावे; तद्वत् मायेच्या योगानें मनुष्याला

बद्धदशा ती च आत्मदशा वाटत असते. याला स्वत:ला आपलें हित समजत नाही, इतकेंच नव्हे तर ज्यांनी आत्महित ओळखलें व त्याप्रमाणें जे आचरण करुं लागले, ते च उलट याला भ्रमिष्ट वाटूं लागतात ! बद्धदशेची येथें सीमा झाली !

**जगीं पाहतां साच[1] तें काय आहे ।**
**अती आदरें सत्य शोधूनि पाहें ।**
**पुढें पाहतां पाहतां देव जोडे ।**
**भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ।।१४४।।**

१. सत्य. यासाठीं, हे मना, या जगांत सत्य वस्तु कोणती आहे याचा अत्यंत कळकळीनें विचार करुन पहा, ह्मणजे तूं जो जों विचार करीत जाशील तों तों तुझे भ्रांतीचें पटल उडून जाऊन सत्य स्वरुपाचें तुला ज्ञान होईल. हे सत्य नाही, ते सत्य नाही, सृष्टि सत्य नाही, इंद्रिये सत्य नाहीत; असा असत्याचा निवाडा करतां करतां, अखेरीस जे सत्य परब्रह्म उरलें त्याची तुला ओळख होऊन, भ्रम, भ्रांति व अज्ञान ही सर्व पार नाहीशी होतील. **हे ज्ञानदृष्टीनें पाहावें ! पाहोन तेथें चि राहावें । निजध्यासे तद्रूप व्हावें । संगत्यागें** ।।१९-५-२८

**सदा विषयो चिंतितां जीव जाला ।**
**अहंभाव अज्ञान जन्मासि आला[1] ।**
**विवेकें सदा सस्वरूपीं भरावें[2] ।**
**जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें[3] ।।१४५।।**

१. जीव सदा विषयांचे चिंतन करीत राहिला आणि ह्मणून अहंभाव व अज्ञान यांनी वेष्टित होत्साता, पुनरपि जन्म पावला.
२. मागील १० वा श्लोक पहा. ३. जीव तो सहज च जन्ममरणाच्या फेऱ्यापासून सुटतो. निश्चयाचे महापुरुष या मायानदीत उफराटें पोहत जाऊन



आपल्या उपासनेच्या जोरावर थेट उगम गांठतात. **येक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमास गेले । उगमदर्शनें पवित्र झाले । तीर्थरूप ।।**

**दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी[1] ।**
**अकस्मात आकारलें[2] काळ मोडी ।**
**पुढें[3] सर्व जाईल कांहीं न राहे ।**
**मना संत आनंत[4] शोधूनि पाहें ।।१४६।।**

१. यदृष्टं तन्नष्टं । जे दिसतें ते कल्पकोटी टिकणारें नाही. **दिसे ते नासेल । सर्वत्र जाणती ।।**
२. जेवढें ह्मणून साकार आहे तेवढें सर्व यथाकाल नाहीसें होणारें आहे. **शाश्वतासी येणें जाणें हें न घडे । आकार हा मोडे दास ह्मणे ।।**
३. कल्पांतकाळी. **जनी लोचनीं पाहतां दीसताहे । तया नाश काळांतरी होत आहे । अवीनाश तो कोण आधीं पहावा । खरा देव तो आदरें वोळखावा ।।**
४. **अंत चि नाही तें अनंत । शाश्वत आण सदोदित । असंत नव्हें तें संत । सर्व काळ** ।।१७-२-२

**फुटेना[1] तुटेना चळेना ढळेना ।**
**सदा संचलें[2] मीपणें[3] तें कळेना ।**
**तया एकरूपासि[4] दूजें न साहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४७।।**

१. **नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुत: ।।** पुढें श्लोक १७७ पहा.
२. सर्वत्र भरलें, कोंदाटले.
३. **संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला । अनुभवी तो या बोला । सुखावेल गा** ।।७-२-१९ **आपण ह्मणिजे मीपण । मीपण ह्मणिजे**

**जीवपण । जीवपण ह्मणिजे अज्ञान । संग जडला ।।२०**

४. **एकमेवाद्वितीयं ब्रह्म ।** त्याला द्वैत सहन होत नाही.

**निराकार[१] आधार ब्रह्मादिकांचा ।**
**जया सांगतां सीणली[२] वेदवाचा ।**
**विवेकें तदाकार[३] होऊनि राहें ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४८।।**

१. **निराकार ह्मणिजे आकार नाहीं ।** असे परब्रह्म स्वत: निराधार असून इतरांचा आधार झालें आहे. त्याच्या अधिष्ठानामुळें ही सृष्टि भासत आहे.

२. ज्या परब्रह्माचें वर्णन करितांना वेदांची गति कुंठित होऊन ''नेति नेति'' ह्याव्यतिरिक्त ज्याचें वर्णन होऊं शकलें नाही.

३. तद्रूप च आपण आहोत, पण ह्याचा बोध होत नाही, तो विवेकानें करुन घेतला पाहिजे. **परब्रह्म ह्मणिजे सकळांपरतें । तयासि पाहातां आपण चि तें । हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलियां ।।९-१-२९**

**जगीं पाहतां चर्मचक्षी न लक्षे[१] ।**
**जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे[२] ।**
**जगीं पाहतां पाहणें जात आहे[३] ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४९।।**

१. ते परब्रह्म ह्या आपल्या चर्मचक्षूनें दिसत नाही. **अस्थीचा देहीं मांसाचा डोळा । पाहेन ह्मणे ब्रह्माचा गोळा । तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ।।** ६-८-४६

२. न रक्षे ह्मणजे निरीक्षे. ते ज्ञानचक्षूनें दिसतें. **ज्ञानदृष्टिचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणें ।।** ७ 4/48 असा अर्थ कोणी करितात. संस्कृत रुपांतरकारांनी असा च अर्थ केला आहे. **जगत्यां तु यज्ज्ञानचक्षुर्विलोक्यम् ।।** परंतु कोणी याच्या उलट अर्थ करितात. 'न रक्षे' ह्मणजे लक्षित होत नाही,



2/15

असा अर्थ जे करितात; कारण त्याच्या ठिकाणी द्रष्टा, दृश्य आणि दर्शन अशी त्रिपुटी च संभवत नाही. **चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों अवघा च पूर्वपक्षु । निर्गुण ठाईचा अलक्षु । लक्षवेना ।।** १३

३. ते पहावयास गेले असतां पाहाणेंपणा नाहीसा होतो. **द्रष्टा द्रष्टेपणें नुरे ।।** ६-१०-१६ **विचारें चि अनन्य जाला । पाहाणाराविण प्रत्यये आला । ते हि वृत्ति निवृत्तीला । बरे पाहा ।।११-९-२४ ।। येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश । लक्ष्यांशासरिसा वृत्तिलेश । तो हि गेला ।।२५।।**

**नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं ।**
**नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाहीं[१] ।**
**म्हणे दास विश्वासतां[२] मुक्ति लाहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१५०।।**

१. तें परब्रह्म पिवळें नाही, पांढरें नाही, काळें नाही, व्यक्त नाही, अव्यक्त नाही,निळे नाही. **काळें ना पिवळें निळें । तांबडें ना हिरवें नव्हे । वर्णवेक्ती तया नाही । सदोदीत चि संचले ।।**

२. सद्गुरुवचनी विश्वास ठेवला ह्मणजे ते लाभते. **मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।।** ५-३-१९

**खरें शोधितां शोधितां शोधताहे[१] ।**
**मना बोधितां बोधितां बोधताहे[२] ।**
**परी सर्व ही सज्जनाचेनि योगें[३] ।**
**बरा निश्चयो[४] पाविजे सानुरागें[५] ।।१५१।।**

१. आत्मा कोण अनात्मा कोण, नित्य काय आणि अनित्य काय, सार कोणतें आणि असार कोणतें याचा विचार करितां त्यांचे ज्ञान होतं.

२. मनाला बोध करितां करितां बोध होतो.

३. पण हें सर्व होण्याला साधूची संगति पाहिजे. **धुंडितां धुंडितां देवो । सत्संगें सांपडे जनीं ।।**

४. बरा निश्चयो ह्मणजे शाश्वताचा निश्चय. पुढे श्लोक १६७ पहा.

५. सानरागें ह्मणजे प्रीतियुक्त होऊन. श्रीसदुरुचे चरणी प्रेम जडलें ह्मणजे शाश्वताचा निवाडा आपोआप होतो.

**बहूतां परी कूसरी[१] तत्त्वझाडा ।**
**परी पाहिजे अंतरी तो निवाडा ।**
**मना सार साचार तें वेगळें[२] रे ।**
**समस्तांमधें येक तें आगळें[३] रे ।।१५२।।**

१. चातुर्य. अंगी पुष्कळ चातुर्य असले किंवा तत्वांचा शाब्दिक उलगडा चांगला करतां आला ह्मणजे सार्थकता झाली असें नव्हे, तर अंतरी तो निवाडा ह्मणजे शाश्वताचा निवाडा पाहिजे; शाश्वत जें परब्रह्म त्यांचे ज्ञान पाहिजे.

२. हे मना, खरोखर सत्य ह्मणून जी वस्तु ती वेगळी च आहे रे; तुझें हें चातुर्य किंवा तत्वझाडा हीं तिच्यापुढें कांही च नाहींत, असा भावार्थ.

३. तें परब्रह्म सर्वांपासून भिन्न असून हि तें सर्वात आहे आणि तें श्रेष्ठआहे. **पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत । पंकी आकाश अलिप्त। असोनि जैसें ।।** ७-४-२०

**नव्हे पिंडज्ञानें[१] नव्हें तत्त्वज्ञानें[२] ।**
**समाधान कांहीं नव्हे तानमानें[३] ।**
**नव्हे योगयागें[४] नव्हे भोगत्यागें[५] ।**
**समाधान[६] तें सज्जनाचेनि योगें ।।१५३।।**

१. शरीराच्या ज्ञानानें.

२. पंचभूतांच्या ज्ञानानें.



३. गायनादि कलांनी.

४. योग = अष्टांग योग. याग=यज्ञ.

५. भोग = सुखोपभोग. त्याग=वैराग्य; किंवा कोणी भोगत्याग ह्मणजे बहिस्त्याग,बाह्य वैराग्य, असा अर्थ करितात.

६. समाधान ह्मणजे समाधी, चित्तवृत्तिनिरोध, तदाकारता. पिंडज्ञानादि ज्या गोष्टी वर सांगितल्या आहेत त्या नकोत असा अर्थ नाही, पण नुसतें तेवढ्यानें समाधान होणार नाही. तर या सर्व गोष्टी असून त्यांच्या मुळाशी सज्जन संगति पाहिजे. **सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरुपण । श्रवणें होइजे आपण । तदाकार ।**।७-८-९ हा च भावार्थ पुढील श्लोकांत स्पष्ट केला आहे.

**महांवाक्य तत्त्वादिकें पंचिकर्णें ।**
**खुणें पाविजे संतसंगें विवर्णें[१] ।**
**द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो ।**
**तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो[२] ।।१५४।।**

१. सत्पुरुषांच्या मुखांतून किंवा ग्रन्थांतून तत्वमस्यादि महावाक्यें, पंच तत्वें व त्या पंचांची पंचवीस तत्वें इत्यादिकांचे विवरण ऐकल्यानें किवा वाचल्यानें परब्रह्माची खूण पटतें ह्मणजे त्याचें नुसतें दिग्दर्शन होतें. पुढील दोन चरणांत शाखाचंद्रन्यायाचा याला दृष्टांत दिला आहे.

२. ज्याप्रमाणें द्वितीयेचा कलामात्र चंद्र एकाद्याला दिसत नसला ह्मणजे तो ज्यानें पाहिला असतो तो त्यास झाडाच्या फांदीची खूण दाखवून त्या दिशेनें बघावयास सांगतो व मग हा त्या फांदीच्या दिशेंनें पाहतो तो त्यास चंद्र दिसतो व चंद्र दिसल्यावर खुणेसाठी योजलेली फांदी तो सोडून देऊन केवळ चंद्र च पाहात राहातो. परमार्थात परब्रह्म हा चंद्र, महावाक्यादि ही फांदी, मुमुक्षु हा चंद्र पाहण्याची इच्छा करणारा, सद्गुरु हे ज्यानें चंद्र

आधी च पाहिला असतो तो.

**दिसेना जनीं तें चि शोधूनि पाहें[१] ।**
**बरें पाहतां गूज तेथें चि आहे[२] ।**
**करीं घेउं जातां कदा आडळेना[३] ।**
**जनीं सर्व कोंदाटलें[४] तें कळेना ।।१५५।।**

१. जें चर्मचक्षूनें दिसत नाही ते ज्ञानचक्षूनें शोधून पहा.

२. आणि अशा रीतीनें पाहात गेलास ह्मणजे सर्वत्र असून हि जें, जणूं काय गुह्य आहे. ते तुला आढळेल. **जगीं थोरला देव तो चोरलासे ।।** तसेंच, **असे सार साचार तें चोरलेंसे ।।**

३. **करीं घेतां नये टाकितां न जाये । ऐसें रुप आहे राघवाचें ।। राघवाचें रुप पाहातां न दिसे । डोळां भरलेंसे सर्व काळ ।।** स्फु. ओ, २९४

४. सर्वत्र भरलें, संचले.

**म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे[१] ।**
**अतर्कासि तर्की असा कोण आहे[२] ।**
**जनीं मीपणें पाहतां पाहवेना ।**
**तया लक्षितां वेगळें राहवेना ।।१५६।।**

१. **यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः । अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ।।** केनोपनिषत्-द्वि. खं. ११ ब्रह्म काय आहे तें मला समजलें असे जो ह्मणेल तो मूर्ख समजावा, त्याला कांही समजलें नसतें. **अद्वैतचर्चा गुरुगम्य आहे । कळे ह्मणे तो सहसा न लाहे । चोरुनि जागे हृदई अहंता । कळे ह्मणे त्या न कळे चि भ्रांता ।।**

२. अतर्क्य जें ब्रह्म, ते जाणणारा असा कोण आहे तात्पर्य काय आहे, हा जाणणारा मुळीं ब्रह्मस्वरुप असून हि ब्रह्म मी जाणतों असें जेव्हां तो ह्मणतो तेव्हां अर्थात् तो ब्रह्मापासून वेगळा पडतो; त्याच्या ठिकाणी अहंता



येते. **वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक । तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ।।** ६-१०-३४

**बहू शास्त्र धुंडाळितां वाड[१] आहे ।**
**जया[२] निश्चयो येक तो ही न साहे ।**
**मती[३] भांडती शास्त्रबोधे विरोधें ।**
**गती[४] खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ।।१५७।।**

१. पुष्कळ,

२ सर्वांचा एक निश्चय नाही, अशी शास्त्रे पुष्कळ आहेत. **बहू निवडितां निवडेना । येक निश्चय घडेना । शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठांई ।।**८-१-११

३. शास्त्रांचा परस्परविरुद्ध अर्थ करुन मताभिमानी लोक भांडत बसतात. **बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध । ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ।।** ८-१-१२ परंतु ज्ञानाचा यथार्थ बोध होऊन मतिप्रकाश झाला ह्मणजे मनाची गति कुंठित होते. मग भांडणाला अवकाश च रहात नाही. **अनेक शास्त्रीं पहातां पडेना । आयुष्य थोडें पहाणें घडेना । विश्वास येके वचनी धरावा । संसार हा दुस्तर नीरसावा ।।**

**श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें ।**
**स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें[१] ।**
**स्वयें शेष मौनावला[२] स्थीर पाहे ।**
**मना सर्व जाणीव[३] सांडून राहे ।।१५८।।**

१. उपनिषदें, न्यायशास्त्र, मीमांसा, तर्कशास्त्र, स्मृति, वेद, वेदांत, इत्यादिकांची भिन्न वचनें आहेत. सर्वांची ब्रह्मनिरुपणपध्दति एक प्रकारची नसून सर्वांची च मति कुंठित झालेली दिसते. **वेद शास्त्र श्रुती स्मृती । तेथें वाक्यभेद पडती ।। ते सर्व हि निवडती । सद्गुरुचेनि वचनें ।।**

२. **शेष वाचाळपणीं थोर जाला । सहस्त्रमुखें प्रस्ताविला । तो ही थ:कीत उगा जाला । नाही कळला निज ठाव ।।** जयबोध **१-२२६**

३. तेथे, ही मना, तुझा पाड तो किती ! यासाठी, हे मना, मी जाणतों असा अहंकार सोडून निश्चल हो. (मागील ११३ वा श्लोक पहा.) **जेथें शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली । जाणपणें न वचे वदली । स्वरुपस्थिती ।।** ७-७-४०

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची[१] ।**
**तया भोजनाची रुची प्राप्ति कैची ।**
**अहंभाव ज्या मानसींचा विरेना[२] ।**
**तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ।।१५९।।**

१. मी जाणतों अशी अभिमानवृत्ति ही च ज्ञानामृतभोजनांतील माशी होय. ती माशी ज्यानें खाल्ली त्याला ज्ञानभोजन गोड कोठून लागणार.

२. ती वृत्ति ज्याच्या मनांतून नाहीशी झाली नाही त्याला हें ज्ञानभोजन पचावयाचें नाही. तात्पर्य, अहंकार नष्ट झाल्यावांचून ज्ञान होणें नाही. अंतरी एकदां देव प्रगटला ह्मणजे मग तेथें मीपणाला उरी नाही. **अहंकार शत्रु द्वैतासि कारण । होवों नेदी ज्ञान स्वरुपाचें ।।**

**नको रे मना वाद हा खेदकारी[१] ।**
**नको रे मना भेद नाना विकारी[२] ।**
**नको रे मना सीकऊं पूढिलांसि ।**
**अहंभाव[३] जों राहिला तूजपासीं ।।१६०।।**

१. **घालूं नये वाद वाउगा वेवाद । तेणें गुणें खेद होत आहे ।।** स्फु. ओ. ५-४४

२. हे मना, द्वैतभाव धरुं नकोस, कारण त्यापासूनच षड्विकारांची उत्पत्ति आहे.



३. असला परकेपणा किंवा अहंकार जोपर्यंत तुझ्या ठिकाणी आहे, तोपर्यंत, हे मना, दुसऱ्याला ज्ञानाच्या गोष्टी सांगण्याच्या भरीस पडूं नकोस; कारण, सर्व दु:खाचें मूळ अहंकार आहे.

**अहंतागुणें सर्व ही दुख होतें[१] ।**
**मुखें बोलिलें ज्ञान तें वेर्थ जातें[२] ।**
**सुखी राहतां सर्व ही सूख[३] आहे ।**
**अहंता तुझी तूं चि[४] शोधूनि पाहें ।।१६१।।**

१. **मीपणें मीत्री तुटे । मीपणें प्रीति आटे । मीपणें लिगटे । अभिमान आंगी ।।** ७-७-४८ **मीपणें विकल्प उठे । मीपणें कळह सुटे । मीपणें संमोह फुटे ऐक्यतेचा ।।** ४९

२. अहंकारी मनुष्याच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देत नाही. तो जेवढें बोलतो तेवढे सर्व वाया जातें.

३. अहंभावविवर्जित. दु:खाचें मूळ जो अहंकार तो गळाला ह्मणजे सर्वत्र सुख च आहे.

४. हे मना, तुझ्या ठिकाणीं अहंकार आहे किंवा नाही, याचा तूं च आपला विचार करून पहा. दुसऱ्या कोणी तुझा अहंकार दाखविला तर तूं रागावणार आणि भरीस पेटून अहंकार मात्र वाढणार ?

**अहंतागुणें नीति सांडी विवेकी ।**
**अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।**
**परी अंतरीं सर्व ही साक्ष येते ।**
**प्रमाणांतरें बुद्धि सांडूनि जाते ।।१६२।।**

**अन्वय :** अहंतागुणें विवेकी (मनुष्य) नीति सांडी (व) अनीतीबळें सर्व लोकीं (त्याची) श्लाघ्यता (होते) परी अंतरी सर्व ही साक्ष येते, (तथापि अनीतीबळें त्याची किंवा की आपली) बुद्धि प्रमाणांतरें सांडूनि जाते.

**अर्थ :** अहंतेच्या योगानें विचारी मनुष्य देखील नीति सोडतो ह्मणजे वेदमर्यादा वगैरे पाळीत नाही. अनीतीच्या योगानें लोकांत त्याची मानमान्यता हि होते; परंतु तो विचारी च असल्यामळें त्याचे मन त्याला खात च असतें. तथापि विचारावर अनीतीचा पगडा बसल्यामुळें त्याची बुद्धि वेदप्रमाणें वगैरे कांही पाहात नाही; किंवा आपली बुद्धि वेदप्रमाणें वगैरे जुमानीत नाही, याविषयी त्याच्या मनांत त्याला स्वत:च्या मूर्खपणाची खूण पटत च असते. **प्रमाणोत्तरी चित्त तें ही न घाली । तया पापरुप्यास कां रांड व्याली ।।**

> **देहेबुधिचा निश्चयो दृढ जाला ।**
> **देह्यातीत तें हीत सांडीत गेला[१] ।**
> **देहेबुधि ते आत्मबुधी करावी[२] ।**
> **सदा संगती[३] सज्जनाची धरावी ।।१६३।।**

१. देह तो च मी, असा याचा निश्चय बळावल्यामुळें, देहातीत जें हित, त्याला हा मुकला. **हित आहे देहातीत । ह्मणौनि निरोपिती संत । देहबुद्धिनें अन्हित । हों चि लागे ।।** ७-२-३७

२. ह्मणून देह तो च मी अशी जी बुद्धि झालेली असते ती टाकून अहं ब्रह्मास्मि अशी आत्मबुद्धि धरावी. मृगजलाचे ठिकाणी जलबुद्धि ठेवल्यास शीण मात्र व्हावयाचा । जलबुद्धि जलाचे च ठिकाणी झाली पाहिजे. **विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें । सत्य ब्रह्मीं साचारणें । मिळोन जावें ।।** ७-२-४१

३. असे होण्यास नेहमी सत्संगति धरली पाहिजे. **न करितां वित्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम । सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ।।** ७-१-३८ **।। जें वित्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ।।९।। ह्मणौनि कारण सत्समागम ।। तेथें नलगे वित्पत्तीश्रम । जन्मसार्थकाचें वर्म । वेगळें चि आहे ।।४०।।**



> **मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।**
> **मनें देव निर्गूण तो वोळखावा[१] ।**
> **मनें कल्पितां कल्पना ते सरावी[२] ।**
> **सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६४।।**

१. अद्वैत कल्पी ते शुद्ध कल्पना व द्वैत कल्पी ते अशुद्ध कल्पना. मनानें जी द्वैताची अशुद्ध कल्पना केलेली असते ती तर सोाडली च पाहिजे, पण अद्वैताची जी शुद्ध कल्पना केलेली असते ती हि उरली न पाहिजे; तर च निर्गुणदेवाची ओळख पटणार आहे, एऱ्हवीं नाही. शुद्ध कल्पनेनें अशुद्ध कल्पना दवडावी व अखेरीस जी अद्वैताची शुद्ध कल्पना उरेल ती हि दवडून तद्रूप व्हावें. **अद्वैतकल्पना प्रकाशे । ते चि क्षणीं द्वैत नासे । द्वैतासरिसी निरसे । सबळ कल्पना ।।** ७-५-३७ **कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें । सबळ गेलिया नंतरे । शुद्ध उरली ।।३८।। शुद्ध कल्पनेचें रुप । तें चि जें कल्पी स्वरुप । स्वरुप कल्पितां तद्रूप । होये आपण ।।३९।। कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहज चि तद्रूप जालें । आत्मनिश्चयें नासिलें । कल्पनेसी ।।४०।।**

२. अद्वैताची शुद्ध कल्पना करितां करितां त्या कल्पनेला हि मिथ्यत्व येऊन ती नाहीशी व्हावी व निवळ निर्विकल्प स्वरुप उरावें. **निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावे । कल्पकोटी ।।** ७-३-४९ **।।कल्पनेचें येक बरें । मोहरितां च मोाहरे । स्वरुपी घालितां भरे । निर्विकल्पी ।।५०।। निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता । नि:संगास भेटों जातां । नि:संग होईजे ।।५१।।** असो, या गोष्टी कळण्यासाठी **वेगी गुरु करी दास ह्मणे ।।**

**देह्यादीक प्रपंच हा चिंतियेला[1] ।**
**परी अंतरी लोभ निश्चीत ठेला[2] ।**
**हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी[3] ।**
**सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६५।।**

१. देह व तत्संबंधी जो प्रपंच, किंवा मी व माझें, यांचे चिंतन केले;

२. तरी फळ काय ? अंत:करणांत लोभाचें मात्र कायमचें बिऱ्हाड होतें; आणि मग **पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यांते । ह्मणोनी जनीं मागुता जन्म घेतें ।।** मागील श्लोक १६ पहा.

३. देहादिकाची चिंता केली तर लोभ उत्पन्न होतो व लोभामुळे पुनरपि जननं पुनरपि मरणं मागें लागतें; ह्मणून प्रपंचाची चिंता न करतां देवाची चिंता करुन मुक्तिकांता आपलीशी करुन घ्यावी. **प्रपंच हा विसंच रे । तया परी च संच रे । भुलों नका भुलों नका । क्षणीक सर्व वोळखा ।।**

**अहंकार विस्तारला या देह्याचा ।**
**स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा[1] ।**
**बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी[2] ।**
**सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६६।।**

१. देहाच्या अहंकाराचा विस्तार होऊन स्त्री, पुत्र, मित्र, इत्यादिकांचा त्याला मोह पडला आहे.

२. परंतु स्त्रियादिकांचा मोह हा नुसता भ्रम असून तो च जन्म मरणाच्या फेऱ्याला कारण आहे; ह्मणून त्या भ्रमाचें ज्ञानबलानें निरसन केले पाहिजे. माता, पिता, बहिण, भ्राता, सुहृद, वनिता, प्रपंच, कुळ, धन, धान्य, घर, दार, तारुण्य, वैभव इत्यादिकांचा मनुष्याला नुसता भ्रम झाला आहे. हे प्राण्या, **ये च क्षणीं मरोनी जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें ह्मणतोसी । ह्मणौनियां ।। ३-१०-५० ।। तुवां भोगिल्या**



**पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती । स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष।।५१।। कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं । ते तुवां आपुलीं मानली । कैसी रे पढतमूर्खा ।।५२।। हें ज्ञान होण्याला आणि ठसण्याला सद्गुरुचरण च सेविले पाहिजेत.**

**बरा निश्चयो शाश्वताचा[1] करावा ।**
**म्हणे दास संदेह तो वीसरावा ।**
**घडीनें घडी सार्थकाची करावी[2] ।**
**सदा संगती सज्जनाची धरावी[3] ।।१६७।।**

१. शाश्वताचा ह्मणजे आत्मत्वाचा, 'अहंब्रह्मास्मि' याचा. देहबुद्धि बळकट झाल्यामुळें मनुष्य संदेहांत पडला आहे. तो संदेह नाहीसा होण्याला देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि धरली पाहिजे. **सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान । याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ।।** ५-१०-३६

२. नरदेह कांही वारंवार प्राप्त होत नाही, असे जाणून आयुष्यांतील प्रत्येक क्षण कारणी लावावा. **हरिभक्तीवीणें जाऊं नेदी क्षण । या नांव लक्षण सार्थकाचें ।।** स्फुट ओवी २७७.

३. **निरोपिलें निश्चयांचे लक्षण । परी हें नकळे सत्संगेविण । संतांसि गेलियां शरण । संशये तुटती ।।**

**करी वृत्ति जो संत तो संत जाणा[1] ।**
**दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा[2] ।**
**उपाधी देहेबुधितें वाढवीते ।**
**परी सज्जना केवि बाधूं शके ते[3] ।।१६८।।**

१. जो मनोवृत्ति स्थिर करितो, ह्मणजे शाश्वत आणि अशाश्वत याचा निवाडा

करुन जो शाश्वत स्वरुपी आपली वृत्ति लीन करितो, तो संत जाणावा. **जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत । जो शाश्वत आणी अशाश्वत । निवाडा करी ।।**

२. दुराशा = दुष्ट आशा, प्रपंचादिकाची स्वार्थपर आशा. दैन्याला कारण स्वार्थाची आशा होय; तो स्वार्थ च नसला ह्मणजे दैन्य कोठून येणार ? **आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची । ह्मणोन नैराशता साधूची । वोळखण ।।** ८-९-४६

३. सिद्धदशा प्राप्त होण्यापूर्वी उपाधीत पडल्यास देहबुद्धि वाढत जाते, परंतु सिद्धदशा एकदां अंगी बाणल्यावर उपाधी काय करणार ? **स्थिति बाणतां स्वरुपाची । चिंता सोडिली देहाची । याकारणें होणाराची । चिंता नसे ।।** ८-९-४९ **स्वरुपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी । याकारणें निरोपाधी । साधु जन ।।५०।।**

**नसे अंत आनंत संता पुसावा ।**
**अहंकार विस्तार हा नीरसावा[१] ।**
**गुणेंवीण निर्गूण तो आठवावा[२] ।**
**देहेबुधिचा आठऊं नाठवावा[३] ।।१६९।।**

१. **अंत चि नाही तें अनंत । शाश्वत आणी सदोदित ।।** असें जें स्वरुप त्याचें ज्ञान सत्पुरुषापासून करुन घ्यावें आणि तेणेंकरुन देहबुद्धि व देहबुद्धीचा विस्तार जो प्रपंच यांचे निरसन करावें.

२. गुणेविण असे जे निर्गुण त्यांचे चिंतन करावें;

३. पण ते करीत असतां देहबुद्धीचे मात्र स्मरण नसावे. **तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे । जाणोनिया नेणिजे । परब्रह्म तें ।।** ते कसें हें संतांना पुसावें !



**देहेबुधि हे ज्ञानबोधें तजावी ।**
**विवेकें तये वस्तुची भेटि घ्यावी[१] ।**
**तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें ।**
**म्हणोनी सदा तें चि शोधीत[२] जावें ।।१७०।।**

१. **देहेभान हें ज्ञानशस्त्रे खुडावें । विदेहीपणें भक्तिमार्गे चि जावें ।।**१८८

२. आपण च जर ब्रह्मस्वरुप आहोत, तर मग स्वरुपज्ञान होण्यासाठी प्रयत्न कां करावा लागतो ? याचें कारण इतकें च की, आपली वृत्ति स्वभावत: तदाकार नाही, ह्मणून सत्पुरुषांनी जो साधनमार्ग प्रतिष्ठिला आहे त्या मार्गानें जाऊन परब्रह्माचा शोध घ्यावा.

**असे सार साचार तें चोरलेंसे ।**
**येहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे[१] ।**
**निराभास निर्गूण तें आकळेना ।**
**अहंतागुणें कल्पितां ही कळेना[२] ।।१७१।।**

१. पण तें सत्य परब्रह्म गुप्त असून चर्मचक्षूंनें दिसावयाचे नाही. चर्मचक्षूला दृश्य तेवढे दिसणार.

२. ते परब्रह्म निराभास, निर्गुण असल्यामुळें त्याचे आकलन होत नाही. किती हि धडपड केली तरी देहबुद्धि आहे तोंवर तें कळणार नाही. **देहबुद्धि केली बळकट । आणी ब्रह्म पाहों गेला धीट । तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ।।** ६-८-४३

**स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या[१] ।**
**स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या[२] ।**
**मुळीं कल्पना दों रुपें ते चि जाली[३] ।**
**विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली ।।१७२।।**

१. विषयांच्या ठिकाणीं स्फुरण पावणारी कल्पना ती अविद्या, तो विकल्प, ती अशुद्ध कल्पना होय.

२. ब्रह्माचे ठिकाणी स्फुरण पावणारी कल्पना ती सुविद्या, तो संकल्प, ती शुद्ध कल्पना होय.

३. पण मूळच्या एकाच कल्पनेची ही दोन रुपें आहेत. कल्पना हा मनाचा खेळ आहे. एका रुपांत मन विषयांचे चिंतन करितें व दुसऱ्यांत ब्रह्माचें चिंतन करितें. दोन्ही ठिकाणी द्वैत आहे च. विषयी कल्पना करण्याचा मनाला छंद लागलेला असतो; यासाठी विषयांवरुन मन ब्रह्मचिंतनाकडे न्यावें व अखेरीस विचार करितां करितां तें सस्वरुपी लीन करुन सोडावें. तेव्हां मनाचें उन्मन होते. **सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी ।।** ७.५.४ **जयास द्वैत भासलें । ते मन उन्मन जालें । द्वैताअद्वैताचें तुटले । अनुसंधान ।।** ७-५-१२

**स्वरूपीं उदेला अहंकार राहो ।**
**तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहों ।**
**दिशा पाहतां ते निशा वाढताहे ।**
**विवेकें विचारें विवंचूनि पाहे ।।१७३।।**

व्योमाकार स्वरुपाचे ठिकाणीं अहंकाररुपी राहु उदयास येऊन स्वरुपाला आच्छादून टाकतो. तेणेंकरुन दिशा पहावयास जावें तो सर्वत्र (अज्ञानरुपी) अंधकार पसरलेला दिसतो. तात्पर्य, स्वरुपाचा साक्षात्कार होण्याला अहंकाराचे मोठें विघ्न आड येतें; हें खरें की खोटे, याचा विचार करुन पहा ह्मणजे कळेल.

**जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना[1] ।**
**भवा भक्षितां[2] रक्षितां रक्षवेना[3] ।**
**क्षयातीत तो आक्षै मोक्ष देतो[4] ।**
**दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो[5] ।।१७४।।**



१. **जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे ।।** १४९

२. जन्ममरणरुपी भवाचें ह्मणजे संसाराचें तो भक्षण करितो.

३. त्या भवाचें रक्षण करुं ह्मटल्यानें रक्षण होत नाही, असा कोणी अर्थ करितात; कोणी, त्याला ज्ञानचक्षूनें पाहू ह्मटलें तरी लक्षित होत नाही, असा अर्थ करितात. **न कालेन भक्ष्यो जनैर्नैव रक्ष्यः ।।** असा या चरणाचा अर्थ संस्कृत रुपांतरकारांनी केला आहे.

४. तो क्षयातीत असून आपल्या भक्ताला सायुज्यता मुक्ति देतो.

५. आपल्या भक्तावर दया करण्याविषयी तो दक्ष असून, मायेचा स्वीकार करुन, नानाविध अवतारचरित्रें करितो व भक्ताचा कैवार घेऊन, त्याचें रक्षण करितो.

**विधी निर्मितां लीहितो सर्व भाळीं ।**
**परी लीहिता कोण त्याचे कपोळीं ।**
**हरु जाळितो लोक संव्हारकाळीं ।**
**परी सेवटीं शंकरा कोण जाळी ।।१७५।।**

ब्रह्मदेव उत्पत्ति करितो, (विष्णु पालन करितो) व महेश संहार करितो, हे सर्व खरें; पण ब्रह्मदेवाला कोण निर्माण करितो, (विष्णूचें कोण पालन करितो) व शंकराचा कोण संहार करितो ? (कपोळ = कपाळ) **ब्रह्मयानें सकळ निर्मिले । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ।।** ९-५-२४ **।। रुद्र विश्वसंहार कर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ।।** २५ (दा ९ ह्म ५, ९ ह्म ७ व १० ह्म ४ पहा) तात्पर्य, विधीला निर्माण करणारा, (विष्णूचें पालन करणारा) व शंकराचा संहार करणारा निराळा कोणी देव आहे. **सकळांसी निर्मिता देव । देवासी निर्मिता नसे । सर्वांसी मूळ तो देवो । देवासी मूळ नाडळे ।।** पं.यो.४-१३ **।। ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता**

तो चि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ।। ६-१-१२

**जगीं द्वादशादीत्य हे रुद्र आक्रा ।**
**असंख्यात संख्या करी कोण शक्रा[1] ।**
**जगीं देव धुंडाळितां आडळेना ।**
**जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना[2] ।।१७६।।**

१. जगांत बारा आदित्य व अकरा रुद्र आहेत. शक्र तर असंख्यात आहेत, त्यांची गणना हि कोणाला होत नाही. पण ह्यांना कांही परमेश्वर ह्मणतां येत नाही. **बारा आदित्य अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर । नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ।।** ८-४-५२

२. ह्या सर्वांच्या पलीकडील परमेश्वराचा पुष्कळ शोध केला, पण तो कांही आढळत नाही व तो कोण आणि कसा आहे हें हि कळत नाही. त्या थोरल्या परमेश्वराच्या स्वरुपाचें वर्णन पुढील श्लोकांत कलें आहे.

**तुटेना फुटेना[1] कदा देवराणा ।**
**चळेना ढळेना कदा दैन्यवाणा[2] ।**
**कळेना कळेना कदा लोचनासी ।**
**वसेना दिसेना जगीं मीपणासी[3] ।।१७७।।**

१. मागें श्लोक १४७ पहा.

२. कदा दैन्यवाणा नाही, असा अन्वय.

३. मागें श्लोक १७१ पहा. **वाउगाची देव पाषाणाचा केला । भाव हा लागला तयापासी ।।** स्फु.ओ.७२-५ **तयापासीं मन आखंड लागलें। तों तया फोडिलें कोण्ही येकें ।।६।। कोण्ही येके बरा विवेक पहावा। देवाआदिदेवा वोळखावें ।।७।। वोळखावें देवा निर्मळा निश्चळा । निर्गुणा केवळा निरंजना ।।८।। निरंजना देवा कोण्ही उछेदिना ।**



फुटेना तुटेना कदा काळी ।।९।। कदा काळीं देव पडेना झडेना । दृढ उपासना रामदासीं ।।१०।।

**जया मानला देव तो पूजिताहे ।**
**परी देव शोधूनि कोण्ही न पाहे ।**
**जगीं पाहतां देव कोट्यानकोटी ।**
**जया मानली भक्ति जे तेचि मोठी ।।१७८।।**

**मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव । काशाचे देव पितळेचे देव । तांब्याचे देव चित्रलेपे ।।** १९-५-१ **।। रुविच्या लांकडाचे देव पोंवळ्यांचे देव । बाण तांदळे नर्मदे देव । शालिग्राम काश्मिरी देव । सूर्यकांत सोमकांत ।।२।। तांब्रनाणीं हेमनाणीं ।कोणी पूजिती देवार्चनी । चक्रांगीत चक्रतीर्थाहुनी । घेऊनी येती ।।३।। उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद । आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ।।४।। भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना । मुख्य देव तो कळेना । कांही केल्यां ।।२३।। बहू देव ते जन्मले आणि मेले । असंख्यात होणार होऊनि गेले । जया नाश तो जाण मिथ्या ह्मणावा । खरा देव तो आदरें वोळखावा ।।**

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले ।**
**तया देवरायासी कोण्ही न बोले ।**
**जगीं थोरला देव तो चोरलासे ।**
**गुरूवीण तो सर्वथा ही न दीसे ।।१७९।।**

**ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तो चि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ।।**६-१-१२ **।। तो देव ठाईं पडेना । तरी येमयातना चुकेना । ब्रह्मांडनायक चोजवेना । हें बरें नव्हे ।।१३।। जेणें संसारीं**

**घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केलें । त्यासी नाही वोळखिलें तो चि पतित ।।१४।। ह्मणोनि देव वोळखावा । जन्म सार्थक चि करावा । न कळे तरी सत्संग धरावा । ह्मणिजे कळे ।।१५।।** तसेंच

**ब्रह्मा विष्णु रुद्र जयाचे अवतार । तो चि देव थोर जाण बापा ।।** स्फु.ओ.२८१-१ **जाण बापा देव देवासी निर्मिता । तो येक तत्वता ठांई पाडीं ।।२।। ठांई पाडीं देव साधूचें संगती । दास ह्मणे गती पावसील ।।३।।**

**गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी[1] ।**
**बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।**
**मनीं कामना चेटकें धातमाता[2] ।**
**जनीं वेर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ।।१८०।।**

१. सद्गुरुवांचून तर मोक्ष नाहीं व सद्गुरु पाहावयास जावें तर आपणांस सद्गुरु ह्मणविणारे लक्षावधी - नव्हे कोट्यावधी आहेत; ५ व्या दशकाच्या ४ थ्या समासांत सांगितल्याप्रमाणें त्यांचे उपदेशमंत्र हि बहुविध आहेत व कित्येकांच्या ठिकाणी सामर्थ्य हि मोठें दिसतें, तेव्हां ते सगळे च सद्गुरु मानून, त्यांपैकी कोणाचा तरी अनुग्रह घ्यावा, कां सद्गुरु ओळखण्याची कांही लक्षणें आहेत की जेणेकरुन तयाची ओळख पटावी ? ह्या व पुढील तीन श्लोकांत श्रीसमर्थ सद्गुरुची कांही लक्षणें देत आहेत. एकंदर सर्व लक्षणांचा उल्लेख द. ५ ह्व २ त आला आहे, तो वाचकांनी अवश्य वाचावा.

२. धात ह्मणजे गीतप्रबंध व मात ह्मणजे ग्रन्थपाठांतर किंवा मुखानें गोष्टीं सांगणे. (स्वा.दि.८-४-२७) आशाळभूत चेटूक करणारा, परंतु गीतप्रबंधांत, ग्रन्थपाठांतरांत किंवा गोष्टी सांगण्यांत पुष्कळ चतुर, असला गुरु व्यर्थ होय, तो शिष्यास मुक्तिदायक होणें नाही. **ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ।।** ५-२-२१



**नव्हे चेटकी चाळकु[1] द्रव्यभोंदु[2] ।**
**नव्हे निंदकु मछरु[3] भक्तिमंदु[4] ।**
**नव्हे उन्मतु[5] वेसनी[6] संगबाधु[7] ।**
**जनीं ज्ञानिया तो चि साधु अगाधु ।।१८१।।**

१. चाळविणारा, फसविणारा.
२. पैसा उकळणारा.
३. मत्सरी.
४. भक्तिउणा, भक्तिहीन.
५. उन्मत्त.
६. व्यसनी.
७. ज्याच्या संगतीपासून उलट अपाय होतो असा.

**नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं ।**
**क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी[1] ।**
**मुखें बोलिल्यासारिखें चालताहे ।**
**मना सद्गुरू तो चि शोधूनि पाहे[2] ।।१८२।।**

१. ज्याचें बोलणें फटकळ, ज्याच्या अंतरी कामना व ज्याच्या ठिकाणीं कर्म, उपासना, यांचा अभाव असून ज्याचे बोलणे मात्र अघळपघळ असते तो सद्गुरु नव्हे. **अद्वैतनिरुपणें अगाध वक्ता । परी विषंईं लोलंगता । ऐसिया गुरुचेनि सार्थकता । होणार नाही ।।** ५-२-३१.

२. तर, हे मना, जो **जैसें मुखें ज्ञान बोले । तैसी च सवें क्रिया चाले ।।** तो च सद्गुरु जाणावा. १२-४-१३

**जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।**
**कृपाळु मनस्वी[1] क्षमावंत योगी ।**
**प्रभु दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे ।**
**तयाचेन योगें समाधान बाणे ।।१८३।।**

१. उदार मनाचा, किंवा मन स्वाधीन ठेवणारा. द.५.स.२ यांत जी लक्षणे दिली आहेत ती खालील ओवींत एकत्र आली आहेत. **ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन । कथा निरुपण श्रवण मन । नीति न्याये मर्यादा ।।** ५-२-५२

**नव्हे तें चि जालें नसे तें चि आलें ।**
**कळों लागलें सज्जनाचेनि बोलें[1] ।**
**अनुर्वाच्य तें वाच्य वाचे[2] वदावें[3] ।**
**मना संत आनंत शोधीत जावें ।।१८४।।**

१. जें जालें नाही आणि जें आले नाही असे जे अज आणि अचल स्वरुप सत्पुरुषांच्या मुखानें कळूं लागले.
२. ''कैसे'' होते, हरताळ लावून ''वाचें'' केले आहे.
३. **अनुर्वाच्य समाधान जाले । ते पाहिजे बोलिले । बोलिल्यासाठीं समाधान गेले । हे तो घडेना ।।** २०-७-१ तें जरी अनिर्वाच्य आहे तरी तें वाच्य करून वाचेने बोलावे. बाकी ते **ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें । परी ते श्रवण अभ्यासें । पाविजे ब्रह्म ।।**

**लपावें अती आदरें रामरूपीं[1] ।**
**भयातीत[2] निश्चीत ये सस्वरूपीं ।**
**कदा तो जनीं पाहतां ही दिसेना ।**
**सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ।।१८५।।**



१. भयातीत व निश्चित अशा सस्वरुपी ह्मणजे च रामरुपीं इतक्या आदरानें लपावें की, जेथून आपणांस कोणी केव्हां हि हुडकून काढणार नाही. रामरुपीं तद्रुप झाल्यावांचून हें असे लपणे कसे शक्य आहे, की तेथून कोणाला च आपण केव्हां हि दिसू नये ? ह्मणून च चवथ्या चरणांत ह्मणतात की, रामरुपी ऐक्य व्हावें, तद्रूप व्हावें, भिन्नभाव उरुं नये. **विभक्तपणें नसावें । तरी च भक्त ह्मणवावें ।।**
२. मागील श्लोक १३६ पहा.

**सदा सर्वदा राम सन्नीध आहे ।**
**मना सज्जना सत्य शोधून पाहें ।**
**अखंडीत भेटी रघूराज योगु ।**
**मना सांडि रे मीपणाचा वियोगु ।।१८६।।**

हे मना, तूं विचार करुन पहा ह्मणजे तुला असें आढळून येईल की, श्रीराम नेहमी तुझ्या जवळ आहेत, तूं वेडा आहेस ह्मणून श्रीराम मजला भेटावेत, असे तुला वाटत असते; पण श्रीरामाची आणी तुझी तुटी च मुळी झाली नाही, नेहमी भेटी च आहे. वियोग च मुळी झाला नाहीं, नेहमी योग च आहे ! हे मना, श्रीरामापासून आपण वेगळे आहोत असे तुला वाटते, तो देहबुद्धीचा खेळ आहे, त्या वेगळेपणाची कल्पना च सोडून दे. **आह्मा तुह्मा मुळीं जाली नाहीं तुटी । तुटीवीण भेटी इछीतसा । इछीतसा योग नसतां वियोग । तुह्मा आह्मा योग सर्व काळ ।। सर्व काळ तुह्मी आह्मी येके स्थळीं । वायां मृगजळीं बुडो नये ।।** स्फु.ओ.९४.

**भुतें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे[1] ।**
**परी सर्व ही सस्वरूपीं न साहे[2] ।**
**मना भासलें सर्व कांहीं पहावें[3] ।**
**परी संग सोडूनि सूखी रहावें ।।१८७।।**

१. पंचभूतें पिंडाचे ठिकाणी आहेत व ती च ब्रह्मांडाचे हि ठिकाणी आहेत, ह्मणून पिंड व ब्रह्मांड यांची ऐक्यता आहे. **जें चि पिंडी तें चि ब्रह्मांडी । प्रचित नाही की रोकडी । पंचभूतांची तांतडी । दोहीकडे ।।** ९ 5/40

२. परंतु ती पंचभूतें ब्रह्माचे ठिकाणी संभवत नाहीत. **ब्रह्मांड पिंडीचीं तत्वें । बहुरुपें विकारली । पिंड ब्रह्मांड हि नाही । तें ब्रह्म जाणती भले ।। च.मा.२-५ ।। पिंडब्रह्मांडनिरास । मग ते ब्रह्म निराभास । येथून तेथवरी अवकास । भकासरुप ।।** २०-१०-२२

३. हे मना, हे जें पंचभूतात्मक दृश्य भासमान होत आहे ते सर्व पहावें, परंतु स्वरुपाची ओळख व्हावी अशी तुझी इच्छा असल्यास त्याचा संग सोडला पाहिजे. **संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला । अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ।।** ७-२-१९

**देहेभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें[१] ।**
**विदेहीपणें भक्तिमार्गें चि जावें[२] ।**
**विरक्तीबळें निंद्य सर्वै तजावें[३] ।**
**परी संग सोडूनि सूखें रहावें ।।१८८।।**

१. हा आपला संग ज्ञानाने सोडावा. ज्ञानशस्त्राने अहंकाराचे निर्मूलन करावें.

२. अहंकार नाहींसा होऊन विदेहस्थिति प्राप्त झाली ह्मणजे 'भक्तिपंथे चि जावें.' त्याला च भक्त ह्मणावें, हा तात्पर्यार्थ.

३. वैराग्येंकरुन **जनीं निंद्य ते सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावे ।।** परंतु त्या संग न धरावा तर च सुख होईल. **देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ।।** ८-८-२८



**मही निर्मिली देव तो वोळखावा ।**
**जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा[१] ।**
**तया निर्गुणालागि गूणीं पहावें[२] ।**
**परी संग सोडूनि सूखें रहावें ।।१८९।।**

१. पृथ्वी ज्या देवाने निर्माण केली तो ओळखला पाहिजे; त्याची ओळख पटेल तर जीव तत्काळ मोक्षदशा पावेल. पण जनाची तऱ्हा पहावी तर वेगळी च. सृष्टिनिर्माणकर्ता देव ओळखण्याऐवजी सृष्टीच्या पोटी जे पाषाण होतात त्यांना च लोक देव समजतात. **देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयास चि देव ह्मणती । विवेकहीन ।।** ८-१-२९

२. तो च निर्गुण देव सगुण झालेला पाहावा. निर्गुणाला ओळखल्यावर हि सगुणाला सोडूं नये असा भावार्थ. **भजनरहित ज्ञानें मोक्ष होणार नाहीं । सकळ निगम त्यांचे सार शोधूनि पाहीं । सगुण भजन मागें रक्षिलें थोरथोरी । अधम नर तयांचे ज्ञान संदेहकारी ।।** परंतु सगुणाची उपासना जरी सांगितली आहे, तरी ती अहंकारविवर्जित असावी; तर च तिजपासून समाधान होणार आहे.

**नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता[१] ।**
**परेहून पर्ता[२] न लिंपे विवर्ता[३] ।**
**तया निर्विकल्पासि कल्पीत जावें[४] ।**
**परी संग सोडूनि सूखें रहावें ।।१९०।।**

१. तो निर्गुण देव ब्रह्माप्रमाणें सृष्टिकर्ता नाहीं व विष्णूप्रमाणे तिचा पालनकर्ता हि नाही.

२. तो परेहून पर्ता आहे; परावाणीच्या पलीकडचा ह्मणजे वाचातीत आहे. **परेहूनि जो पर्ता । परात्पर चि बोलिजे । उन्मेष ते परा वाचा ।**

**वाचातीत निरंजनु ।।**

३. तो विवर्ता न लिंपे. विवर्त ह्मणजे माया, भ्रम. त्याला माया स्पर्शू शकत नाही (सुंदरकांड पहिला श्लोक पहा.)

४. असा जरी तो निर्विकल्प आहे, तरी त्याची कल्पना करीत च जावी; फक्त अखेरीस ती कल्पना हि शिल्लक न उरली ह्मणजे झालें. **निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता ।। नि:संगास भेटों जातां । नि:संग होइजे ।।** (मागील श्लोक १६४ पहा).

**देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना ।**
**तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना[1] ।**
**परब्रह्म तें मीपणें आकळेना[2] ।**
**मनीं शून्य अज्ञान हें मावळेना[3] ।।१९१।।**

१. देह तो च मी असला आत्मघातकी निश्चय ज्याचा ढळत नाही त्याला ज्ञान होण्याची केव्हां हि आशा नको. (मागील श्लोक १३८ पहा.)

२. श्लोक १३७ ते १४१ पहा.

३. मीपण आहे तोंवर शून्य ह्मणजे च अज्ञान नाहीसे होत नाही. **भिन्नपणें अनुभविलें । तयास शुन्य ऐंसे बोलिले ।।** ८-१०-७२.

**मना ना कळे ना ढळे रूप ज्याचें ।**
**दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें ।**
**तया खूण ते हीण दृष्टांत पाहे ।**
**तेथें संग निसंग दोनी न साहे ।।१९२।।**

मनाला त्याचे रुप कळत नाही. त्याला रुप नाही च ह्मणावें तर त्याचे रुप कधी ढळत नाही, सदादित संचले आहे. मग त्या सर्वोत्तम श्रीरामाचे ध्यान आहे तरी कोणासारखें, ह्मणून दृष्टान्त देऊं पहावा तर ते 'एकमेवाद्वितीयम्' आहे. **स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांही येकासारिखें नव्हे ।।** २०-१०-२१





त्याची खूण पटण्याकरितां जो जो ह्मणून दृष्टांत योजावा, तो तो त्यापुढे कमसल ठरतो. त्याला जवळचा दृष्टांत ह्मणजे आकाशाचा देतात; परंतु **आकाश अनुभवा येते । स्वरुप अनुभवापरतें । ह्मणोनियां आकाशातें । साम्यता न घडे ।।** अशा त्या ब्रह्मस्वरुपाचे ठिकाणी मीपणाचा संग किंवा नि:संग ही दोही हि संभवत नाहीत. **ब्रह्मज्ञानी समाधानी । संगातीत महां मुनी । मीपणातीत तें ब्रह्म । सदोदित चि संचले ।।**

**नव्हे जाणता नेणता देवराणा[1] ।**
**न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां ।**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा[2] ।**
**श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ।।१९३।।**

१. तो ज्ञानस्वरुप अथवा अज्ञानस्वरुप नाही. **जाणतां नेणतां प्राणी । जन्मतो मरतो सदा । जाणणें नेणणें नाही । तें ब्रह्म जाणती भले ।।** च.मा.२-७

२. तो दृश्य अथवा अदृश्य नाही, दृश्यादृश्याचा साक्षी हि पण नाही. कोणी साक्षी आहे असा अर्थ करितात. दृश्य=स्थूल. अदृश्य=सूक्ष्म. **दृश्य ना भास ना साक्षी । ज्ञानाज्ञान असेचिना । वृत्ति निवृत ही नाही । शब्द मौन घडेचिना ।।** स्फु.प्र.

**वसे हृदयीं देव तो कोण कैसा ।**
**पुसे आदरें साधकु प्रेष्ण ऐसा ।**
**देहे टाकितां देव कोठें रहातो ।**
**परी मागुता ठाव कोठें पहातो[1] ।।१९४।।**

१. जो बद्ध आहे त्याला पुन्हां जन्म असतो. **पंच प्राण स्थळें सोडिती । प्राणरुप वासनावृत्ती ।वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडूनियां।।** ९-८-४ **।। वायोसरिसी वासना गेली । ते वायारुपें चि राहिली ।**

**पुन्हां जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें ।।** ५ परंतु जो ज्ञानी आहे तो जन्ममरणापासून सुटतो. साधकाचा प्रश्न असा आहे की, मनुष्य ज्ञानी असो वा बद्ध असो, त्याच्या हृदयी वास करणाऱ्या देवाचें स्वरुप कसे आहे व देह पडल्यावर तो कोठे जातो. त्याचे उत्तर पुढील श्लोकांत दिले आहे.

**वसे हृदयीं देव तो जाण ऐसा ।**
**नभाचे परी व्यापकु[1] जाण तैसा ।**
**सदा संचला[2] येत ना जात कांहीं ।**
**तयावीण कोठें रिता ठाव नाहीं[3] ।।१९५।।**

१. दासबोध २० ह्व १० ह्व ३-६ हा. **पक्षी अंतराळीं गेला । भोंवेतें आकाश चि तयाला । तैसें ब्रह्म प्राणीयांला । व्यापून आहे ।।** २०-१०-९
२. **परब्रह्म तें येकलें । येकदां चि सकळासी व्यापिलें । सकळांस स्पर्शौन राहिलें । सकळां ठांई ।।** २०-१०-१४ **।। येईना जाईना ब्रह्म । उपजेना मरेना कदा । उडेना बुडेना ब्रह्म । सदोदित चि संचले।।** स्फु.प्र११-५
३. **जेथें तेथें देव नाही रिता ठाव । ऐसा माझा भाव अंतरींचा ।। अंतरींचा देव अंतरी जोडला । विकल्प मोडला येकसरा । येकसरा जाला लाभ आकस्मात । ब्रह्म सदोदित सर्वा ठांई ।।** स्फु.ओ. ।।२०८।। **मजवेगळा रिता कांही । अणुभरी ठाव उरला नाहीं । मी सर्वात्मा सर्व देही । सर्वगत पाहीं सर्वदा ।।** ए.भा.१०-६९५

**नभीं वावरे जो अणुरेणु[1] कांहीं ।**
**रिता ठाव या राघवेंवीण नाहीं ।**
**तया पाहतां पाहतां तेंचि जाले[2] ।**
**तेथें लक्ष आलक्ष सर्वै बुडाले ।।१९६।।**



१. आकाशांत जे सूक्ष्म जीव वावरतात, जे एरव्ही दिसत नाहीत, पण जे एकाद्या जाळीतून घरांत येणाऱ्या सूर्यकिरणप्रकाशांत विशेषत: दिसतात, त्यांच्यांत हि श्रीराम भरला आहे. **जयावीण कोठें रिता ठाव नाहीं । तया शोधितां तो चि होऊनि राहीं । ह्मणे दास विश्वास भावें धरावा। खरा देव तो आदरें वोळखावा ।।**
२. अशा त्या स्वरुपाचें दर्शन घेतां घेतां आपण च तद्रूप होऊन त्या स्वरुपाच्या ठिकाणीं सर्व कांही दृश्यादृश्याचा लय होतो ! **जयाचा घ्यावा अनुभव । तो चि आपण निरावेव । आपुला घेती अनुभव । विश्व जन ।।** ८-१०-७८ **।। लोभी धन साधूं गेले । तवं ते लोभी धन चि जाले । मग ते भाग्यपुरुषीं भोगिले । सावकास ।।७९।। तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास जालें तत्वता । अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ।।८०।। हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन तेथें चि राहावें । निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ।।** १९-५-२८

**नभासारिखें रूप या राघवाचें[1] ।**
**मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें[2] ।**
**तया पाहतां देहबुधी उरेना[3] ।**
**सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना[4] ।।१९७।।**

१. श्रीरामाचें स्वरुप आकाशासारिखें (ब्रह्मांडव्यापी) आहे.
२. त्या स्वरुपाचें चिंतन केल्यास जन्ममरणाचें मूळ च खंडून जातें. **करी मूळ निर्मूळ घेता भवाचें ।।**
३. त्या स्वरुपाचा बोध जाला ह्मणजे अहंभाव नाहींसा होतो. **प्रगटला देव जयाचें अंतरीं । तयार नाहीं उरी मीपणाची ।।**
४. अशा त्या स्वरुपाकडे किती हि पाहिलें तरी तृप्ति होत नाही, असें तें रुप आहे. **ठकाराचें ठाण करीं च्यापबाण । माझें ब्रह्मज्ञान ऐसें आहे ।।**

**रामरुप देहो जाला निसंदेहो । माझे मनीं राहो निरंतर ।। मुखीं रामनाम चित्ती मेघशाम । होतसे विश्राम आठवितां । रामदास ह्मणे रामरुपावरी । भावें मुक्ती चारी वोवाळीन ।।** स्फु.ओ.२५७

**नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे[१] ।**
**रघूनायेका ऊपमा ते न साहे ।**
